# पै-पैशानें कुबेरपद



REFBK-0012430
ग्रं. सं. ठाणें
वरिभ
१०४८

अनु. अंबादास अग्निहोत्री

# पै-पैशानें कुबेरपद

अमेरिकन व्यापारी वूलवर्थची व्यवसायकथा

* *

लेखिका

नीना ब्राऊन बेकर

अनुवादक

अंबादास अग्निहोत्री

* *

मूल्य दोन रुपये

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 32745 ... वि: पारित
क्रमांक 9086 ... नों दि: 8-3-62
ग्रा. क्र. 12430
REFBK-0012430
REFBK-0012430

वोरा पब्लिशर्स प्रा. लि., मुंबई.

कुमार साहित्य माला

...६८...

श्री : ३३९ [ १-६२ ]

★

Copyright
© 1954
By Nina Brown
Baker

★

कुमार साहित्य
माला : ६८

★

आवृत्ति पहिली
१९६२

★

मूल्य रु. २-००

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लि. प्रा. लि. करिता
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी, मुंबई २.

★

मुद्रक :
शं. त्र्यं. आवटे
इंदिरा प्रिंटिंग प्रेस
१००५ सदाशिव पेठ,
पेरुगेटनजीक, पुणे २.

मराठी ग्रंथ ... स्थळ
अनुक्र. 32850 ... चरित्र
क्रमांक ... 9086 ... दि. 8/3/52

## असें लाभलें कुबेरपद!

श्री. फ्रॅन्क वूलवर्थ हे धनाढ्य झाले, यशाच्या अत्युच्च शिखरावर विराजमान झाले, तेव्हां एक समारंभ झाला. त्या प्रसंगीं वूलवर्थनीं स्वतःच बोलून दाखविलें कीं, “ आपल्याला परवडेल त्या किंमतीचा माल घेण्याचा गिऱ्हाईकाला हक्क आहे, हें दुकानदारानें मानलें पाहिजे. मी कांहीं केलें असेल तर ही कल्पना प्रत्यक्ष व्यवहारांत आणली. ”

तथापि, ही एक कल्पना प्रत्यक्ष व्यवहारांत उतरविण्यासाठीं या माणसाला केवढी चिकाटी, केवढे अपार परिश्रम आणि किती बुद्धिमत्ता खर्च करावी लागली ! श्री. फ्रॅन्क वूलवर्थ यांचें चरित्र म्हणजे या प्रदीर्घ प्रयत्नांचाच इतिहास आहे. एक सामान्य शेतकऱ्याचा मुलगा; पण चाकोरीबाहेर पाऊल टाकून स्वतःचें जीवन स्वतःला पाहिजे असें घडविणें; आणि तदनंतर व्यावसायिक क्षेत्रांतहि पुन्हां चाकोरीबाहेर पडूनच एक अभिनव कल्पना साकार करून दाखविणें, त्यांतहि उत्तुंग यश मिळविणें ही खरोखरीच असामान्य कर्तबगारी म्हटली पाहिजे. पौरुष आणि पराक्रम दाखविण्यासाठीं जसें केवळ रणांगणच लागतें असें नाहीं तसेंच बुद्धिमत्तेचा नि कल्पकतेचा अलौकिक विलास प्रकट करण्यास केवळ ग्रंथनिर्मिति किंवा रंगभूमीच लागते असें नाहीं. व्यापारासारख्या रुक्ष वाटणाऱ्या व्यवहारांतहि त्या कल्पकतेची नि बुद्धिमत्तेची चमक जगाला दिपवून टाकण्याइतकी दाखवितां येते। हेंच श्री. फ्रॅन्क वूलवथ यांच्या या अभिनव व्यापारी करामतीनें दाखवून दिलें.

पांच सेंट आणि दहा सेंट किंमतीच्याच वस्तूंचें दुकान ही त्यांच्या प्रतिभेला अंकुरलेली अभिनव कल्पना होती. प्रारंभीं त्यांच्या या कल्पनेची हेटाळणी झाली, कुचेष्टा झाली, तिला अपयशाचे धक्केही खावे लागले. परंतु अखेर ‘ वुलवर्थचें स्वतःचें दुकान काढण्याचें ’ स्वप्न बघणाऱ्या, प्रारंभीं खिशांत स्वतःच्या मालकीची पेनी नसणाऱ्या त्या शेतकऱ्याच्या मुलानें जें स्वप्न कधींच पाहिलें नव्हतें ते प्रत्यक्ष घडलें होतें. १९०५-पर्यंत वूलवर्थ धंद्याच्या सांखळींत एकशेंवीस दुकानें झालीं होतीं !

फ्रॅन्क वूलवर्थ आतां कोट्यधीश बनला होता. त्यानंतरच्या काळांत तो अब्जाधीशही झाला, त्यापेक्षांही मोठा कुबेर बनला. परंतु हें कुबेरपद त्यानें पै-पैशानें मिळविलेलें होतें; पांच आणि दहा सेंटच्या विक्रींतून त्यानें तें प्राप्त करून घेतलेलें होतें.

'Nickles & Dime-
Woolworth's Story'
by Nina Brown Baker
या पुस्तकाचा अनुवाद

* * *

# पै-पैशानें कुबेरपद

* * *


१. पांच पेनीवालें गिऱ्हाईक
२. एका सम्राटाचा आदर्श
३. नोकरी कोठें मिळेना
४. अगदीं पायापासून प्रारंभ
५. जेनीकडून प्रतिसाद
६. 'दरेक चीज-पांच पांच सेंट'
७. वूलवर्थचें पांच व दहा सेंटवाल्या वस्तूंचें दुकान
८. 'आपण आद्यप्रवर्तक आहोंत'
९. जुन्या ऋणाची परतफेड
१०. शंभर ठिकाणीं शंभर दुकानें
११. व्यापार-उदिमाचें मंदिर
१२. मृत्यूची संक्रांत

४२६३७



अजून उजाडलेलें नव्हतें. पण, फ्रॅन्क मात्र उमजला होता कीं आतां उठायची वेळ झालेलीच आहे. घराचा मागील दरवाजा खाडकन् लोटला गेला होता. त्याच्या आवाजानेंच फ्रॅन्कला जाग आली होती. गुरांना वैरण सोडण्यासाठीं त्याचे बाबा मागीलदारीं गेलेले असावेत. खालीं स्वयंपाकघरांत आई शेगडयांच्या झडपा उघडीत-लावीत होती. तो आवाजहि फ्रॅन्कला ऐकूं येत होता. त्यानें बिछान्याबाहेर उडीच मारली. गारठलेल्या भुईचा स्पर्श अनवाणी पायांना होतांच त्याचें अंग किंचित् शहारलें.

सहा वर्षांचा चार्ली अजून निद्राधीनच होता. परांच्या गुबगुबीत नि ऊबदार गादीवर पाय पोटाशीं घेऊन तो पडलेला होता—घरटयाच्या निवाऱ्यांत पहुडलेल्या पिलासारखा. थोरल्या भावानें खसकन् पांघरूण ओढतांच तो जागच्या जागीं चुळबुळला नि झोपेंतच कांहीं तरी पुटपुटला.

"चार्ली ! उठायची वेळ झालीय् बरं का. ऊठ बघूं आतां. हं. अंग झाडून जरा ताजातवाना हो बघूं."

"नाहीं, नाहीं ! तूं जा–जा ! मला झोपायचंय् अजून." उशीपाशीं सरकत आणि फ्रॅन्कनें अंगावरून हिसकलेली दुलई पुन: अंगावर ओढण्याचा प्रयत्न करीत चार्ली म्हणाला.

त्याबरोबर फ्रॅन्क खेकसला, "बरं तर मग, रहा झोंपून खुश्शाल ! कोणाचं अडलंय् नाहीं आलास तर ! मी एकटाच जाईन बाबांबरोबर गांवांत, तुला घरीं टाकून. आईला वाढदिवसाची वस्तु आणायचीय् ती माझी मीच पसंत करीन. अगदीं सबंध दिवसभर रहा निजून, पाहिजे तर !"

"अरे, खरंच कीं, फ्रॅन्क ! मी विसरूनच गेलों होतों कीं !" चार्ली उद्गारला आणि अंथरुणांतून उडी मारून कपडयांसाठीं खुर्ची शोधूं लागला. रात्रीं झोपतांना त्यानें कपडे खुर्चीवर काढून ठेवले होते.

तोंवर फ्रॅन्कचे अर्धेअधिक कपडे घालून झाले होते. रात्रीं झोपतांना, हिंवाळ्यासाठीं असलेल्या लांब बाह्यांच्या बंडया नि पायघोळ पायजमे हीं

अंतर्वस्त्रें अंगावर चढविलेलीं होतींच. आतां फक्त गुढग्यापर्यंत चढवायचे काळे पायमोजे आणि सफेद आक्रोडाच्या रंगाच्या नि सळीदार रेघांच्या कापडाच्या तुमानी घातल्या कीं झालें. पायतणें ऊबदार रहावींत म्हणून स्वयंपाकघरांतल्या शेगडीपाशीं ठेवलेलीं होतीं. आणि मुलें आज गांवांत जाणार म्हणून आईनें त्यांचे सदरे इस्तरी करून घडया घालून ठेवलेले असणारच.

स्वयंपाकघरांत डुकराच्या सुक्या तळलेल्या मांसाचा, तळलेल्या अंड्यांचा नि तळलेल्या बडाटयांचा खमंग वास दरवळत होता. ताकांत भिजविलेल्या पिठाच्या बिस्किटांची थाळी श्रीमती वूलवर्थ भट्टींतून बाहेर काढीत होत्या. धगधगत्या शेगडयांजवळ असल्यामुळें त्यांचा चेहरा लालतांबूस दिसत होता.

दोघां भावांना आंत आलेले बघतांच आई म्हणाली, " जा, लौकर हाततोंड धुवा बघू. न्याहारीची तयारी झालीय्. अन् तुमच्या वडिलांना सुद्धां बोलवा बाहेरून. "

गायीच्या कातडयाचे जाडजूड बूट दोघांनीं पायांत चढविले आणि बाहेर अंगणांत असलेल्या पाण्याच्या पंपाच्या पडवीकडे धांव घेतली. पंप चालवून त्यांनीं बादलीभर पाणी काढलें आणि साबणाच्या पेटीच्या वरच्या बाजूला सांडपाण्यासाठीं असलेल्या पत्र्याच्या घमेल्यांत त्यांनीं हात धुवायला सुरुवात केली. थंडीमुळें चिरा पडलेल्या हातांना गडद पिवळ्या रंगाचा साबण झोंबत होता. तरीदेखील जोरजोरानें घासून हात धुण्यांत त्यांनी कसूर केली नाहीं. हात स्वच्छ ठेवलेच पाहिजेत याबद्दल आईचा फार कटाक्ष असे. बारीक दांते असलेला कंगवा ओला करून त्यांनीं आपले केस विंचरले. घाणेरडे, विस्कटलेले केसदेखील आईला आवडत नसत.

मुलांचें हाततोंड धुणें चालू असतांनाच बाबाहि तेथें आले.

आपल्या राकट नि खडबडीत हातांना साबण चोपडीत श्री. वूलवर्थ तक्रारीच्या सुरांत म्हणाले, " तुम्हां पोरांचा माझ्याबरोबर आज यायचा हट्ट कां हेंच मला कळत नाहीं. तिथें बाजाराच्या चौकांत कडक थंडींत उभे राहून अगदीं वैतागून जाल तुम्ही. त्यापेक्षां आईपाशीं घरींच रहा ना ! "

" पण, आम्ही खूप भरपूर कपडे घालूं कीं–" फ्रॅन्कनें उतावीळ स्वरांत आश्वासन दिलें. आणि तो पुढें म्हणाला, " अन् बाबा, तुम्हीच तर कबूल केलं होतं आम्हांला न्यायचं–"

तरीदेखील मुलांनीं बरोबर येण्याची कल्पना तितकीशी आपल्याला पसंत नाहीं असें सुचविणारा हुंकार श्री. वूलवर्थ यांनीं काढला आणि ते घरांत जायला निघाले. मुलें त्यांच्या मागोमाग स्वंपाकघराच्या ऊबदार वातावरणांत येऊन दाखल झालीं. न्याहारी अगदीं पोटभर, पण झरझर उरकण्यांत आली. खातांना कुणीच बोललें नाहीं. न्यूयॉर्क संस्थानांतील शेतकऱ्यांची, खात असतांना बोलण्याची रीतच नाहीं. त्यांच्या दृष्टीनें खाणेंपिणें हें सुद्धां एक कामच—अगदीं शेतावरील कामासारखें काम. तें चोख-पणें बजावलें गेलें पाहिजे. आणि संभाषणामुळें काम रेंगाळतें. न्याहारी करतांना तिघांनींही सदरे घातलेले नव्हते. मुलांच्या आईनें इस्तरी करून तयार ठेवलेल्या स्वच्छ सदऱ्यांवर अंड्यांचे कण उडून ते खराब होऊं देण्यांत अर्थ नव्हता.

न्याहारी झाल्यावर तिघांनीं सदरे अंगावर चढविले. बाबांचा सदरा उठावदार उभ्या सळ्या असलेल्या निळ्या कापडाचा होता. रंग विटका झालेला असला तरी सदरा स्वच्छ होता; त्यावर सुरकुत्या मुळींच नव्हत्या. मुलांचे सदरे खऱ्या अर्थानें सदरे म्हणतां आले नसते आणि त्यांना सदरे वा अंगरखे म्हणतही नसत. तशा अंगरख्यांना ' कमरगे ' म्हणतात. कम-रगा म्हणजे कमरेखालीं लोंबणाऱ्या कडा असण्याऐवजीं कमरेपर्यंतचा कुडता. त्याची खालची कड पट्टीची असते नि पट्टींत नाडी घालून ती आवळून बांधायची असते. दोघां मुलांचे कमरगे सुती पांढऱ्या छापील कापडाचे होते. फ्रॅंकच्या सदऱ्यावर लाल चांदण्यांची खडी छापलेली होती. तर चार्लीच्या सदऱ्यावर घोड्याच्या नालाचे नमुने छापलेले होते.

मुलांनीं सदऱ्यावर जाडजूड लोंकरीच्या कापडाचे डगले चढविले. बाबांच्या जुन्या डगल्यांच्या कापडाचे घरींच शिवलेले डगले होते ते घरींच विणलेल्या लोंकरीच्या कानटोप्या आणि हातमोजे घालण्यांत आल्यावर लोंकरीचे गुबगुबीत गळपट्टे गळ्याभोंवतीं गुंडाळण्यांत आले. अशा रीतीनें सारा जामानिमा झाल्यावर दोन्ही मुलें बाबांच्या मागोमाग कोठारा-जवळच्या आवारांत गेलीं.

तेथें गाडी उभी होती. गाडीला चाकें नव्हतीं; बर्फावरील गाडी-सारख्या सरकपट्ट्या चाकांच्या जागीं होत्या. गाडीभोंवतीं सर्वत्र बर्फ

सांचलेला होता. जवळच लांकडांचा ढिगारा होता. शेगडयांत वापरण्याच्या आकाराच्या लांकडांची फोड काल संध्याकाळींच गाडींत रचून ठेवण्यांत आली होती. मॉली नि डॅन ही घोडयांची जोडी गाडीला जोडण्याच्या कामीं मुलें बाबांना हातभार लावूं लागलीं.

तेवढयांत श्रीमती वूलवर्थ बाहेर आल्या. त्यांच्या हातीं ढीगभर मळकट दुलया नि पांघरुणें होतीं. त्या उद्गारल्या, " बाई, बाई ! भयंकरच थंडी हो ! थांबा हं ! भट्टींत गरम विटा आहेत. फॅन्की, जा पळ अन् घेऊन ये त्या विटा. तुमच्या पायांखालीं ठ्व्यातच आज गरम गरम विटा. "

अखेर, मुलें बाबांशेजारीं स्थानापन्न झालीं. पायांखालीं गरम विटा आणि अंगाभोंवतीं अगदीं गुरफटून घेतलेल्या दुलया. बाबांनीं घोडयांना ' चक्चक् ' करतांच गाडी निघाली. आवारांतून बाहेर पडून मुख्य रस्त्यावर आली.

त्या सकाळीं तत्पूर्वीं रस्त्यावरून एकही वाहन गेलेलें नव्हतें. कारण, गोठलेल्या चिखलावरचा शुभ्र बर्फाचा थर अगदीं सारखा पसरलेला दिसत होता. दुतर्फा शेतांच्या कुंपणादरम्यानचा हा बर्फाचा थर कुठेंच विस्कटलेला दिसत नव्हता. सूर्य वर आलेला होता, पण करडया रंगांच्या ढगांनीं झांकळलेला होता. वारा बर्फासारखाच गारठविणारा होता. वाऱ्यामुळें मुलांच्या नाकांचे शेंडे सोलल्यागत झाले होते आणि डोळे पाणावले होते.

गावापर्यंतचा रस्ता लांबलचक होता. पण त्या दीर्घ प्रवासांत कोणीच फारसें बोललें नाहीं. आधींच श्री. वूलवर्थ हे अबोल वृत्तीचे होते. आणि त्यांत आजकाल विशेषतः त्यांच्या मनावर चिंतेचें दडपण असे. दिवस मोठे वाईट आलेले होते. यादवी युद्धामुळें प्रत्येकजणच काळजींत पडलेला होता. आणि वूलवर्थना आपल्या शेतावरील गहाणाचे कर्जहप्ते भरतांना फार धडपड करावी लागे. आपल्या पोरकट गोष्टींनी बाबांच्या विचारचक्राच्या गतींत अडथळा आणणें बरें नाहीं याची मुलांना चांगलीच जाणीव होती.

गाडी बराच वेळ धांवल्यानंतर शेतांचीं कुपणें संपून वॉटरटाऊनच्या रस्त्याच्या दुतर्फा ओळीनें लावलेले खांब दिसूं लागले. वॉटरटाऊन हें त्या पेटयाचें मुख्य गांव होतें. लोकवस्ती सात हजार असून, बाजाराचें केंद्र असल्यामुळें गांव गजबजलेलें असे. गांवच्या मुख्य चौकांतच बाजार

नि व्यापारधंद्याचें केंद्र होतें. चौकाच्या मध्यभागीं अदालतीची इमारत-चावडी होती. बाजार उघड्यावरच भरत असे. आणि बाजारासाठीं आलेले शेतकरी आपलीं जनावरें चावडीच्या इमारतीभोंवतालच्या आवाराच्या खांबांना बांधून ठेवीत असत.

श्री. वूलवर्थ यांची गाडी चौकांत येऊन दाखल झाली तत्पूर्वींच तशाच कांहीं गाड्या येऊन दाखल झालेल्या दिसल्या. घोड्यांचा लगाम खेंचून गाडी थांबवींत असतांनाच वूलवर्थची नि शेजारींच गाडी सोडून उभ्या असलेल्या शेतकऱ्याची दृष्टादृष्ट झाली. त्या शेतकऱ्याच्या नजरेंतला भाव खेदाचा होता.

तो शेतकरी म्हणाला, " आज गांवांत लांकूडफाटा खूप आलाय् विक्रीला, पण गिऱ्हाइकांची मात्र चणचण आहे. राशीमागें एक डॉलर मिळाला भाव, तरी आपण नशीबवान् ठरूं ! "

सावकाश मान डोलवीत श्री. वूलवर्थ उत्तरले, " आजकाल लांकूड-तोडीच्या कामांत रामच राहिलेला नाहीं. या युद्धानं सर्वच कांहीं नासवून टाकलंय् ! बरं, श्री. मीन्स, तुमच्या मुलाचं कांहीं पत्रबित्र आलं का ? तो ग्रॅन्टच्या पलटणींत आहे, नाहीं का ? "

पहिला शेतकरी होकारार्थी मान हालवीत म्हणाला, ' ' शेवटचं पत्र आलंय् तें फोर्ट डोनेलसनच्या लढाईनंतर. त्या लढाईतून तर सहीसलामत राहिलाय्. पण आतां ग्रॅन्टची पुढची मोहीम कुठची आहे तें देव जाणे ! एबचं शेवटचं पत्र जवळच आहे माझ्या–थांबा हं–"

तेवढ्यांत मुलें बसल्याजागीं चुळबूळ करूं लागलीं. परवानगीशिवाय गाडीतून उतरणें शक्य नव्हतें. आणि मोठीं माणसें एकदां बाचचीत करूं लागलीं कीं त्यांच्या बोलण्यांत मुलांनीं व्यत्यय आणणें इष्ट नसतें.

तो शेतकरी मुलाचें पत्र शोध ण्यांत गुंतलेला असतांना फ्रॅन्कनें हळूच बाबांच्या हाताची बाही ओढीत विचारलें, " बाबा, मी न् चार्ली जरा गांवांत भटकून आलों तर चालेल का ? "

" जा, हरकत नाहीं. पण नीट जा. खोड्याबिड्या करूं नका. अन् फार दूरवर जाऊं नका. माल विकला जातांच मी गाडी जुंपणार आहें लगेच. " असें म्हणून श्री. वूलवर्थ पुन: श्री. मीन्सकडे वळले. दोघे भाऊ गाडींतून झरकन् उतरले आणि तसेच दौडत पसार झाले.

रस्त्याच्या कोपऱ्यावर येतांच छोटा चार्ली म्हणाला, "याच रस्त्यावर कार्टरचं दुकान आहे-"

"कार्टरच्या दुकानाशीं आपल्याला कांहीं कर्तव्य नाहीं आज. तूं आपला माझ्याबरोबर चल." फ्रॅन्क सरळ नाकासमोर बघत म्हणाला आणि भावाला घेऊन चौक ओलांडून पलिकडे गेला.

ऑग्जवरी ॲन्ड मूर्स कॉर्नर स्टोअर हें वॉटरटाऊनमधील सर्वांत मोठें आणि उत्कृष्ट भांडार होतें. तेथें सुती-लोकरी-रेशमी कापड, रंग, साबण, धान्यें, चाप, कंगवे वगैरे वस्तु मिळत. गांवांतील गब्बर लोक, हेंच त्या भांडाराचें मुख्य गिऱ्हाईक होतें. या लोकांना धंदाव्यवसायासाठीं बाहेर जातांना नित्य चांगला पोषाख आवश्यक वाटे. शिवाय, मेजवान्या, समारंभ इत्यादि प्रसंगीं घालण्यासाठीं झकपक कपडेहि लागत असत. गरीब शेतकरी अर्थातच कार्टरचें दुकान पसंत करीत. हें दुकान एका आडरस्त्याला होतें आणि त्याचें रंगरूपही अद्यावत् स्वरूपाचें नव्हतें. म्हातारा कार्टर हरएक वस्तु विक्रीला ठेवीत असे. काम करतांना घालण्याचे कपडे तो विकी, तसेंच चांगलें सुती कापडही विक्रीला ठेवी. लोखंडी-पोलादी सामानही त्याच्या दुकानांत होतें. आपल्या बाबांबरोबर फ्रॅन्क नि चार्ली अनेकदां कार्टरच्या दुकानांत गेले होते. कॉर्नर स्टोअरमध्यें मात्र त्यांनीं आतांपर्यंत एकदांही पाऊल ठेवलेलें नव्हतें.

आज मात्र फ्रॅन्क त्या दुकानाच्या रोखानें निघाला होता. दुकानाच्या प्रवेशद्वाराशीं येतांच तो थांबला. डगल्याच्या खिशांतून त्यानें आपला तांबड्या रंगाचा पण पिवळे ठिपके असलेला हातरुमाल काढला. त्या हातरुमालाच्या एका टोंकाला बांधून ठेवलेल्या तांब्याच्या चकचकीत कोऱ्या पांच पेनी जशाच्या तशा होत्या. पांच पेनींतील चार फ्रॅन्कच्या होत्या नि एक चार्लीची होती.

पैसे बरोबर असल्याची खात्री करून घेतल्यावर फ्रॅन्कनें छोटया भावाला फर्मावलें, "ठीक आहे. चल आंत!"

"आंत? बापरे! म्हणजे, आपण या दुकानांत जायचं?"

"कां नाहीं जाऊं आपण? आपण का गिऱ्हाईकं नाही? आपण कांहीं नुसतं भटकायला-बघायला जाणार आहोंत असं नाहीं. आपल्याला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 32846
क्रमांक 9086
दि. 8/3/62


कांहीं तरी विकत घ्यायचंय्. आईला वाढदिवसाची देणगी म्हणून तिच्यासाठीं कांहीं तरी खास वस्तु घ्यायचीय् आपल्याला. अन् तशी वस्तु याच दुकानांत मिळूं शकेल. तेव्हां, चल बघूं. अन् एकाद्या घाबरट, बुजऱ्या पोरासारखा माझा हात धरूं नकोस. लक्षांत ठेव कीं, आपण गिऱ्हाइकं आहोंत !"

दुकानांतील वातावरण ऊबदार होतें आणि आंत प्रकाशही भरपूर होता. खळीचे पीठ, रंग, सुवासिक साबण इत्यादि वस्तूंचा संमिश्र आणि छान वाटणारा वास दुकानांत दरवळत होता. त्या दुकानांत, आपल्या गावठी नि जाडयाभरडया कपडयांमुळें विशोभित दिसणाऱ्या त्या मुलांकडे कोणीच लक्ष दिलें नाहीं.

एक विक्रेती तरुणी, एका धांदरट लठ्ठ बाईच्या बटबटीत हातांवर नाजूक विणीचे हातमोजे मापून दाखवीत होती. दुसरी विक्रेती तरुणी एका सुंदरीला कलावतूंच्या फितीचे नमुने दाखवीत होती. त्या सुंदरीनें मखमलीचा फुगीर आकाराचा रुंद झगा घातलेला होता आणि तिच्या मस्तकावरील सुबक छोटयाशा टोपींत शहामृगाच्या पिसांचा तुरा खोचलेला होता. पलिकडे पुरुषांच्या विभागांत एका लब्धप्रतिष्ठित दिसणाऱ्या गिऱ्हाइकाला एक विक्रेता दुहेरी पन्ह्याचें साधें काळें कापड दाखवीत होता. त्या विक्रेत्यानें प्रिन्स अल्बर्ट पद्धतीचा लांब डगला घातलेला होता. बाकीच्या गिऱ्हाइकांत झकपक कपडे घातलेल्या बायकाच जास्त होत्या. दुकानाच्या दालनांतील मालाचें निरीक्षण करीत नि आपसांत कुजबजत हीं गिऱ्हाइकें इकडून तिकडे हिंडत होतीं.

" आतां आपण काय करायचं रे ? " चार्ली कुजबुजला.

फ्रॅन्कने मात्र त्याला वरच्या पट्टींतील आवाजांत उत्तर दिलें. तो म्हणाला, " पाहिजे तितका वेळ नुसतं बघत हिंडायचं. इतर गिऱ्हाइकं करताहेत तसं असं बघत राहिलों आपण, कीं आपल्याला पाहिजे तसली वस्तु सांपडेल. "

त्यांनीं खूप वेळ निरीक्षण केलें. असंख्य वस्तू पाहिल्या. पण झालेल्या निरीक्षणानें पदरांत निराशाच पडली. कोणाकडे विचारपूस न करतांच फ्रॅन्कला कळून चुकलें कीं, कापडचोपड, हातमोजे आणि कलाबूतच्या फिती या गोष्टी आपल्या ऐपतीपलीकडच्या आहेत. तरी पण,

आपल्या पाशीं असलेल्या फक्त पांच सेंटमध्यें कोणती वस्तु बसू शकेल याची त्या पोराला कांहीं विशेष कल्पना करतां येत नव्हती.

आणि तशी कल्पना कशी करतां येणार? वूलवर्थ कुटुम्बांतील या मुलांना जास्त पैसे खर्चण्याचा मोकाच कधीं मिळायचा नाहीं. फार फार तर त्यांच्या मातवर मामानें दिलेल्या चार दोन पेनीच त्यांच्याजवळ असायच्या. ही दौलत अगदीं जपून ठेवली जाई आणि एका वेळीं फार तर एकादी पेनी खर्चून खेडयांतल्या दुकानांतूनच कांहीं वस्तु मुलें विकत घेत. एका पेनीला पांचसहा गोटया किंवा चार गोळया मिळायच्या. फ्रॅन्कचें वय त्यावेळीं दहा वर्षांचें होतें. पण, एका वेळीं एकदम तीन पेनी खर्च केल्याचें कांहीं त्याला आठवत नव्हतें, मग, एकदम पांच पेनी खर्चण्याचा प्रश्नच नव्हता. त्याच्या मतें, तब्बल पांच पेनींमध्यें कांहींतरी चांगली भारीच वस्तु यायला पाहिजे होती.

अर्थात्‌च त्यानें दुकानांत आतांपर्यंत बघितलेल्या वस्तूंइतकी ती वस्तु भारी असावी असें त्याला म्हणायचें नव्हतें. तितकी भारी वस्तु आपल्याला पांच पेनींमध्यें मिळणार नाहीं हें त्याच्या धाकटया भावाला माहीत नसलें तरी फ्रॅन्कला तें कळण्याइतकें तरी ज्ञान खासच होतें.

"कांहींच विकत घ्यायचं नाहीं कीं काय?" चार्लीनें त्रासिकपणें विचारलें, "मग तूं अजून कांहींच कसं विकत घेत नाहींस फ्रॅन्क?"

"कांहीं आढळलं म्हणजे घ्यायचं आहेच." फ्रॅन्क आश्वासनपर स्वरांत उत्तरला, "आईच्या वाढदिवसाची देणगी निवडतांना खूप काळजीपूर्वक निवड केली पाहिजे आपल्याला. वाटेल ती साधी जुनी वस्तु घेऊन चालायचं नाहीं."

फ्रॅन्क भावाला धीर देत होता, पण खुद्द त्याच्या अंतःकरणानें मात्र ठाव सोडायला सुरुवात केली होती. या मेजाकडून त्या मेजाकडे वावरत आपण हिंडत आहों हें नोकरांच्या लक्षांत येऊं लागलें असावें असें फ्रॅन्कला वाटूं लागलें. ती लठ्ठ बाई हातमोजे विकत घेऊन निघून गेली होती. आपले जाडजूड बूट खाडखाड वाजवीत चालणाऱ्या त्या पोरांकडे विक्रेती तरुणी तुच्छतादर्शक नजरेनें पहात होती. जातांजातां चार्लीनें, कलाबूतची फीत घेणाऱ्या सुंदरीच्या मखमलीच्या झग्याला हात लावून बघितलें. त्याबरोबर

त्या सुंदरीनें डोळे वटारून त्याच्याकडे बघितलें. फ्रॅन्कनें त्याला ओढीतच दुसऱ्या बाजूला नेलें.

आणि दुकानाच्या आंतल्या बाजूला फ्रॅन्कला हवी असलेली वस्तु दिसली. पूर्वी एकदां ते दोघे त्या बाजूकडून गेलेही असतील, पण ती वस्तु त्यावेळीं त्यांच्या नजरेंतून निसटली असावी. आंतल्या बाजूस तोच बाक नेमका बघून घ्यायचा राहून गेला असावा. त्या बाकाला लावलेल्या छोट्या पाटीवर लिहिलेलें होतें, "हरतऱ्हेच्या सुंदर वस्तु अर्ध्या किमतींत!" सुन्दर वस्तु आणि निम्म्या किमतींत! खास! येथेंच आपल्याला हवें तें मिळणार!

मनाशीं उल्हसित होतांच ते दोघे पुढें झाले. बाकावर अनेक वस्तु होत्या; पण फ्रॅन्कचें लक्ष नेमकें बायकांच्या केसांत दोन्ही बाजूंना खोवण्याच्या कचकडयाच्या फण्यांकडे गेलें. एका पत्र्याच्या आकाराच्या पुठ्ठ्यावर त्या फण्या लावलेल्या होत्या. फण्यांचा रंग लालभडक होता आणि त्यांच्या कमानींवर निसरगांठीच्या आकाराची वेलबुट्टी होती. फ्रॅन्कनें फण्यांचा पुठ्ठा उचलून चार्लीच्या हातीं देत आनंदानें म्हटलें, "मी सांगितलं नव्हतं तुला, कीं आपल्याला पाहिजे तशी वस्तु नक्की मिळेल म्हणून?"

दोघे भाऊ उल्हसित वृत्तीनें त्या वस्तूचें निरीक्षण करण्यांत गर्क असतांनाच कोणीतरी मागून फ्रॅन्कचा कान पकडला. कान पडणारा माणूस म्हणजे प्रिन्स अल्बर्ट पद्धतीचा लांब डगला घातलेला तरुण विक्रेता होता.

"खबरदार मालाला हात लावाल तर!" तो कठोर स्वरांत म्हणाला, "इथं तुझं काय काम आहे रे पोरट्या? चल, आण ती वस्तु इकडे!"

फ्रॅन्क गोंधळून वर पाहूं लागला. आपल्या आईच्या मऊमऊ काळ्या केसांत त्या गर्द तांबड्या फण्या कशा शोभून दिसतील हें चित्र मनश्चक्षूपुढें आणण्यांत त्याची समाधि लागलेली होती. त्यामुळें आपल्यामागें कोणाचीं पावलें वाजल्याचें ऐकूंच आलें नव्हतें त्याला.

त्या तरुण विक्रेत्यानें फण्यांचा पुठ्ठा हिसकावून घेतला नि तो म्हणाला, "उचलून पसार व्हायचा विचार चालला होता काय? पण, अशा

उचल्यांची खोड कशी मोडायची हें ऑग्जबरी-मूर्स स्टोअर्समधल्या आम्हां लोकांना चांगलं माहीत आहे, समजलांत? तुम्हांला हाकलण्याआधीं तुमचे खिसे तपासले पाहिजेत."

फ्रॅन्कची मुद्रा संतापानें लाल झाली. पण तो अगदीं शांतपणें उत्तरला, "मी न् माझा भाऊ-आम्ही उचलेगिरी करणारे नव्हत, समजलांत, मिस्टर! आम्ही गिऱ्हाईकं म्हणून इथं आलों आहोंत."

तो तरुण विक्रेता खदखदून हंसूं लागला. त्याच्या मघांच्या कठोर शब्दांपेक्षां त्याचें हें हंसणें अधिक निर्घृण होतें. "गिऱ्हाईकं काय? माफ करा हं, महाशय! मला माहीतच नव्हतं बघा! आपली मी काय सेवा करूं शकतों. महाशय? आपण विकत घेऊं इच्छितां ती वस्तु नीट बांधून देऊं काय?"

"होय. घ्यायचीय् ती वस्तु विकत मला-" त्याच्या कुत्सित प्रश्नांना फ्रॅन्कनें शांतपणें उत्तर दिलें, "त्या फण्या घ्यायच्यात् मला. दुसरं कांहीं नाहीं घ्यायचं."

"काय? दुसरं कांहींच नको? आमच्याकडचीं सदऱ्यांचीं नि तुमानींचीं कापडं आपण बघाल अशी मला आशा वाटते, महाशय!" आपल्या उपरोधावर स्वतःच मोठ्यानें हंसत तो विक्रेता म्हणाला. आणि मग लगेच, विनोद पुरे झाला, अशा अर्थी त्याचा चेहरा गंभीर बनला.

"ठीक, ठीक!" तो रुक्षपणें म्हणाला, "माझा खोळंबा करूं नका. त्या फण्यांची किंमत अर्धा डॉलर आहे."

"अर्धा डॉलर?" फ्रॅन्क आ वासून उद्गारला, "पण-पण पाटीवर तर 'अर्धी किंमत' असं म्हटलंय्?"

"बरोबर आहे. थोड्याच उरल्यात् या मूळच्या डॉलर किंमतीच्या वस्तु म्हणून अर्ध्या किंमतींत देतों आहोंत," तो विक्रेता आपला हात पुढें करीत म्हणाला, "चला आटपा. काढा पन्नास सेंट लौकर."

आतां संकोचानें लालीलाल होत फ्रॅन्क म्हणाला, "माझ्यापाशीं पन्नास सेंट नाहींत."

विक्रेता एकदम ताठ उभा राहिला आणि तिरस्कारानें म्हणाला, "नाहीं ना? असतील असं मलाही वाटलं नव्हतं! तुमच्याकडे पाहिल्यावरच

समजून येईल कीं पन्नास सेंट काय, पण एकादी पेनीही तुम्हां दोघांजवळ नसेल !"

" पण तसं नाहीं–" छोटा चार्ली मध्येंच धापा टाकीत म्हणाला, " आमच्यापाशीं पांच पेनी आहेत—पांच ! फ्रॅन्क, दाखव रे त्यांना."

" पांच पेनी ! आख्ख्या पांच पेनी !" पुन: एकदां आपलें तिरस्कार-पूर्ण विकट हास्य करीत तो विक्रेता म्हणाला, " अन् तुम्ही गिऱ्हाइकं काय ?" फ्रॅन्कच्या गळपट्टींत हात घालीत तो म्हणाला, " आतां हा चावट-पणा पुरे झाला बघू. एकदां मी तुम्हांला तसेंच सोडतों; पण एक लक्षांत ठेवा. कॉर्नर स्टोअर्स हें पांच पेनीवाल्या गिऱ्हाइकांसाठीं नाहीं, समजलांत ? पुन्हां तुमचे मळकट चेहरे दाखवूं नका. अन् आतां आधीं मुकाटयानं चालूं लागा. नाहीं तर धक्के मारून घालवावं लागेल."

दोघे भाऊ दुकानाबाहेर आले. चार्लीनें भोंकाड पसरलें होतें. फ्रॅन्क मात्र मुकाटयानें दांतओठ चावीत होता. दुकानाबाहेर आल्यावर फ्रॅन्कनें छोटया भावाला नाक साफ करायला लावून गप्प व्हायला बजावलें.

" आतां आपण कार्टरच्याच दुकानीं जाऊं या. म्हातारा कार्टर चक्रम असला तरी असला घमेंडखोरपणा त्याच्या वागण्यांत नसतो."

" तरीपण मी म्हणालों होतों तुला कीं आपण इथं जाऊं नये. हें दुकान आपल्यासारख्यांसाठीं नाहीं, फ्रॅन्क!" चार्ली जोरानें सूंसूं करीत पुटपुटला.

" पण मी म्हणतों, आहे!" फ्रॅन्क ताठपणें म्हणाला, " आपल्याला इतकं कळलं कीं आपल्याला परवडेल अशी–पांच पेनींची पण सुंदर वस्तु त्यांच्या दुकानांत नाहीं. जर असती तर आपण विकत घेतलीच असती. खर्चायला पैसे आहेत आपल्यापाशीं म्हणजेच आपण गिऱ्हाईक आहों. अन् गिऱ्हाइकाला कोणत्याहि दुकानांत जाण्याचा हक्कच असतो."

" मला वाटतं, गिऱ्हाईक म्हटलं म्हणजे त्याच्यापाशीं पांच पेनीपेक्षां जास्त पैसे असले पाहिजेत–" चार्ली मध्येंच म्हणाला, " अर्थात् आधीं मला हें माहीत नव्हतं –"

" मलाही माहीत नव्हतं–" फ्रॅन्क ताडकन् म्हणाला, " अन् तें तसं नाहींच मुळीं. श्रीमंत असो कीं गरीब असो, गिऱ्हाईक तें गिऱ्हाईकच. अन् गिऱ्हाइकाला चांगली वागणूक मिळालीच पाहिजे."

चार्ली बाजाराच्या चौकाकडे हात करीत म्हणाला, " ती बघ, कुणी बाई आपली लाकडं बघतेय्. तिनं तीं लाकडं घेतलीं तर बाबा लगेच परत निघतील. आपण चटकन् कार्टरच्या दुकानांत जाऊं, चल, फ्रॅन्क–"

म्हाताऱ्या कार्टरच्या दुकानांत पांच पेनीवाल्या वस्तु होत्या आणि गिऱ्हाईकें छोटीं मुलें असलीं तरी त्याला त्याची मुळींच हरकत नव्हती. काळें टोपण असलेले चाप खरेदी करण्यांत आले. वारा फार असेल त्या दिवशीं आईला अंगावरील शालीला अडकविण्यासाठीं ते चाप चांगले उपयोगी पडले असते. या वेळीं वस्तूची निवड करण्याचें काम फ्रॅन्कनें चार्लीवर सोंपविलें होतें. गाडीकडे परत येत असतां फ्रॅन्क अगदीं गप्प होता आणि गंभीरपणें चालत होता. त्याचें सांत्वन केलें पाहिजे असें त्याच्या धाकट्या भावाला वाटलें.

चार्ली म्हणाला, " फ्रॅन्क, आईला हे चाप नक्कीच आवडतील बघ. अर्थात् त्या तांबड्या फण्यांसारखे सुंदर नाहींत ते. पण, आपण कांहीं दिलं तरी आईला आवडेलच.–आपण दिलंय् म्हणून आवडेल. फण्या घेतां आल्या नाहींत म्हणून इतकं वाईट वाटायला नको–"

गंभीरपणें अगदीं नाकासमोर बघत फ्रॅन्क चाललेला होता. नजर न वळवतांच तो म्हणाला, " फण्या घेतां आल्या नाहींत म्हणून नव्हे–देणगी मनाजोगती नाहीं याचं दुःख नाहीं मला, चार्ली. मी विचार करतोंय्, ऑग्जबरीच्या दुकानांतील त्या माणसाबद्दल. अगदीं लांब कोट न् कडक गळपट्टी घालूं दे त्याला, पण त्याला सर्व कांहीं समजतंय् असं खास नाहीं. निदान, मला जें माहीत आहे ते त्याला मुळींच माहीत नाहीं. गिऱ्हाइकाला गिऱ्हाईक म्हणून वागणूक मिळण्याचा हक्क आहे, हें मी सांगतों. होय, अगदीं पांच पेनीवाल्या गिऱ्हाइकाला सुद्धां तो हक्क आहे ! अन् जर कधीं काळीं माझ्या मालकीचं दुकान काढतां आलं तर– ! "

✦ ✦ ✦

# एका सम्राटाचा आदर्श : २ :

" अन् जर कधीं काळीं माझ्या मालकीचं दुकान काढता आलं तर-? "

दहा वर्षांच्या फ्रॅन्क वूलवर्थच्या या उद्‌गारांना त्याचा भाऊ हंसला होता. " माझ्यापाशीं दहा लक्ष डॉलर असतील तर ! " " माझा संगमरवरी दगडांचा महाल असला तर ! " अशा बडबडीसारखेच त्याचे वरील उद्‌गार होते.

फ्रॅन्कच्या मालकीचें दुकान निघणार होतें; एक नव्हे, अनेक दुकानें. त्याच्या मालकीचा संगमरवरी दगडांचा महाल होणार होता. तो लाखों डॉलरांचा धनी होणार होता. अद्याप जगाला ज्यांची सुतराम् कल्पनाही नव्हती अशा अपूर्व गोष्टी त्याच्यापाशीं असणार होत्या. जगांतील सर्वांत उंच इमारत बघून थक्क होण्यासाठीं अखिल देशांतील लोक येणार होते. आणि त्या इमारतीचा धनी फ्रॅन्क वूलवर्थ हाच असणार होता.

पण, भवितव्याच्या पोटीं असलेल्या या घटनांची कल्पना त्यावेळीं भयंकर यादवी युद्धाच्या काळांतील त्या हिवाळच्यांत कोणाला असणार ? चार्लीला तशी कल्पना करणें शक्य नव्हतें. फार काय, खुद्द फ्रॅन्कलाही तसें भाकीत खासच करतां आलें नसतें.

वूलवर्थ घराण्यांत कधींच कोणी दुकानदारी केली नव्हती. त्या घराण्याच्या पहिल्या पुरुषानें इंग्लंडमधून येऊन अमेरिकेंत वास्तव्य केलें तें क्रांतीपूर्वीच्या काळांत. तो पुरुष शेतकरी होता. त्याच्या मागचे त्याचे सारे वंशज शेतकरीच होऊन गेले. फ्रॅन्कचा आजा जास्पर वूलवर्थ याच्या मालकीचे शेत न्यूयॉर्क परगण्यांत रॉडमननजीक होतें. त्या शेतवाडीवरच ता. १३ एप्रील १८५२ रोजीं फ्रॅन्क विन्फील्ड वूलवर्थ याचा जन्म झाला त्यानंतर चार वर्षांनीं त्याचा धाकटा भाऊ चार्लस् सम्नेर वूलवर्थ हा जन्माला आला. त्यानंतर या भावांना आणखी भावंडें झालीं नाहींत.

चार्लीचा जन्म झाला त्याच वर्षी या मुलांच्या वडिलांनीं–जॉन वूलवर्थ यांनीं कर्ज काढलें आणि स्वत:च्या मालकीची शेतवाडी खरेदी केली.

ब्लॅक नदीच्या काठीं, ग्रेट बेंड या खेड्यानजीक ही शेतवाडी होती. न्यूयॉर्क संस्थानचा हा प्रदेश ऑन्टोरिओ सरोवर आणि सेंट लॉरेन्स नदी यांच्या किनाऱ्यांच्या दरम्यान पसरलेला आहे. या प्रदेशांतील सृष्टिसौंदर्य अपूर्व आहे. नदीचा प्रवाह आणि दाट झाडी असलेल्या टेकड्या यांच्या पार्श्वभूमीवर असलेली वूलवर्थ कुटुंबाची शेतवाडी म्हणजे एक सुंदर ठिकाण होतें. पण श्रीमती वूलवर्थचा भाऊ अल्बॉन यानें मात्र बघतांच पारखलें होतें कीं, शेतजमीन म्हणून कांहीं ही जमीन चांगली नव्हे. आणि जमिनीवरचा गहाणाचा बोजा फारच डोईजड होता. जॉन वूल-वर्थच्या पत्नीच्या माहेरच्या माणसांच्या मतें, जॉन वूलवर्थ हा माणूस बऱ्यापैकीं शेतकरी असला तरी धंदाव्यवहाराच्या बाबतींत अगदींच यथा-तथा होता.

श्रीमती वूलवर्थ यांच्या माहेरचें कुटुंब, मॅक्ब्रिअर कुटुंब, सधन होतें. आपल्या देखण्या फॅनीच्या कष्टमय जीवनाबद्दल या लोकांना फार अनुकंपा वाटे. फॅनीचे सारे भाऊ उत्कृष्ट शेतकरी होतेच पण त्यांच्या जमिनीहि उत्तम सुपीक होत्या. त्या जमिनींत भरपूर पीक निघे. सर्व भाऊ बँकेंत पैसा शिल्लक ठेवून होते. त्यांच्या बायकांना घरकामांत मदत करण्यासाठीं मोल-करणी होत्या. बिचाऱ्या फॅनीला एकटीला अत्यंत काबाडकष्ट उपसावे लागावेत आणि दारिद्र्यांत पिचावें लागावें ही परिस्थिति अनुकंपनीय आहे असें ही मंडळी आपसांत बोलतांना हळहळत.

फॅनीचा पति, जॉन वूलवर्थ कष्टाळू नव्हता असा याचा अर्थ नव्हे. तोही खूप काबाडकष्ट करी यांत शंकाच नव्हती. पण, त्याच्या खडकाळ जमिनींत बटाट आणि कांहीं थोड्या गायींना पुरण्याइतकी वैरण याखेरीज दुसरें कांहीं पिकतच नसे. बटाटे पिकविण्याचें काम आणि लाकडें तोडण्याचें काम यांत त्याचा सारा वेळ खर्ची पडत असे. आणि या कामांतील प्राप्ति मात्र फारशी दाखवतां येत नसे. श्रीमती वूलवर्थ लोणी काढून वॉटरटाऊन-मध्यें विकायसाठीं पाठवून उत्पन्नाला हातभार लावीत असत. बटाट्याच्या वावरांत दोन्ही मुलें मिळून एका मोठ्या माणसाचें काम पार पाडीत. मजूर ठेवण्याला पैसाच नसे. आणि एवढें करूनही हातीं येणारी रोकड पैन्पै गहाणावरील व्याजापायीं खलास होत असे. जॉन वूलवर्थशीं लग्न

करण्यांत आपली बहीण फॅनी हिनें स्वत:चें नुकसान करून घेतलें असें तिचा भाऊ अल्बॉन याचें मत होतें. आणि तें मत तिच्या तोंडावर सांगून टाकण्याला त्यानें मागेंपुढें पाहिलें नव्हतें.

अल्बॉन मॅक्ब्रिअर राहात असे तें पिलर पॉईंट हें खेडें वूलवर्थच्या शेतवाडीपासून पंचवीस मैल दूर होतें. वूलवर्थ कुटुंब कधीं कधीं त्या शेतवाडीवर जाई. अर्थात् वारंवार नव्हेच. श्रीमती वूलवर्थ जाणून होत्या कीं आपला भाऊ अल्बॉन याचा हेतु चांगला होता, पण मतप्रदर्शनांतला त्याचा नि:स्पृही स्पष्टपणा जरा अतिरेकी आहे असें त्यांना वाटे. आपल्या प्रांजळ वृत्तीच्या, कष्टाळू नवऱ्याच्या संसारांत आणि दोन छोटया आनंदी बछडयांच्या सहवासांत आपण सुखी आहों असें भावाला सांगून उपयोग नाहीं असें श्रीमती वूलवर्थना वाटे. त्या सांगण्यावर त्याचा विश्वासच बसला नसता.

अल्बॉनच्या दृष्टीनें, जो मनुष्य पुढें पुढें जात नाहीं तो सुखी होणें शक्यच नाहीं. जॉन वूलवर्थ कधींकाळीं प्रगति करील असें अल्बॉनला वाटत नव्हतें. पण मुलें मात्र कदाचित् आईला सुख देतील असें त्याचें मन सांगे. मुलांविषयीं त्याला आशा वाटे. दोन्ही मुलें चलाख होतीं. विशेषत: फ्रॅन्कचें डोकें तल्लख आहे असें अल्बॉनचे मत होतें. जर हा पोरगा आपल्या मामांच्या पावलावर पाऊल टाकील तर एक दिवस यशस्वी शेतकरी म्हणून पुढें येईल असें अल्बॉनचें भाकीत होतें.

फ्रॅन्कलाही आपला हा मामा फार आवडत असे. मॅक्ब्रिअर शेतवाडीवरचा त्याचा मुक्काम नेहमींच त्याला मजेशीर वाटे. त्याचा मामा अल्बॉन त्याला खाऊसाठीं पेनी देई. मामाच्या या औदर्याबद्दल भाच्याला कृतज्ञता वाटे. मात्र आपल्या या दयाळू उदार दात्याला फ्रॅन्कनें आपला बेत कधींच सांगितला नव्हता. आपल्याला शेतकरी व्हायचें नाहीं—उत्कृष्ट वा निकृष्ट, कोणत्याच दर्जाचा शेतकरी होण्याचें आपल्या मनांत नसून आपल्याला स्वत:चें दुकान काढावयाचें आहे ही गोष्ट त्यानें मामाला कधींच सांगितली नव्हती. आपला भाचा दुकानदार होऊं इच्छितो हें ऐकून मामाला खचित आनंद वाटला नसता. फ्रॅन्क ही गोष्ट जाणून होता.

आणि म्हणूनच फ्रॅन्कनें आपली महत्त्वाकांक्षा अल्बॉनमामाला कधींच सांगितली नव्हती. कोणालाच त्यानें ती गोष्ट सांगितली नव्हती. चार्लीला

सुद्धां सांगितली नव्हती. सांगण्याचा उपयोग काय? वडील माणसांनीं कानपिचक्या दिल्या असत्या आणि चार्ली त्याला हंसला असता. कांहीं वेळां आपल्या शिक्षिकेला आपल्या मनींचें गुपित सांगावेंसें त्याला वाटे. त्याला वाटे, कुमारी एमा पेनीमन आपल्याला कानपिचक्या देणार नाहीं कीं हंसून आपली टर उडविणार नाहीं. पण त्या शिक्षिकेलाही आपली महत्त्वाकांक्षा सांगण्याच्या बाबतींत त्याचा अति लाजाळुपणा आडवा येई.

फ्रॅन्क वूलवर्थचें रीतसर शिक्षण असें फारसें कधींच झालें नाहीं. तो काळ एक-शिक्षकी छोटया शाळांचा होता. सर्व वर्गांचीं मुलें एकाच खोलींत बसत आणि सर्वांना मिळून एकच शिक्षक असे. मोफत सार्वजनिक शाळा-पद्धति आज अमेरिकनांच्या अंगवळणीं पडली आहे, पण त्यावेळीं त्या पद्धतीची कुठें नुकतीच सुरुवात झाली होती. आणि त्या वेळच्या त्या मोफत सार्वजनिक शाळांचा अभिमान अमेरिकनांना जरी खूप वाटे तरी आजच्या काळांत त्या शाळांचें स्वरूप अगदींच जुनाट वाटेल.

त्या काळच्या एक-शिक्षकी शाळेंत आपल्या मुलांना पाठविलेंच पाहिजे अशी पालकांवर सक्ति नसे. ज्यांना 'पुस्तकी ज्ञानांत काय आहे?' असें वाटे असे बाप आपल्या मुलांना अजिबात शाळेंत पाठवीतच नसत. बहुसंख्य शेतकऱ्यांची धारणा अशी की मुलांना लेखन-वाचन नि आंकडेमोड आली कीं खूप शिक्षण झालें. मुलींना तर यापेक्षां कमी शिक्षण पुरेसें आहे असे त्यांना वाटे. घरीं वा शेतावर कामांत मदतीला मुलें हवीं असत तेव्हां सरळ त्यांना शाळेला बुट्टी मारण्यास फर्माविलें जाई. याउलट, तीन तीन वर्षांच्या मुलांची ब्याद घरीं नको म्हणून अनेक माता आपल्या मोठ्या मुलांबरोबर या छोटयांना शाळेंत पाठवून देत. प्रत्येक मुलगा सोळाव्या वर्षी शाळेला रामराम ठोकीत असे–अर्थात् त्याचें शिक्षण तेवढें वय होई-पर्यंत चालत राहिलें तर! मोठ्या माणसांची धारणा अशी कीं, जें काय शिकायला हवें तें सारें सोळाव्या वर्षापर्यन्त शिकून होतेंच आणि जर तें शिकून होण्याइतका पोरगा तल्लख नसेल तर मग त्यानें कामाला जुंपलें जाणेंच इष्ट होय.

अशा शाळांमधून शिक्षक म्हणून काम करणें फारसें कठीण नव्हतें. सोळा वर्षांच्या कोणाही मुलाला किंवा मुलीला एका सरकारी परीक्षेला बसावें लागे.

१२५३०९


अंकगणित, वाचन, लेखन, शुद्धलेखन व भूगोल इतके विषय परीक्षेला असत. ही परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्याला शिक्षकाचें प्रमाणपत्र बहाल करण्यांत येई. पगार कमी असे, पण जेवणारहाण्याची निराळी सोय होई. शिक्षक आळीपाळीनें पालकांकडे राहात असे आणि जेवत असे. एकाद्या विद्यार्थ्याच्या कुटुंबांत एक महिना राहिल्यावर दुसऱ्या विद्यार्थ्याच्या कुटुंबांत राहायला जायचें. शिक्षकाच्या जेवणारहाण्याची सोय करण्यास तयार असणारीं जितकीं कुटुंबें असतील त्या मानानें शाळेची ' टर्म ' सहा आठवड्यांपासून तों चार किंवा पांच महिन्यांच्या कालावधीची असे.

आज, असल्या प्रकारची शिक्षणव्यवस्था बघून आपणाला धक्काच बसेल. अर्थात् ही पद्धति निकृष्टच होती. पण, अशाही शिक्षणाचा परिपाक नेहमींच वाईट असे असें नव्हे. अशाच शाळेंत शिकून अब्राहम लिंकनसारखीं अनेक सुप्रसिद्ध माणसें उदयास आलीं. शिक्षणाची तळमळ विद्यार्थ्याला असेल, कसें शिकवावें हें जाणणारा शिक्षक असेल तर अनेकदां तसलें शिक्षणही आश्चर्यकारक रीतीनें फलदायी ठरूं शकतें.

फ्रॅन्क वूलवर्थ हा कांहीं अब्राहम लिंकन नव्हता. पण त्याला शिकायची तळमळ मात्र उत्कट होती. आणि त्याच्या सुदैवानें, शिकविण्याची आवड असलेली आणि शिकविण्याची हातोटी असलेली शिक्षिका त्याला लाभली होती.

ग्रेट बेंड शाळेंत शिक्षिका म्हणून एमा पेनीमन रूजू झाली तेव्हां ती फक्त सोळाच वर्षाची होती. त्या साध्या गंभीर वृत्तीच्या मुलीचें शिक्षण आठवीपलीकडे झालेलें नव्हतें. पण, तिला एक महान् साक्षात्कार झाला होता. सारें ज्ञान पुस्तकांत सांठवलेले असून ज्याला वाचतां येतें त्याच्या हातीं या ज्ञानभांडाराची किल्ली असते हें ती जाणून होती. ती खूप वाचन करीत असे. त्यासाठीं पुस्तकें खरेदी करीत असे ; तीं वाचून झालीं कीं आणखी पुस्तकें विकत घेत असे. निळें मुखपृष्ठ असलेल्या ' स्पेलर 'मध्यें आणि मॅकगफीच्या वाचन पाठमालेमध्यें नसलेल्या अनेक गोष्टी एमा पेनीमनला माहीत होत्या. आणि फ्रॅन्कच्या तोंडून त्याची बालिश महत्त्वाकांक्षा तिनें कधीं ऐकली नसती तरी त्या त्याच्या महत्त्वाकांक्षेला चालना देण्याला मात्र तिच्याकडून हातभार लागला होता. हा हातभार लावण्याचें श्रेय जसें एमा पेनीमनला तसेंच एका फ्रेंच सम्राटाला—नेपोलियन बोनापार्ट यालाही होतें.

कॉर्नर स्टोअरमधील त्या अपमानकारक प्रसंगानंतर कांहीं महिन्यांनीं घडलेली घटना. ग्रेट बेंडच्या शाळेंत एक दिवस कु. एमानें फरॅन्कच्या वर्गांतील सर्व मुलांना भूगोलाचा धडा शिकविण्यासाठीं आपल्या टेबला-भोंवतीं जमण्यास फर्माविलें. भूगोलाचा पाठ समाप्त झाल्यानंतर कोणत्या तरी उद्गारांमुळें कु. एमा इतिहास या विषयाकडे वळली. आपला हा न्यूयॉर्क संस्थानाचा उत्तर भाग केवळ जंगलें, टेकड्या, नद्या यांसाठींच महत्त्वाचा आहे असें नव्हे; तर येथें अनेक महत्त्वाच्या नि खळबळजनक घटना घडून गेल्या आहेत, असें सांगून तिनें अशा कांहीं घटना निवेदन केल्या. अगदीं एकाग्र मन करून मुलें शिक्षिकेचें बोलणें ऐकत होतीं.

जवळच असलेल्या ऑन्टोरिओ सरोवराच्या कांठींच या खंडाचा कवजा कोणाचा हें ठरविण्यासाठीं ब्रिटिश व फरेंच यांना संग्राम झाला होता. याच वनराजींत क्रांतिकालांतही अनेक चकमकी झडल्या होत्या. रेडइंडियन लोक आणि श्वेतवर्णीय वसाहतवाले यांचीं युद्धेंहि या भूमीवर लढलीं गेलेलीं होतीं. आणि वॉटरटाऊनपलीकडे दहा मैलांपेक्षां कमी अंतरावर असलेल्या सॅकेट्स् हार्बर या ठिकाणींच जनरल झेबुलॉन पाइक याची कबर होती.

शिक्षिकेनें मुलांना प्रश्न केला, "कोणत्या लढाईंत जनरल पाईक धारातीर्थीं पडला हें कोणाला माहीत आहे काय? ओर्लॅंडो, तुझं घर सॅकेट्स् हार्बरच्या बाजूलाच आहे. तुला माहिती असायला हवी."

"मला माहिती आहे, बाई!" ओर्लॅंडो म्हणाला. हा पोरगा शरीरानें जाडजूड होता नि त्याचे दाट तांबूस केंस भुरभुरत असत. उत्तर देण्यासाठीं तो धडपडत उभा राहिला. एका प्रश्नाचें अचूक उत्तर देण्याइतकी माहिती ओर्लॅंडोला नेहमींच असे, असें नव्हे. पण शिक्षिकेच्या वरील प्रश्नाचें उत्तर मात्र त्याला माहीत होतें.

तो अभिमानानें सांगू लागला, "माझे आजोबा त्या लढाईंत होते. ते खलाशी होते. बंदरांत खूप जहाजें जमलीं होतीं. सर्व जहाजांवर सैनिकांची अगदीं दाटी झालेली होती. म्हणून मग-मग कांहीं जहाजं पलिकडे टोरोन्टोला गेलीं. फार तुफान गोळीबार झाला. आम्ही किल्ल्याला खिंडार पाडलं. शत्रूला माघार घ्यायला लावली. लढाईंत सेनापति ठार झाला. पण विजय आमचाच झाला."

ओर्लांडोनें बसतां बसतां विजयी मुद्रेनें सर्व मुलांकडे बघितलें.

कु. एमा स्मितपूर्वक म्हणाली, "छान -माहिती सांगितलीस, ओर्लांडो. तुझ्या आजोबांबद्दल तुला अभिमान वाटलाच पाहिजे. बरं, आतां, तुझे आजोबा ज्या युद्धांत लढले त्या युद्धाला कोणतं युद्ध म्हणतात तें सांगूं शकशील का ? "

ओर्लांडोनें नकारार्थी मान हलविली. त्या लढाईचें वर्णन त्यानें आजोबांच्या तोंडून ऐकलें होतें, पण त्या युद्धाला कांहीं नांव असेलच तर तें आपल्या शूर आजोबांनीं सांगितल्याचें कांहीं त्याला आठवत नव्हतें.

कु. एमानें सर्व मुलांना उद्देशून विचारलें, " कोण सांगतं ? "

" १८१२ चें युद्ध ! " सर्व मुलें सांघिक सुरांत उत्तरलीं.

" फारच छान. बरं, आतां, हें १८१२ चं युद्ध कसं सुरू झालं तें कोण सांगूं शकेल ? "

प्रश्न विचारून शिक्षिका सर्वांवरून नजर फिरवूं लागली. तिला सर्वांचे चेहरे निर्विकार दिसले. मग तिनें मुलांना त्या युद्धाची सर्व कहाणी अगदीं प्रारंभापासून – बोनापार्टच्या महत्त्वाकांक्षेमुळें सर्व यूरोप खंड त्याच्याविरुद्ध कसें उठलें येथून सुरुवात करून–सर्व माहिती मुलांना कथन केली.

' बोनापार्ट ' हें नांव शिक्षिकेच्या तोंडन ऐकतांच फ्रॅन्क वूलवर्थनें हात वर केला. त्याबरोबर एमा बोलतांना थांबली. विद्यार्थ्यांना जें माहीत असेल तें सांगण्याची संधि त्यांना देण्याला ही शिक्षिका सदैव तयार असे.

आपलें कथन थांबवून शिक्षिकेनें विचारलें, " काय, फ्रॅन्क ? तुला बोनापार्टची कांहीं माहिती आहे ? "

" खूप खूप माहिती आहे मला त्याची— " उतावीळ स्वरांत फ्रॅन्क म्हणाला, " मी त्याचं तें सरोवर बघितलंय्. गेल्या वर्षी बाबा कालवडी खरेदी करायला तिकडे गेले होते तेव्हां मीही त्यांच्याबरोबर गेलों होतों. तिथें पूर्वीं मोठा किल्ला होता, पण आतां ो पार पडून गेलाय्. अन् त्या सरोवरांत म्हणे त्या ' बोनी-पार्ट ' ची एक मोठी अन् चित्रविचित्र दिसणारी नौका होती. आपल्या देशांतून त्यानं खास विकत आणली होती ती नौका. आम्हांला ही हकिकत सांगणाऱ्या शेतकऱ्यानं तिचं–म्हणजे त्या चित्रविचित्र नौकेचं नांवही सांगितलं होतं. अन् ' बोनी-पार्ट '

आपल्या साऱ्या मित्रांना घेऊन जंगलांत शिकारीला जात असे. सर्वजण घोड्यावर बसून शिकारीला जात, अन्— ''

" थोडा थांब हं, फ्रॅन्क–" स्मितपूर्वक त्याला अडवीत कु. एमा म्हणाली, " तुझ्या सांगण्यावरून असं दिसतं कीं, नेपोलियनच्या भावाची माहिती तुला खूप आहे. पण तें युद्ध पुकारणारा बोनापार्ट तो हा नव्हे. "

" काय, तो नव्हे ? '' फ्रॅन्क धक्का बसल्यागत उद्‌गारला, " म्हणजे, एक नव्हे तर दोन ' बोनापार्ट ' होते असं म्हणायचंय् तुम्हांला ? ''

" हो, तसंच सांगायचंय् मला. न्यूयॉर्क संस्थानांत इथून जवळच शिकारघर उभारणारा तो जोसेफ बोनापार्ट होता नेपोलियन या महापुरुषाचा तो भाऊ. अन् फ्रॅन्क, त्याची नौका होती ना, तिला ' गॉन्डोला ' म्हणतात. तशा होड्या व्हेनिसमध्यें वापरतात. अरुंद नि लांबीला जास्त असतात त्या होड्या. जोसेफच्या अमेरिकेंतल्या जीवनाबद्दलची माहिती देणारं एक पुस्तक माझ्यापाशीं आहे. तुला पाहिजे असेल तर घे वाचायला. पण, सध्यां आपण १८१२ च्या युद्धाबद्दल बोलत आहोंत. बरं का मुलांनो, नेपोलियन बोनापार्टनं सुरू केलं तें युद्ध– "

शाळा सुटतांच फ्रॅन्कनें तें पुस्तक शिक्षिकेकडून मागून घेतलें आणि अत्यन्त काळजीपूर्वक मन लावून वाचून काढलें. पुस्तकांत नेपोलियनच्या जीवनाची माहिती होती. त्याच्या घराण्याबद्दलचीहि त्यांत कांहीं माहिती होती. आपल्या भावाचा पाडाव झाल्यावर अमेरिकेंत वास्तव्याला आलेल्या जोसेफबद्दलची माहिती फ्रॅन्कनें आवडीनें वाचली. पण, नेपोलियनच्या कर्तबगारीनें त्याचें लक्ष अधिक वेधून घेतलें

बाबांच्या शेतांतले बटाटे काढण्यासाठीं खुरपणें चालवीत असतांनाच छोटा फ्रॅन्क वूलवर्थ मनाशीं नेपोलियनच्या चरित्रावरच विचार करूं लागला. एका गरीब घरच्या पोरानें सम्राट होण्याचा निर्धार केला आणि कोणत्याहि अडचणींना न जुमानतां आपलें ईप्सित गांठलें. एकाद्याला सम्राट व्हावेंसें कां वाटावें या प्रश्नाचें उत्तर फ्रॅन्कला सुचत नव्हतें. लढायावर लढाया करायच्या, लोकांना आपल्या भजनीं लावायचें आणि अखेर तुरुंगांत खितपत राहून मरून जायचें हें सारें त्याला निरर्थक वाटलें. पण, त्याच्या मनावर ठाम ठसली ती गोष्ट ही कीं,

**अगदीं कसून प्रयत्न केला तर माणसाला पाहिजे ते मिळवतां येतेंच** तुमचा जन्म श्रीमंत कुळांत झाला पाहिजे असेंच नव्हे. तुम्हांला कोणाची. मदत आणि मार्गदर्शन पाहिजे असेंहि नव्हे. फक्त तुम्ही मनाचा निर्धार करायला हवा नि त्याला पक्कें चिटकून रहायला हवें. एकदां ठरवलें तें ध्येय सोडून मध्येंच अन्य मार्ग पत्करतां कामा नये. तुम्हांला काय साधायचें आहे तें नीटपणें पारखून नि त्याचाच पाठलाग करायला हवा.

फ्रॅन्कनें पुन्हां तें पुस्तक वाचायला घेतलें आणि जोसेफबद्दलची माहिती पुन्हां एकदां वाचून काढली. जोसेफ सेनापति झाला होता; स्पेनचा राजाही झाला होता. पण तें शक्य झालें केवळ भावाच्या मदतीमुळें. भाऊ नसता तर कांहीं जोसेफ सेनापति वा राजा होऊ शकला नसता. म्हणजे तो चार्ली-सारखा होता. चार्लीला नेहमींच कोणाची ना कोणाची मदत लागते. पण नेपोलियनला कोणाचीच मदत नव्हती. आपल्याला काय मिळवायचें आहे हें त्याला माहीत होतें. आणि केवळ स्वतःच्या हिंमतीवरच त्यानें तें मिळविलें. यावरून हेंच दिसून येतें कीं तुम्ही निर्धार कराल नि त्याला चिकटून राहाल तर तो पार पडणें कठीण नसतें. जवळ छदामही नसतांना एका कॉर्सिकन पोरानें करामत केली ती यॉर्क संस्थानांतल्या पोराला कां करतां येऊं नये ?

सर्व आयुष्यभर फ्रॅन्क वूलवर्थला स्वत:चा स्वत:च विचार करण्याची संवय होती. त्यानें नेपोलियनची कहाणी पुन: पुन: वाचून काढली. नेपो-लियनची तंतोतंत प्रतिमा बनायचा तो प्रयत्न करतो, असें त्याचा मामा नेहमीं म्हणे. पण तसा विचार फ्रॅन्कनें कधींच केला नव्हता. फ्रॅन्क हा शांत वृत्तीचा, प्रेमळ पोरगा होता. लष्करी सन्मान वा राजकीय सत्ता याची भूक त्याला नव्हती. त्याला फक्त विविध-वस्तु-भांडाराचा मालक बन-ण्याची आस लागून राहिलेली होती. पण, नेपोलियन सम्राट बनण्यासाठीं जितका तळमळत होता, त्याला जसें दुसरें कांहींच नको होतें तसाच फ्रॅन्क दुकानदार बनण्यासाठीं तळमळत होता; दुसरें कांहींच त्याच्या मनास आलें नसतें. त्या ध्येयामागें तो धांवणार होता आणि तें गांठणार होता. त्या मार्गावरून तो कोणत्याही कारणासाठीं विचलित होणार नव्हता. कोणा-लाही जुमानणार नव्हता. एक ना एक दिवस तो स्वत:च्या मालकीचें दुकान निश्चितपणें काढणार होता.

✦ ✦ ✦

☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆

# नोकरी कोठें मिळेना ! : ३ :

☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆

कधीं हजेरी, तर कधीं गैरहजेरी अशा पद्धतीनें फ्रॅन्कचें शिक्षण त्याच्या सोळाव्या जन्मदिनापर्यंत चालू होतें. शाळेंतून तो वारंवार गैरहजर राही. याला दोन कारणें होतीं. जेव्हां जेव्हां शेतवाडीवरील काम, विशेषतः खूप असे तेव्हां तेव्हां मदतीसाठीं बाबा त्याला घरीं ठेवून घेत असत. इतर वेळीं, आजारीपणामुळें पोरगा शाळेंत जायला असमर्थ आहे असें बघून त्याची आई त्याला शाळेंत जाऊं देत नसे.

मिश्रीती वूलवर्थना आपल्या या थोरल्या मुलाच्या प्रकृतीविषयीं नेहमींच काळजी वाटत असे. त्याची उंची वाढत होती आणि अंगकाठी मात्र फारच किरकोळ होती. त्याला एवढ्याशा निमित्तानें पडसें येई आणि या पडशापायीं बहुधा त्याचा घसा धरून ताप येई. शेतावर सबंध दिवस केलेल्या काबाडकष्टांनीं तो इतका थकून जाई कीं, रात्रींचें भोजन व्यवस्थितपणें करण्याइतकाही उत्साह त्याच्यांत राहात नसे. "माझा फ्रॅन्की भारीच नाजूक आहे !" असें श्रीमती वूलवर्थ मनाशीं म्हणत. आणि शेतावरील अति कष्टाचें काम झेपण्याइतका कांहीं आपला हा मुलगा धडधाकट नाहीं असें आईला हळूहळू वाटूं लागलें होतें.

आणि म्हणूनच आपल्या आकांक्षा फ्रॅन्कनें जेव्हां आईजवळ बोलून दाखविल्या तेव्हां तिनें सहानुभूतीपूर्वक त्याचें म्हणणें ऐकून घेतलें. फ्रॅन्कला सोळावें वर्ष लागण्याआधी थोडेच दिवस हें बोलणें झालें. फ्रॅन्कची शाळेला रामराम ठोकण्याची वेळ आली होती. आतां त्यानें सबंध दिवसभर शेतावर काम केलें पाहिजे अशी स्वाभाविकच त्याच्या बाबांनीं अपेक्षा केली असती. जर कांहीं आगळाच मार्ग चोखाळायचा असेल तर, त्याबाबत निर्णय करण्याची वेळ तीच होती.

दूध-दुभत्याच्या पडवींत ताक घुसळून लोणी काढण्यांत आई एकटीच गर्क आहे असें बघून फ्रॅन्क तिच्यापाशीं गेला. चार्ली शेतांत बाबांबरोबर काम करीत होता. आईशीं स्वास्थ्यानें बोलण्याची संधि त्याला प्रथमच मिळाली.

चांचरत चांचरत बोलत फ्रॅन्कनें आपलें सारें स्वप्न सांगून टाकलें. "मला शेतकरी बनायचं नाहीं. शेतकरी बनण्याचा माझा कधींच विचार

नव्हता. घरीं राहून बाबांबरोबर शेतांत राबण्यापेक्षां मला मरण परवडेल. माझी एकमेव इच्छा गांवांत जाऊन एकाद्या दुकानांत नोकरी करणं हीच आहे. दुसरं कांहींच मी करूं इच्छित नाहीं."

बोलणें संपवून तो अगदी काकुळतीच्या दृष्टीनें आईकडे बघूं लागला. आईही त्याच्याकडे बघत मनाशीं विचार करूं लागली. त्याचें बोलणें म्हणजे कांहींसा आश्चर्याचा अनपेक्षित धक्काच होता. 'पण त्यावरची आपली प्रतिक्रिया अनुकूल असावी कीं प्रतिकूल ?'—आई मनाशीं विचार करीत होती. तिला नेहमींच वाटत आलें होतें कीं, त्याचे वडील ज्या प्रकारचें जीवन व्यतीत करतात त्या प्रकारचें जीवन व्यतीत करण्याइतका कांहीं आपला हा मुलगा धडधाकट नाहीं. आणि आतां तिला आढळून आलें कीं, मुलाला त्या जीवनाबद्दल आवडही नाहीं. मग, त्याच्यावर सक्तीनें तें जीवन कां म्हणून लादावें ? जर स्वत:चें पोट भरण्याचा मार्ग त्याला सुलभपणें शोधून काढता येत असेल तर त्याला शेतावरच कां म्हणून डांबायचें ? दुकानदारी हा देखील एक योग्यच व्यवसाय आहे. जर फ्रॅन्कीला त्या व्यवसायांत शिरण्याची इच्छा असेल तर त्यानें तसें कां करूं नये ?

फ्रॅन्क उत्कंठेनें आईकडे बघत होता. तो म्हणाला, "मला ठाऊक आहे कीं, बाबांना माझा विचार आवडणार नाहीं. पण, तू जर माझ्या बाजूची असशील तर बाबांचं मन वळवणं तुला सहज शक्य आहे. प्रश्न एवढाच कीं, तुला माझा विचार मान्य आहे कीं नाहीं ? आहे का, आई ?"

आईनें स्मित करीत, त्याच्या खांद्यावर थोपटीत म्हणलें, "मी तुझ्याच पक्षाची आहे बरं, फ्रॅन्की. त्याबद्दल तूं काळजी करूं नकोस. अन् आपल्याला शेतकी काम आवडत नाहीं तर मग कोणतं काम आवडेल हें निश्चित ठरवलंस हें छानच झालं. तुझं डोकं तल्लख आहे, पोरा. माझा भाऊ अल्बॉन सुद्धां हेंच म्हणतो. मात्र मला नाहीं वाटत कीं तुझा हा नवा बेत तुझ्या मामाला पसंत पडेल. तुझ्या बाबांइतकाच मामादेखील तुझ्या नव्या बेताला प्रतिकूलच असेल."

फ्रॅन्क खेदपूर्ण स्वरांत म्हणाला, "तुझ्या-माझ्याखेरीज माझा बेत कोणालाच आवडणार नाहीं याची मला कल्पना आहे. पण, आई, मला तेंच करायचंय्. मला करावासा वाटेल असा तोच एकमेव व्यवसाय आहे."

" तें माझ्या लक्षांत आलंय्. अन् माझ्याकडून होईल तितकी मदतच करीन मी तुला. पण, तुझ्या बाबांची संमति मिळवणं, यापेक्षां आणखी कांहीं अडचणी आहेत कीं ! दुकानांतली नोकरी तूं कशी मिळवणार ? गांवांतले अनेक तरुण अशा नोकऱ्यांच्या मागावर असणार. अशा परिस्थितींत मालक एकाद्या खेडवळ मुलालाच कां म्हणून नोकरीस ठेवतील ?"

" मी त्याचाही विचार केलाय्," फ्रॅन्क उतावीळ स्वरांत म्हणाला, "गांवांतील मुलांना जें येत नाहीं असं कांहीं तरी जास्त मी शिकलं पाहिजे. दुहेरी नोंदपद्धतीचा जमाखर्च मला लिहितां येत असला तर दुकानदारांच्या दृष्टीनं मला कांहीं तरी किंमत राहील."

" पण तुला तर जमाखर्च ठेवण्याची कांहींच माहिती नाहीं." आईनें हरकत उपस्थित केली.

" पण मी तें शिकूं शकेन, आई ! अंकगणित हा विषय माझा सर्वांत चांगला आहे. एमाबाई तुला याबद्दल ग्वाही देऊं शकतील. तेव्हां जमाखर्च शिकायला मला फार दिवस लागणार नाहींत. अन् वॉटरटाऊनमध्यें एक माणूस आहे, तो जमाखर्च ठेवायला शिकवण्याच्या खाजगी शिकवण्या करतो. संगीत-वर्गाप्रमाणेंच जमाखर्चाचा वर्ग. त्याच्यापाशीं कांहीं थोड्या दिवसांत शिकून घेतलं तर–"

" अरे पण, फ्रॅन्की, त्या वर्गांत जायचं म्हणजे खूप पैसे लागतील कीं ! अन् शेतकामाचा तुझा बराचसा वेळ देखील जाईल."

" फार वेळ खर्ची पडणार नाहीं तसा." अगदीं गळ घालण्याच्या स्वरांत फ्रॅन्क म्हणाला, " शाळेंत जितका वेळ जाईल त्यापेक्षांही कमीच वेळ खर्ची पडेल त्यासाठीं माझा. कदाचित् दिवसाचीं सारीं कामं संपल्यावरच, म्हणजे संध्याकाळीं जेवण झाल्यावरच तो माणूस माझी शिकवणी घेईल. वेळेचा प्रश्न महत्त्वाचा नाही. मला सतावणारा प्रश्न निराळाच आहे. त्यासाठीं पैसे कुठून आणायचे ? " फ्रॅन्कनें प्रांजलपणानें आईला आपली अडचण सांगितली.

" किती पैसे पडतील ? "

" एका धड्याला पंधरा सेंट. अन् एकूण अभ्यासक्रम चोवीस पाठांचा आहे. म्हणजे, एकूण बारा डॉलर होतील."

बारा डॉलर ! ही रक्कम अनेक लोकांच्या दृष्टीनें मोठी नव्हे. पण दारिद्र्यांत बुडालेल्या वूलवर्थ कुटुंबाच्या दृष्टीनें ती रक्कम खूपच–अगदीं छातींत धस्स वाटावें इतकी मोठी होती.

फॅनी वूलवर्थ एक सबंध मिनिटभर विचारमग्न बसून गप्प होत्या. नंतर त्या अगदीं सावकाशपणें म्हणाल्या, "तेवढे पैसे सांचवून ठेवलेले आहेत मी फ्रॅन्की. आजारीपण किंवा अशाच कांहीं अनपेक्षित अडचणीसाठीं ठेवलेत ते पैसे मी. तुझ्या वडिलांना तें ठाऊक नाहीं. पण, आतां त्यांना सांगू. अन् असंही सांगू कीं एका चांगल्या कामींच ते पैसे खर्ची पडणार आहेत."

फ्रॅन्कनें आईला एकदम मिठीच मारली. मधूनच तुरळक पांढरा केंस डोकावूं लागलेल्या तिच्या भरदार काळ्या केशसंभारावरून हात फिरवीत तो आनंदानें उद्‌गारला, "आई, तुला कधींच पश्चात्ताप करण्याचा प्रसंग येणार नाहीं. मी मिळवूं लागतांच तुझे पैसे परत करीन. अन् माझं स्वतःचं दुकान निघेल तेव्हां त्यांतील हवी ती वस्तु घेण्याचा पहिला मान तुझाच असेल."

"तुझं स्वतःचं दुकान !" आई हंसत म्हणाली, "बाई, बाई ! एकदम भलत्याच उंच वावड्या उडवायला लागलों कीं रे आपण ! हें बघ, उगीच डोक्यांत वेडगळ कल्पना भरवून घेऊं नकोस, फ्रॅन्की !"

"पण, आई ! माझ्या डोक्यांत फक्त एकाच कल्पनेला जागा आहे," फ्रॅन्क तळमळीनें म्हणाला, "अन् खात्री बाळग कीं ती कल्पना वेडगळ नाहीं."

आईनें फ्रॅन्कच्या बाबांना त्याचा बेत सांगितला अन् नवऱ्यानें उपस्थित केलेले सारे आक्षेप खोडून काढले. अखेर कुरकुरत कां होईना संमति द्यायला त्याच्या वडिलांना तयार करण्यांत आई यशस्वी झाली. त्या अवधींत फ्रॅन्कनें वॉटरटाऊनमधील त्या 'प्रोफेसरा'कडे फ्रॅन्कची शिकवणी ठरवूनहि टाकली होती. आठवड्यांतून चार दिवस संध्याकाळीं तो गाडी घेऊन त्या 'प्रोफेसरा'च्या घरीं जाऊं लागला आणि सहा आठवड्यांत कोरें करकरीत प्राविण्यपत्रक संपादन करून त्यानें पहिली नोकरी शोधण्यासाठीं प्रस्थान ठेवलें.

नव्या मार्गावर पाऊल ठेवण्यासाठीं फ्रॅन्कनें कांहीं चांगला मुहूर्त निवडला नव्हता. दिवस फारच वाईट आले होते. यादवी युद्धाच्या समाप्तीनंतर धंदाव्यवसायांत मंदीची लाट आली होती. अन् ही मंदी कांहीं वर्षें

तशीच चालू होती. भाव भडकले होते, तर पैशाची मात्र चणचण होती. दुकानदार नवे नोकर ठेवण्याऐवजीं जुन्यांनाच वाटेला लावीत होते. युद्धावरून परतलेल्या सैनिकांनाच उपलब्ध नोकऱ्यांच्या बाबतींत अग्रक्रम दिला जात होता. आणि कांहींच पूर्वानुभव नसलेल्या खेडवळ पोराला नोकरी द्यायला कोणी राजी होत नव्हतें.

शाळा सोडल्यानंतरचीं फ्रॅन्कची चार वर्षें फारच वाईट गेलीं. "आईचे कष्टपूर्वक जमवलेले पैसे निरर्थक गोष्टीवर उधळले !" असे सखेद उद्‌गार बाबा वारंवार काढीत असत. "मी भविष्य केलं होतं तसंच झालं !" असें म्हणण्याची संधि त्याचा मामा अल्बॉन एकदांही दवडीत नसे. फरॅन्कनें आपला मूर्खपणाचा विचार सोडून द्यावा आणि सरळ शेतकीचा व्यवसाय करूं लागावें असा आग्रह बाबा-मामाकडून त्याला सारखा चालू असे

त्या चार वर्षांच्या प्रतिकूल कालखंडांत फ्रॅन्कला शेतीवरच्या कामांत सतत जुंपून घ्यावें लागत होतें. जेव्हां बाबांना त्याची मदत नको असेल तेव्हां फ्रॅन्क शेजारच्या शेतकऱ्यांकडे लाकडें तोडण्याचें आणि शेतांतील खुंट उपटण्याचें काम करीत असे. या कामाबद्दल मिळालेला पहिला डॉलर हातीं पडतांच तो आईपाशीं गेला.

तो आईला म्हणाला, "जमाखर्चाचे पाठ घेण्यासाठीं माझ्यापायीं तुझा झालेला खर्च भरून द्यायला मला खूप दिवस लागणार आहेत. पण मी तुझी पै न् पै फेडून टाकीन, आई."

तें चांदीचें नाणें परत त्याच्या हाती देत श्रीमती वूलवर्थ म्हणाल्या, "नाहीं, फ्रॅन्की. तूं माझं कांहींच देणं लागत नाहींस. तुझे पैसे तूं तुझ्या-पाशींच बचत करून ठेवीत जा. पुढंमागं तुला उपयोगी पडतील. कदाचित् तूं काढणार असलेल्या दुकानाकरतांही ते उपयोगी पडतील."

केविलवाणें स्मित करीत आईकडे बघून फरॅन्क म्हणाला, "म्हणजे, आई, मी दुकान काढीन असा विश्वास कांहीं तुला वाटत नाहीं, होय ना ? माझ्याखेरीज कोणालाच तसा विश्वास वाटत नाहीं. अन् कांहीं कांहीं वेळां माझ्यावरती ही निरुत्साहाचा पगडा बसतो. मला वाटतं, नेपो-लियनला सुद्धां असेच निराशेचे धक्के खावे लागले असतील; पण त्यानं आपल्या प्रयत्नांत कधींच कसूर केली नाहीं. तें असो, मला एकादा जुनापाना

पायमोजा दे बघूं. त्यांत पैसे ठेवायचे आहेत मला. मी कमावलेली प्रत्येकी पेनी मी बचत करणार आहें. पण, जर तुला पैसे लागले कधीं तर –"

" मला कधींच ते पैसे लागणार नाहींत, पोरा ! तुला मात्र लागतील. आपला मार्ग स्वतःच्या हिंमतीवर चोखाळणाऱ्याजवळ थोडेसे रोख पैसे असले तर कधींच वाया जायचे नाहींत. तुला जें हवं तें कर त्या पैशांचं." आपल्या शिवणकामाच्या टोपलींत धुन्डाळून एक पायमोजा काढून त्याला देत आई म्हणाली, " या तांबड्या मोजाच्या जोडीचा दुसरा नाहीं. हा चालेल तुला ? "

" वा, फारच छान ! तांबडा हा तर माझा आवडता रंग ! अन् कदाचित् तो रंग मला लाभणारा सुद्धां ठरेल." डॉलरचें नाणें पायमोजाच्या तळापर्यंत खुपशीत फ्रॅन्क निर्धारपूर्वक म्हणाला, " माझ्या मालकीचं दुकान काढायच्या दृष्टीनं हा डॉलर म्हणजे अगदींच मामुली रक्कम, नाहीं का, आई ? पण, ही सुरुवात आहे. तूं बघशीलच, आई, बघशीलच तूं. कांहीं झालं तरी माझं दुकान निघेलच निघेल.

तो आत्मविश्वासानें बोलत होता, पण त्याच्या मनश्चक्षूपुढील आशेचा प्रकाश मात्र हळूहळू मंद होत चालला होता. वॉटरटाऊनमधील दुकानांत त्यानें नोकरी मिळविण्याचे प्रयत्न केले. आसपासच्या अनेक लहान गांवांतील दुकानांतही खटपट करून पाहिली. पण खुद्द ग्रेट बेंड खेड्यांत जें छोटेंसें सर्ववस्तुभांडार होतें त्याचा मालक डॅनिअल मॅक्नील यानेंच काय ती त्याची थोडी तरी दाद घेतली. म्हणजे त्यानें नोकरी देऊं केली असें मात्र नव्हे. डॅनिअल मॅक्नील त्याला थोडासाही पगार द्यायला असमर्थ होता. पण कामाचा अनुभव संपादन करण्यासाठीं जर हा पोरगा येणारच असला तर वेळ मिळेल तेव्हां त्याला दुकानांत बसूं द्यायला हा दुकानदार तयार झाला होता इतकेंच !

मॅक्नीलची ही सूचना फ्रॅन्कनें आनंदानें स्वीकारली. कारण सर्वच मोठ्या-छोट्या दुकानदारांची 'अनुभव पाहिजे' हीच अट असे. फ्रॅन्क सर्व दिवसभर शेतावरील कामांत गुंतलेला असे; पण संध्याकाळचा सारा वेळ तो मॅक्नीलच्या दुकानांत घालवूं लागला. कामाची आवड नि हौस असलेला, कामाची माहिती झटपट आत्मसात् करणारा हा पोरगा आहे

असें म्हाताऱ्या मॅक्नीलला आढळून आलें. त्याच्या दुकानांत काम करून फ्रॅन्कला कांहींच प्राप्ती झाली नसली तरी, एक उपयोगी पडणारें जिव्हाळ्याचें माणूस त्यानें जोडलें होतें.

१८७३ च्या मार्चमधील एका संध्याकाळीं बर्फवृष्टि होत होती. त्या दिवशीं फरॅन्क वूलवर्थ नेहमींप्रमाणें दुकानांत आला नाहीं. नऊ वाजतां दुकान बंद करण्याची वेळ झाली. मॅक्नीलनें दुकानाला कुलूप घातलें आणि बर्फवृष्टींतून वाट काढीत तो घरीं आला. घरीं तो आपले कपडे काढून ठेवतो न ठेवतो तोंच त्याला दरवाजावर थाप बसलेली ऐकूं आली.

पायरीवर फ्रॅन्क वूलवर्थ उभा होता. आतां फरॅन्कचें वय जवळ जवळ एकवीस होतें. तो उंच नि किडकिडीत दिसत होता. आणि त्याच्या निळ्या डोळ्यांत नेहमींच एक प्रकारचा अस्वस्थतेचा भाव तरळत असे. आज ही अस्वस्थता नेहमींपेक्षां जास्तच दिसत होती. म्हाताऱ्या दुकानदारानें त्याला धगधगत्या शेगडीजवळच एका खुर्चीवर बसायला सांगितलें. फरॅन्क आपली सारी हकिकत सांगत असतांना म्हातारा शांतपणें पण सहानुभूतिपूर्वक ऐकून घेत होता.

आज दुपारीं फ्रॅन्कचा मामा अल्बॉन मॅक्ब्रिअर आला होता. त्यानें फ्रॅन्कला कायमची शेतावरची नोकरी देऊं केली होती. खाऊन पिऊन अठरा डॉलर मासिक पगार द्यायला तो तयार होता. ही नोकरी फ्रॅन्कनें पत्करावी असें बाबांचें ठाम मत पडलें. आतां घरच्या शेतावर मदत करण्याइतका चार्ली मोठा झाला होता. फ्रॅन्कला नोकरी करण्यासाठीं मुभा देणें सहज शक्य होतें.

आणि या प्रश्नावर त्या कुटुंबांत दुपारीं खूप वेळ चर्चा झाली होती. दुकानांतील नोकरी मिळविण्याची आशा आपल्याला अद्याप वाटते असें फ्रॅन्कनें चांचरत चांचरत सांगितलें तसा त्याचा मामा खूप संतापला. " मी मामांची सूचना पत्करली तर त्याचा अर्थ असा कीं पुढील आयुष्यभर मी शेतकी व्यवसायालाच वाहून घ्यायचं; अन् तें तर मला नको आहे, " तो म्हणाला.

बाबांनीं खरडपट्टी काढली. मामा अल्बॉन संतापानें लाल झाला. पण फ्रॅन्क आपल्या निर्धारापासून विचलित व्हायला तयार होईना. अखेर त्याच्या आईनें तडजोड सुचवून वाद मिटविला. भावाची बरीच मनधरणी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 32846 दि.
9086 2/3/62


करून तिनें सुचविलें कीं, आणखी दोन आठवडेपर्यंत अल्वीननें आपला देकार मागें घेऊं नये. तिनें फ्रॅन्कलाही कबूल करायला भाग पाडलें कीं तेवढ्या मुदतींत जर तो दुकानांतील नोकरी मिळवूं शकला नाहीं तर मात्र त्यानें मामानें देऊं केलेली नोकरी पत्करली पाहिजे.

एवढें सांगून फ्रॅन्क मॅक्नीलला म्हणाला, "अन् मला तर चार वर्षांत अशी दुकानांतील गुमास्त्याची नोकरी मिळवतां आलेली नाहीं. मग, दोन आठवड्यांत मी कशी मिळवणार ती ? मला फार काळजी लागून राहिलीय्. का हो मॅक्नील, आतां मी काय करावं असं वाटतं तुम्हांला ? "

ओठांतील चिलीम काढून घेत म्हातारा बोलूं लागला. "प्रश्न असा आहे, फ्रॅन्क, कीं तूं काय करूं शकशील ? तुझ्या मामाची सूचना तशी फार चांगली आहे. ती नोकरी न पत्करणं हा शुद्ध मूर्खपणा ठरेल असंच बहुतेक जण म्हणतील. थांब, थांब, तुला काय म्हणायचंय् हें सांगण्याची जरूरी नाही. तुला ती नोकरी नकोय् हें मला माहीत आहे. मला देऊं केली तर मी स्वतः देखील ती पत्करणार नाहीं. कांहीं जणांचा पिंडच शेतकरी बनण्याला योग्य असतो. पण कांहीं जणांचा नसतो. जसा माझा तसाच तुझाही तो पिंड नव्हे. तेव्हां आतां बघूं या काय करणं शक्य आहे तें. मला वाटतं, तूं कॉर्नर स्टोअरमध्यें खटपट केली होतीस, होय ना? "

"हो, पण, पहिल्या विक्रेत्यानं मला उडवून लावलं," फ्रॅन्क उत्तरला, "माझ्या मानानं तें फारच बडं प्रस्थ आहे. अन् तशी जाणीव त्या विक्रेत्यानं मला द्यायला कमी केलं नाहीं."

"तें असो. मीं त्या दुकानाच्या घाऊक विक्रीच्या शाखेबरोबर कांहीं व्यवहार करतों. मी तुझ्याबद्दल ऑग्जबरींपाशीं बोललों तर कांहीं उपयोग होईल कीं काय हा प्रश्न आहे, पण बघूं या. मी तुझी चांगली शिफारस करीन. तेव्हां असं करूं, मी लौकरच वॉटरटाऊनला माल खरेदीला जाणार आहें. त्यावेळीं मी ऑग्जबरींशीं बातचीत करीन."

"मला फक्त दोन आठवड्यांचीच मुदत मिळालीय्. फ्रॅन्कनें जाणीव दिली.

"ठीक आहे, दोन आठवड्याच्या आंतच मी जाणार आहें. अर्थात् नक्की दिवस मी सांगूं शकत नाहीं. बरं, मी तुला सांगितलंय् का, कीं

यापुढं सध्यां तुझी मदत मला लागणार नाहीं ? कारण, माझ्या बहिणीचा मुलगा माझ्याकडे आलाय्. तरी पण, कांहीं बातमी असली सांगण्यासारखी माझ्याकडे तर विचारण्यासाठीं येत जा मधून मधून."

फ्रॅन्क पहिल्या आठवड्यांत रोजच मॅक्नीलच्या दुकानीं संध्याकाळीं जात असे. पण, "अद्याप वॉटरटाऊनला गेलों नाहीं," हेंच उत्तर त्याला मिळत राहिलें. पण नंतरच्या सोमवारीं त्याला हवी असलेली गोड बातमी मिळाली. मॅक्नील वॉटरटाऊनला गेला होता. म्हाताऱ्यानें ऑग्जबरी अँण्ड मूर्स स्टोअरमधून माल खरेदी केला होता. इतकेंच नव्हे तर " आमच्या ग्रेट बेंडमधें एक तल्लख तरुण आहे, त्याला नोकरीस ठेवण्याचा विचार करून बघा ! " अशी गळही त्यानें ऑग्जबरींना घातली होती. सध्या त्या दुकानांत जागा खाली नव्हती; पण तरीही ऑग्जबरींनीं, " पाठवा त्या तरुणाला, बघतों " असें मॅक्नीलला म्हटलें होतें.

मॅक्नीलनें फ्रॅन्कला सल्ला दिला, "तेव्हां तूं तिथं प्रत्यक्ष जा अन् स्वत:च त्यांच्याशीं बोल. त्यांना पसंत पडलास तर कदाचित् तुला नोकरी मिळेलही."

" मी उद्यांच जाईन," फ्रॅन्क आनंदानें म्हणाला. त्यानें म्हाताऱ्याचा हात पकडून दाबीत म्हटलें, " श्री. मॅक्नील, तुम्ही केलेली ही मदत मी कदापि विसरणार नाहीं. "

✦ ✦ ✦

# अगदीं पायापासून प्रारंभ : ४ :

**श्री.** मॅक्नील यांचें, खूप प्रशंसा करणारें शिफारसपत्र बरोबर घेऊन तरुण फ्रॅन्क वूलवर्थ ' ऑग्जबरी अँण्ड मूर्स स्टोअर ' या वॉटरटाऊनच्या दुकानांत येऊन हजर झाला. श्री. ऑग्जबरी पडशानें आजारी असून घरीं आहेत असें दुकानांतल्या एका विक्रेत्यानें सांगितलें. जावें कीं न जावें असा विचार करीत फ्रॅन्क कांहीं क्षण थांबला आणि मग त्यानें त्या विक्रेत्याला श्री. ऑग्जबरी यांच्या घराचा पत्ता विचारला.

एका मोलकरणीनें दरवाजा उघडला आणि ती फ्रॅन्कला थेट स्यंपाकघरात घेऊन गेली. तेथें तो दुकानदार मोहरीचें तेल घातलेल्या गरम पाण्याच्या पसरट भांड्यांत पाय सोडून बसलेला होता. त्यानें रात्रीच्या आंतल्या कपड्यांवरूनच एक लोकरीची दुलई अंगाभोंवतीं लपेटून घेतलेली होती. त्यांच्या दुकानांतील त्या विक्रेत्याइतकें कांहीं स्वत: श्री. ऑग्जबरींचें व्यक्तित्व फरॅन्कला भयोत्पादक वाटलें नाहीं. तो कांहींशा धीटपणानेंच पुढें झाला आणि मॅक्नीलचें पत्र त्यानें पुढें केलें.

श्री. ऑग्जबरी आजारानें आणि त्यावरील उपचारांनीं बेजार झालेले होते. म्हणूनच आपल्या भेटीस आलेल्या त्या तरुणाचें आगमन त्यांना स्वागतार्ह वाटलें. त्यांच्या मुद्रेवर सौजन्याचा भाव उमटला. पत्र अथपासून इतिपर्यंत वाचून झाल्यावर त्यानी मान वर करून फ्रॅन्ककडे बघितलें.

" मॅक्नीलच्या मतानं मी तुला नोकरीस न ठेवणं म्हणजे आयुष्यांतली सुसंधि गमावण्यासारखंच दिसतंय् ! तुला जमाखर्च लिहितां येतो असंहि त्यानं लिहिलंय्. मॅक्नीलचे जमाखर्च तूंच ठेवीत होतास काय ? "

"नाहीं, महाशय. ते स्वत:च आपला जमाखर्च लिहीत. पण मला ठेवतां येतो. वॉटरटाऊनच्या प्रोफेसरांकडे शिकलोंय् मी. "

" ठीक आहे. पण, आमच्या दुकानांत त्या तुझ्या ज्ञानाचा कांहीं उपयोग नाहीं, " श्री. ऑग्जबरी म्हणाले, " आमच्याकडे चांगला तरबेज मुनीमजी आहे. आम्ही तुला नोकरीस ठेवलंच तर सर्वसामान्य कारकुनी नि विक्रीच्या कामासाठींच ठेवूं. "

" चालेल, महाशय, " उल्हसित होऊन फरॅन्क म्हणाला, " तुम्ही सांगाल तें काम करायला मी तयार आहें.'

" हं. ठीक. आतांच कांहीं सागूं शकत नाहीं मी. बरं, तूं एकूण आहेस तरी कसा ? मद्यपान करतोस का ? धूम्रपान करतोस का? वाईट संवय म्हणतां येईल अशी संवय तरी काय आहे तुला ? "

" मी मद्यपान करीत नाही, " फरॅन्क कांहींसें संकोचून उत्तरला, "अन् धूम्रपानही करीत नाहीं. मी दर रविवारीं घरच्या मंडळींबरोबर मेथॉडिस्ट चर्चमध्यें जात असतों. "

" पण, वाईट संवय अशी काय आहे तुला ? " पुन: तोच प्रश्न त्या दुकानदारानें केला.

" त्याचं असं आहे, महाशय. ग्रेट बेंडसारख्या खेड्याच्या वातावरणांत वाईट गोष्टी अशा कांहीं नसाव्यातच करण्यासारख्या असं मला वाटतं. अन् असल्याच तर, आम्ही इतके कामांत गढलेले असतों कीं, तशा गोष्टी बघायलाही उसंत मिळत नाहीं आम्हांला. "

फ्रॅन्कनें उत्तर दिलें खरें, पण तें योग्य उत्तर झालें कीं नाहीं याबद्दल त्याला खात्री नव्हती. तथापि त्या उत्तरानें श्री. ऑग्जबरी खुष झालेले दिसले.

ते म्हणाले, " कष्टाळू शेतकरी वर्गातला आहेस, होय ना ? ती एक चांगली गोष्ट आहे. तरी पण, सांगतां येत नाहीं. मला तरी तुझा अवतार भयंकर गबाळचा दिसतो. आमच्या ग्राहकांवर तूं छाप कशी पाडणार तें कळत नाहीं. तरी पण मॅक्नीलच्या विनंतीचा आदर करायची इच्छा आहे माझी. तेव्हां काय करायचं तें मी तुला सांगतों. तूं आमच्या दुकानांत जा नि तिथं माझ्या भागीदाराला भेट. मी तुला नोकरीला ठेवायचं ठरवलंय् असं त्याला सांगूं नकोस. फक्त एवढंच सांग कीं, तुम्ही स्वत: बघा न् काय वाटतं तें ठरवा, असं ऑग्जबरींनीं सांगितलंय्. तुझा कांहींच उपयोग नाहीं असं माझ्या भागीदाराचं मत झालं तर प्रश्नच मिटला मग. पण, तुला मोका द्यावा असं त्याला वाटलं तर मग माझीही अनुमति आहे असं समज."

त्या घराबाहेर आल्यावर एक दडपण कमी झाल्यागत फ्रॅन्क स्वत:शीं हंसला. एकूण, मुलाखत कांहीं वाईट झाली नाहीं ! श्री. ऑग्जबरींची वृत्ति स्नेहभावाचीच दिसून आली. नव्याच उत्साहानें तो त्या दुकानांत पुन: गेला नि श्री. मूर यांना भेटायचें आहे असें त्यानें सांगितलें.

ही दुसरी मुलाखत फारच बिकट कसोटी बघणारी ठरली. आपल्या कचेरींत श्री. मूर यांनीं त्याला भेट दिली. दुकानाच्या पिछाडीस भुईपासून किंचित उंच अशा ओटीवर त्यांचें मेज होतें. गालापर्यंत आलेले कल्ले मखमलीच्या गळपट्टीला घोड्याच्या नालाची आकृति असलेला सोन्याचा चाप बसविलेला. मूर यांचें व्यक्तित्व दबदबा निर्माण करणारें होतें. त्यांनीं मॅक्नीलच्या पत्रावरून नजर फिरविली आणि मग फ्रॅन्कवर प्रश्नांचा भडिमार सुरूं केला.

आपल्या भरदार आवाजांत आणि लागोपाठ ते प्रश्न विचारीत होते. विक्री-पावती कशी बनवायची हें माहीत आहे काय? मालाचें टिपण करण्याची पद्धति माहीत आहे काय? कापड कसें मोजायचें हें ठाऊक आहे काय? संपूर्ण रेशमी कापड आणि अर्धरेशमी कापड यांतला फरक कळतो काय? लोकरीचें मऊ कापड नि लोकरीच्या मऊ कापडासारखें दिसणारें सुती कापड यांच्यांतील फरक सांगतां येईल काय?... काय! कापड-दुकानातल्या कारकुनाला ज्यांचं ज्ञान असणं आवश्यक त्या साध्या गोष्टीही माहीत नाहींत?

" मी जमाखर्च ठेवूं शकतों. " फ्रॅन्क असहायपणें उत्तरला.

" आमच्याकडे मुनीम आहे.आमच्याकडे पुरेसे विक्रेते देखील आहेत. या धंद्यांतील प्राथमिक गोष्टींचं देखील ज्ञान नसलेल्या खेडवळ माणसाला कां म्हणून आम्हीं नोकरी द्यायची?"

" पण मी शिकूं शकेन. " फ्रॅन्क सावकाश बोलूं लागला, " मी फार झटपट शिकूं शकतों. श्री. मॅक्नील यांचंही तसं मत असल्याचं त्यांनीं पत्रांत लिहिलंय्. मॅक्नील यांच्या दुकानांत किराणा वगैरे मालच विकला जातो बहुतेक, त्यामुळें कापड चोपड वगैरे मालाबद्दलची माहिती करून घ्यायला मोकाच मला कधीं मिळूं शकला नाहीं. पण मी शिकूं शकेन, श्री. मूर! अन् मला कितीही कष्टाचं काम करावं लागलं नि खूप वेळ करावं लागलं, तरीही मी कुरकुरणार नाहीं. "

फ्रॅन्कच्या कार्योत्सुकता ओसंडणाऱ्या चेहऱ्याकडे श्री. मूर बघूं लागले. निरीक्षण करतां करतां त्यानीं विचारलें, " गावांत कांहीं दिवस मजेंत घालवायला मिळावेत म्हणून ही एक सबब आहे, कीं कायमचं काम म्हणून दुकानांतील काम करण्याची खरीखुरी इच्छा आहे तुला?"

" मला मनापासून हवं असलेलं हें एकमेव काम आहे, श्री. मूर!" फ्रॅन्क गंभीरपणें म्हणाला, " आयुष्यभरचा व्यवसाय म्हणून तें करण्याचा माझा विचार आहे. "

तो मनापासून, प्रामाणिक तळमळीनें बोलत आहे याची खात्री त्याच्या आवाजावरूनच होत होती. कांहीं क्षण थांबून श्री. मूर मॅक्नीलच्या

पत्रावरून पुन: नजर फिरवूं लागले. पत्राच्या पाकिटावर लिहिलेलें होतें- "अननुभवी, पण उत्साही. संधि देऊन पहायला हरकत नाहीं." तें हस्ताक्षर श्री. ऑग्जबरी यांचें होतें. अन् श्री. ऑग्जबरी हे दुकानाचे वरिष्ठ भागीदार होते.

अखेर श्री. मूर बोलूं लागले, "ठीक आहे. मी तुला मोका देतों. पण तुला अगदीं पायापासून प्रारंभ करावा लागेल. अगदीं शिडीच्या पहिल्या पायरी-पासून. मालाचे गठ्ठे खोलावे लागतील, खिडक्या पुसाव्या लागतील. शेगडयांसाठीं लाकडाच्या ढलप्या काढाव्या लागतील. शेगडया नेहमीं धग-धगत्या ठेवाव्या लागतील अन् राख काढून टाकावी लागेल. अन् अर्थात् झाडलोट, सफाई हीं कामंही तुलाच करावीं लागतील. दुकानांत राहून असल्या प्रकारचीं कामं करायची तुझी तयारी आहे काय?"

"दुकानात नोकरी मिळत असल्यावर कोणत्याही प्रकारचीं कामं करा-यला तयार आहें मी." फ्रॅन्क आनंदानें उद्गारला, "तीं कामं मला छान जमतील. मग, केव्हांपासून करूं सुरुवात मी? अन् मला पगार काय मिळेल?"

"पगार? म्हणजे धंदा-व्यवसाय शिकवायबद्दल पगार द्यायचा तुला आम्हीं? अरे वेडगळ तरुणा, उलट तूंच आम्हांला शिकवण्याबद्दल पैसे द्यायला हवेत वास्तविक! जमाखर्च ठेवायला शिकायसाठीं दिलेसच कीं नाहीं पैसे तूं? मग, दुकानदारीचं शिक्षण घेण्यासाठीं तूं पैसे कां म्हणून देऊं नयेस? पण, आम्हीं याबाबत उदार धोरण ठेवूं. आम्हीं तुझ्याकडे पैही मागणार नाहीं. अन् तुझी कांहीं लायकी आहे, तुझा आम्हांला उपयोग आहे असं दिसून आलंच तर सहा महिन्यांनीं पगार सुरू करूं. काय, आहे का कबूल? माझी योजना अशी आहे. होय म्हण वा नाहीं म्हण."

आपली निराशा लपविण्याचा यशस्वी प्रयत्न करीत फ्रॅन्कनें अगदीं शांत-पणें विचारलें, "यावर मी विचार केला तर चालेल ना? मी तुम्हांला दुपारीं काय तें सांगूं शकेन."

"जमेल तसं–" इतकेंच श्री. मूर बेफिकीरपणें पुटपुटले आणि मग आपल्या कामाकडे वळले.

फ्रॅन्क कसाबसा दुकानाबाहेर आला. त्याच्या डोळ्यांपुढें अंधेरीच आली होती. चालतांना तो अडखळत होता. दुकानाबाहेर पडल्यावर तो चालत चालत चावडीच्या पायऱ्यांशीं गेला. पायरीवरचें बर्फ हातानें बाजूला करून तेथें त्यानें बसकण मारली. नंतर खिशांतून एक कागदाचा तुकडा आणि पेन्सिलीचा तुकडा काढून त्यानें आंकडेमोड करायला सुरुवात केली.

त्याच्या 'बँकेंत' म्हणजे आईकडून घेतलेल्या तांबड्या पायमोजांत मोजून पन्नास डॉलर होते. जोंपर्यंत ही शिल्लक संपणार नाहीं तोंपर्यंत बिनपगारी काम तो करूं शकला असता. मग, गांवांतील राहाणीच्या मानानें हे पन्नास डॉलर सहा महिने पुरवतां येतील का? पन्नासाला चोवीसनें भागून आठवड्याला किती खर्च परवडेल हें गणित त्यानें केलें आणि 'जमणार नाहीं' अशा अर्थानें मान हालविली. गांवांतील खानावळींत दर काय असतात याची त्याला कांहींच कल्पना नव्हती. पण तो इतकें जाणून होता कीं, आपल्या गणिताच्या उत्तरापेक्षां ते दर खात्रीनें कांहीं तरी जास्तच असणार. पुन: त्याला वाटलें, कदाचित् तेवढ्यांत खर्च भागेल देखील उत्तम उपाय म्हणजे प्रत्यक्ष विचारून खात्री करून घेणें, असें ठरवून तो उठला.

दोन तास वॉटरटाऊनच्या गल्ल्याबोळांतून 'जेवणारहाण्याची सोय' अशी पाटी असलेलीं घरें शोधीत फ्रॅन्क हिंडत होता. तशा पाट्या असंख्य होत्या. यादवी युद्धामुळें कित्येक कुटुंबांतील कर्ते पुरुष गमावलेले होते. स्वत:च्या मालकीचें घर असणाऱ्या विधवेनें, चार पैसे मिळवण्यासाठीं खानावळ काढावी हें साहाजिकच होतें. अशा प्रत्येक खानावळीच्या दरवाजाची घंटा वाजवावी, घरमालकिणीशीं बोलणें करावें आणि पुढें चालू लागावें असें करीत फ्रॅन्क हिंडत होता. अशा प्रत्येक ठिकाणाहून परततांना त्याच्या नैराश्यांत भरच पडत होती. एका खोलीसाठीं कमींत कमी दर आठवड्याला साडेतीन डॉलर इतका होता.

शेवटच्या खानावळींत विचारपूस करून परतल्यावर तो पुन: त्या दुकानांत परत आला. श्री. मूर यांच्या कचेरीची पायरी चढतांना त्याच्या छातींत विलक्षण धडधड होत होती. या खेपेला जर पदरीं अपयश आलें तर अल्बॅान मामाच्या शेतवाडीवरील काम पत्करण्याखेरीज गत्यंतर नव्हतें. तेव्हां या खेपेस पदरांत अपयश घेऊन परवडणारच नव्हतें.

गांवांत शीतज्वराची (इन्फ्ल्युएन्झा) सांथ सुरू होती. त्या काळांत या आजाराला 'ला ग्रिप' असें म्हणत असत. या सांथीमुळें बहुतेक विक्रेते गैरहजर होते. त्यामुळें फ्रॅन्ककडे एकदमच विक्रेत्याचें काम आलें. ज्या विक्रेत्यानें फ्रॅन्कच्या अंगाला बसणारा सदरा काढून दिला नि त्याच्या गळ्यांत नेक-टाय बांधला त्यानें नव्या नोकराविषयींचा तुच्छताभाव मुळींच लपवून ठेवला नव्हता. फ्रॅन्कला निश्चितपणें आठवत नव्हतें; पण त्याला सारखें वाटत होतें कीं दहा वर्षांपूर्वीं त्याची न् चार्लीची याच स्टोअरमध्यें ज्याच्याशीं चकमक उडाली होती तोच हा इसम असावा. निदान, त्याची वागणूक तरी तीच होती हें निश्चित. तीच तुच्छता नि तीच स्नेहभावशून्यता !

फ्रॅन्क सर्व दिवसभर सारखा अडखळत होता; नवीनच कामाला लाग-लेला माणूस जी जी चूक करील ती प्रत्येक चूक तो करीत होता. निर-निराळा माल कोठें कोठें ठेवलेला आहे हें त्याला कांहींच माहीत नव्हतें. मालावरील किमतीच्या चिठ्ठीवरून किमत कशी सांगावी किंवा विक्री-पावती कशी बनवावी याचेंही त्याला ज्ञान नव्हतें. कापडाचे तागे उलगडून वार मोजणें ही गोष्ट दिसायला किती साधी, पण त्यांतही फ्रॅन्क असा विलक्षण घोटाळा करून ठेवी कीं अखेर स्वत: श्री. मूर यांना त्यांच्या साह्याला जावें लागे.

त्याला सर्वांत बिकट काम वाटलें तें किमतीच्या चिठ्ठ्यांवरून किमत सांगण्याचें. मालावर किमत साध्या आंकड्यांत कधींच मांडलेली नसे. ज्या त्या दुकानाच्या सांकेतिक खुणा असत नि त्या विक्रेत्याला पाठ करून स्मरणांत ठेवाव्या लागत असत. त्या काळांत हीच पद्धति सर्वत्र रूढ होती. त्यामुळें गिऱ्हाइकाला किमतीची चिठ्ठी बघून ती वस्तु महाग आहे कीं स्वस्त हें ओळखतां येत नसे अन् आपल्याला परवडेल कीं नाहीं हें ठरवतां येत नसे. विक्रेत्याला किमत विचारणें ग्राहकाला भाग पडे. अन् मग जर किंमत वा भाव त्याला जास्त वाटला तर वस्तुस्थिति तशी नाहीं, भाव रास्त आहे हें पटवून देण्याचें काम विक्रेत्याचें असे. कित्येकदां, गिऱ्हाईक चिकट असलें तर अखेर किंमत वा भाव कमीही केला जात असे.

कामाच्या पहिल्या दिवशीं विक्रेता या नात्यानें काम करतांना फ्रॅन्कची फारच फजिती झाली. दुसऱ्या दिवशीं नेहमींचें बहुतेक विक्रेते कामावर

हजर झाल्यामुळें त्या दिवशी फ्रॅन्कची विक्रीच्या कामांतून सुटका झाली. आणि पहिल्या दिवशीं श्री. ऑग्जबरींच्या प्रेमळपणाचा जसा अनुभव आला तसाच दुसऱ्या दिवशींही त्याला आश्चर्याचा सुखद धक्का बसला. स्त्रियांचे आंतले कपडे विकण्याच्या शाखेची प्रमुख श्रीमती अॅडेलिया कून्स ही मूळची ग्रेट बेंडची नि आपल्या ओळखीची आहे हें फ्रॅन्कला आढळून आलें. फ्रॅन्कला आठवलें कीं, तेथल्या रविवारच्या शाळेंतील आपल्यापेक्षां मोठ्या वयाच्या मुलींतील एक मुलगी म्हणजेच श्रीमती अॅडेलिया कून्स. तिनें एका मेथॉडिस्ट धर्माधिकाऱ्याशीं विवाह केल्यामुळें आपलें खेडें सोडलें होतें. पतिनिधनानंतर त्या विधवेनें पोटासाठीं या दुकानांत नोकरी पत्करलेली होती. श्रीमती कून्स ही फ्रॅन्कपेक्षां फक्त पांचच वर्षांनीं वडील होती. पण तिच्याकडून त्याला एक प्रकारच्या प्रेमळ मातृभावाचा अनुभव लाभला. या अनुभवाचा फ्रॅन्कला कदापि विसर पडला नाहीं.

आणि त्या काळांत फ्रॅन्कला अशा प्रेमळपणाचीच गरज होती. कारण त्याचे त्या दुकानांतले पहिले आठवडे फारच त्रासदायक गेले. कामाची वेळ सकाळी सातपासून रात्रीं नऊपर्यंतची असे. आणि त्याला आठवड्यांतले सहा दिवस काम करावें लागे. शिवाय, फ्रॅन्कला दुकान उघडण्याच्या पूर्वीं एक तास आधीं हजर व्हावें लागे. झाडून काढणें, धूळ झटकणें, शेगड्यांतील राख काढून टाकून त्या शिलगावणें, तेलाच्या दिव्यांत तेल भरून त्याच्या वाती कापून नीटनेटक्या करणें व कांचा पुसणें, ही कामें त्याला करावीं लागत असत. त्याचप्रमाणें मालाच्या गांसड्या, पेट्या तळघरांतील वखारभागांत नेऊन ठेवणें, गांसड्या सोडणें आणि निरनिराळा माल अलग काढणे हीही कामें त्याचींच होतीं.

हें सर्व काम तो अत्यंत धीमेपणानें आणि चोखपणानें बजावीत होता. कधी तक्रारीचा शब्दही तोंडांतून न काढतां सारें करीत होता. प्रथम स्नेहभावशून्य वृत्तीने वागणाऱ्या मुख्य विक्रेत्याचीही मर्जी त्यानें संपादन केली. त्या विक्रेत्यानें एक दिवस श्री. मूर यांच्यापाशीं आपला अभिप्राय सांगितला. हा नवा माणूस विक्रेता म्हणून ठीक नसेला तरी दुकान नीटनेटकें ठेवण्याच्या आणि माल व्यवस्थित रचून ठेवण्याच्या कामांत मात्र भलताच हुषार आहे असें तो म्हणाला त्या मुख्य विक्रेत्यानें असेंही सांगितलें कीं, याच्याइतका कष्टाळू माणूस दुकानाला आजवर कधींच लाभलेला नसेल.

तीन महिन्यांच्या अखेरीस फ्रॅन्कला त्याच्या पहिल्या साप्ताहिक वेतनाच्या साडेतीन डॉलरचें पाकिट मिळालें. एका वर्षांत हें वेतन साडेचार डॉलर झालें. आणि अखेर त्याचें साप्ताहिक वेतन सहा डॉलरपर्यंत वाढलें.

मात्र-विक्रीच्या कामांत त्यानें मिळविलेल्या कौशल्यामुळें कांहीं ही वेतनवाढ झालेली नव्हती. विक्रेता या नात्यानें फ्रॅन्क वूलवर्थ कधींच कुशल ठरला नाहीं. गिऱ्हाइकाच्या गळयांत माल बांधण्याचें कौशल्य त्याला कधींच साधलें नाहीं. त्याच्यांत पुरेसें सौजन्य, दक्षता, माल दाखवीत राहण्याचा धीमेपणा इत्यादि गुण होते. पण, आपण काय खरेदी करायचें हें गिऱ्हाइकाचें गिऱ्हाइकालाच ठरवूं दिलें पाहिजे—निर्णयाधिकार गिऱ्हाइकाच आहे असें त्याला वाटे. शिवाय, आपल्याला किती पैसे खर्च करावयाचे आहेत हें ठरविण्याचें काम गिऱ्हाइकाचे आहे असें त्याला वाटे. त्याच्या मतें, गिऱ्हाइकाच्या गळयांत महागडी वस्तु मारून मुटकून बांधणें गैर होतें.

अशा कल्पना त्या काळच्या व्यवहार-धंदा करणाऱ्या वर्गानें स्वप्नांतही ऐकलेल्या नव्हत्या. त्या वेळच्या कोणाही व्यापाऱ्याप्रमाणेंच श्री. मूर यांचें ठाम मत होतें कीं, एखादें गिऱ्हाईक दुकानांतून माल खरेदी न करतां परत जाणें ही गोष्ट कोणत्याहि विक्रेत्याला लांच्छनास्पद म्हटली पाहिजे. प्रत्येक गिऱ्हाइकाला कांहीं ना कांहीं माल विकत घ्यायला लावील तोच खरा विक्रेता असें त्यांचें मत होतें. आणि वाजवी भावापेक्षां जास्त भावानें माल विकील, गिऱ्हाइकानें ठरवल्यापेक्षां जास्त पैसे त्याला खर्चायला लावील तोच खरा उत्कृष्ट विक्रेता होय; आपल्या दुकानांत हवा असा विक्रेता तोच होय अशी श्री. मूर यांची भूमिका होती.

आणि अशा प्रकारचा विक्रेता म्हणून फ्रॅन्क कधीच चमकला नाहीं. तथापि, फ्रॅन्कपाशी इतर कांहीं गुण होते आणि त्या गुणांमुळेंच श्री. मूर यांच्यासारख्या व्यवहारी माणसाला त्याचें मोल वाटे. या गुणांपैकीं एक गुण म्हणजे प्रदर्शनीय कांच-कपाटांत, खिडक्यांत आकर्षक पद्धतीनें माल लावून ठेवण्याचें कौशल्य हा होय. हें त्याचें कौशल्य नोकरीच्या पहिल्या वर्षाच्या शेवटी शेवटीं अगदीं योगायोगानेंच प्रकट झालें.

एका रात्रीं दुकान बंद झाल्यावर फ्रॅन्कला दक्षिण बाजूच्या प्रदर्शनीय कांच-कपाटांतील मांडलेल्या वस्तु हलवून कांचा स्वच्छ धुवूनपुसून काढण्याचें काम सांगण्यांत आलें होतें. हें काम सांगून श्री. मूर म्हणाले होते, " नंतर पुन्हां माल लावून ठेव. " यापेक्षां अधिक कांहींही हुकूम न करतां ते निघून गेले होते आणि फ्रॅन्क कामाला लागला होता.

दुकानांत तो एकटाच होता. सर्व प्रकारचा माल त्याच्या हाताशीं होता. तें प्रदर्शनीय कांच-कपाट धुवून पुसून स्वच्छ केल्यावर त्यानें त्यांतील माल निरनिराळ्या रीतीनें मांडून बघण्यास सुरुवात केली. कापडाचे तागे एकावर एक नुसते रचून ठेवण्याऐवजीं, विविध रंगांचे तागे उलगडून, कापडांच्या विविध आकर्षक आकाराच्या घड्या त्यानें केल्या.

फ्रॅन्कचा तांबडा रंग आवडता असल्यामुळें त्यानें अगदीं गडद किरमिजी रंगापासून तों फिक्कट गुलाबी रंगांपर्यंत रेशमी कापडाचे नमुने निवडले. या विविधरंगी पार्श्वभूमीवर त्यानें स्त्रियांचीं नाजूक मऊसर कातड्याचीं पादत्राणें खोक्यांतून काढून वर ठेवलीं. त्याचप्रमाणें पड्यासारख्या सोडलेल्या विविध तांबड्या कापडांच्या पट्टयांवर कलाबूतची किनार असलेले शुभ्र हातरुमाल टांचून टाकले.

या रचनेचें चोखंदळपणें निरीक्षण करण्यासाठीं तो मुद्दाम रस्त्यावर जाऊन उभा राहिला. एकमेकांना अगदीं खेटून एकाच रांगेंत खूप पायतणें ठेवलेलीं चांगलीं दिसत नाहीत असें त्याला वाटलें. मग, फक्त दोनच जोड्या ठेवून बाकीचीं त्यानें काढून टाकलीं. आणि काढलेल्या पायतणांच्या जागीं लांब पांढरे तलम मातमोजे ठेवले. आतां देखावा झक्क दिसत होता. नंतर कांहीं कलाबूतच्या वस्तु, सुगंधी तेलाची एक मोठी बाटली, कपड्याला अडकविण्याचे नक्षीदार चाप आणि सुंदर फण्या मांडल्या.

फ्रॅन्क पुन्हां पुन्हा नव्या नव्या प्रकारची रचना करून बघण्यांत अगदीं दंग झाला. आणि कामांत तो जितका दंग झाला तितका त्याचा आनंद वाढूं लागला. जें करण्यांत त्याला आनंद वाटेल असेंच तें काम होतें. शेगड्यांतील विस्तव पार विझून गेला. थंडी वाजूं लागली. मेजांवरच्या वस्तू त्या कपाटापाशीं आणणें आणि सजावटीला निरुपयोगी ठरल्यास पुन्हां

नेऊन ठेवणें, या येरझारांनीं त्याची पाठ दुखूं लागली. पण थंडी वा तें दुखणें यांपैकीं कशाचीच तमा त्याला वाटली नाहीं.

अखेर एकदांची मनाजोगती सजावट झाल्यावर दुकानाला कुलूप लावून तो बिऱ्हाडीं जावयास निघाला. चावडीवरील घड्याळांत दोनचे टोले पडले. तरी देखील अखेरची नजर त्या प्रदर्शनीय खिडकीवर टाकून बघण्यासाठीं तो थोडा वेळ थांबला. रस्त्यावरील मिणमिणत्या कंदिलांच्या प्रकाशाखेरीज अन्य प्रकाश नव्हता. तरी तेवढ्याही प्रकाशांत त्याला सारी सजावट उत्कृष्ट वाटली. एकादी अत्युत्कृष्ट कलाकृति रेखाटून संपल्यावर चित्रकाराला होणाऱ्या असीम आनंदापेक्षां त्याचा आनंद अणुभरहि कमी नव्हता.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं श्री. मूर जरा उशिराच दुकानाकडे येत होते. त्या वेळीं दक्षिणेकडील प्रदर्शनीय कांच-कपाटापाशीं स्त्रियांचा छोटासा घोळका उभा असलेला त्यांना आढळून आला. श्री. मूर यांनीं आपली गति मंद केली आणि त्या स्त्रियांच्या तोंडून बाहेर पडणारे आनंदोद्गार त्यांनीं ऐकून घेतले. दक्षिणेकडच्या त्या खिडकीपाशीं अशी बघ्यांची गर्दी यापूर्वी कधींच दिसली नव्हती. कारण, मेजावरील आवरणांचें कापड, दुलया वगैरेंचे गठ्ठे तेथें नुसते रचून ठेवलेलें असत. तें दृश्य अगदींच अनाकर्षक दिसे. दुकानाच्या दुसऱ्या दोन बाजूंना असलेल्या प्रदर्शनीय कपाटांसमोरही बघ्यांची गर्दी क्वचितच असे. तेथें पुरुषांचे कपडे नीटपणें मांडून ठेवलेले असत, पण आकर्षक पद्धतीनें मात्र नव्हे.

मालकसाहेब आपल्या कचेरीकडे निघाले. जातां जातां त्यांनीं फ्रॅन्कला भेटीस पाठविण्याबद्दल कोणाला तरी फर्माविलें. कोणाला कामाबद्दल प्रशंसापर शाबासकी देणें ही गोष्ट श्री. मूर यांच्या स्वभावांतच नव्हती. काहींही अभिप्राय व्यक्त न करतां त्यांनीं फक्त या तरुणाला दुकान बंद होतांच उरलेल्या दोन्ही प्रदर्शनीय खिडक्या स्वच्छ करून आंतील मांडणी बदलण्याला फर्माविलें. शेवटीं रुक्षपणें ते म्हणाले, " यापुढें हेंही तुझं आणखी एक काम राहील. "

✦ ✦ ✦

# जेनीकडून प्रतिसाद :५:

आपली मैत्रीण बनलेल्या श्रीमती कूनसच्या मदतीनें फरॅन्कनें हळूहळू दुकानाच्या आंतील भागातील सजावटीची व्यवस्थाही स्वत:कडे घेतली. दुकानांतील प्रदर्शनीय कपाटें आणि विक्रीचीं बांके पूर्वीपेक्षां अधिक आकर्षक दिसतात ही गोष्ट श्री. मूर यांच्या लक्षांत आली असली तरी त्यांनीं तसें कधींच बोलून दाखविलें नाहीं. ते एक पुराणप्रिय व्यापारी होते. भरपूर माल विकूं शकतो तोच खरा चांगला गुमास्ता या कल्पनेपलीकडे ते बघूंच शकत नव्हते.

आणि या आपल्या मालकाच्या दृष्टीनें फरॅन्क चांगला विक्रेता नव्हता. तथापि सजावटीचें कौशल्य त्याच्यांत असल्यामुळें श्री. मूर यांच्या दृष्टीनें तो एक उपयुक्त नोकर होता. आणि त्याच्या या उपयुक्ततेचें बक्षीस म्हणून तीन वर्षांनीं त्याचा पगार श्री. मूर यांनीं आ वडयाला सहा डॉलर केला. त्यानंतर पुन: पगारवाढ नाहीं.

फरॅन्कच्या नोकरीच्या तिसऱ्या वर्षाच्या कालावधींतच श्री. ऑग्जबरी यांनीं आपली भागीदारी पेरी आर. स्मिथ नांवाच्या गृहस्थांना विकून धंद्यांतून अंग काढून घेतलें. त्यामुळें दुकानाचें नांव बदलून 'मूर्स अॅण्ड स्मिथस् स्टोअर' असें नवें नांव ठेवण्यांत आलें. श्री. स्मिथ यांनीं दुकानांत आणखी कांहीं भांडवल गुंतविलें. आतां साऱ्या नोकरांचे पगारही वाढणार अशी किंवदंती पसरली. अनेक आठवडयांच्या उत्कंठापूर्ण प्रतीक्षेनंतर ती किंवदंती निखालस खोटी ठरली. नव्या भांडवलाचा उपयोग दुकानाची घाऊक विक्रीची शाखा वाढविण्याकडे करण्यांत आला होता. पगारांची पातळी जेथल्या तेथेंच राहिली होती.

याच सुमारास मुख्य विक्रेत्यानें या दुकानांतील नोकरी सोडली व मिचिगनला दुसऱ्या नोकरीवर तो रुजू झाला. दुसऱ्या विक्रेत्याची त्याच्या जागेवर बढती झाली. आपल्याला मुख्य विक्रेत्याची जागा मिळावी अशी कांहीं

फ्रॅन्क वूलवर्थची अपेक्षा नव्हती. पण, कांहीं तरी बढती आपल्याला मिळ-ण्याची वेळ आली आहे असें मात्र त्याला वाटत होतें.

अजूनही दुकानांतील सारीं बारीकसारीक कामें तोच करीत हाता. शिवाय, कोठार-घराची व्यवस्था त्याच्याकडे होती. गांसडचा खोलणें, नव्या मालावर चिठ्ठया लावणें हीं कामें तोच करीत होता. आवश्यक ठरेल तेव्हां माल काढून देतां यावा म्हणून तो व्यवस्थित लावून ठेवण्याचें कामही त्याच्याकडेच होतें. प्रदर्शनीय कांच-कपाटांतील व दुकानांतील अंतर्भागाची सजावटही त्याच्याकडे होती. आणि याशिवाय, इतर कांहीं काम नसेल तेव्हां विक्रेत्याची भूमिका देखील त्याला बजावावीच लागे.

शेगडयांची व्यवस्था आणि झाडण्याचें काम बघण्यासाठीं एकादा पोऱ्या मालकानें नोकरीस कां ठेवूं नये ? तसें झालें म्हणजे प्रदर्शनीय कपाटें व खिडक्या यांची सजावट करायला फ्रॅन्कला अधिक वेळ मिळाला असता. इतक्या मोठ्या दुकानांत वास्तविक सजावटीचें काम हें पूर्ण वेळेचेंच काम नव्हतें काय ? सजावटीच्या बाबतींत मालक आपल्याला अधिक स्वातंत्र्य व सवलत देतील तर आपण अधिक चांगली सजावट करूं नि त्यामुळें दुका-नाचा फायदाच होईल असें फ्रॅन्कला मनोमन वाटत होतें.

त्यानें आपली कल्पना श्री. मूर यांना सांगितली पण त्यांनीं उतावीळपणें ताडकन् ती धुडकावून लावली. मालविक्री हीच सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे, तीच मोठी कामगिरी आहे असें त्यांचें मत होतें. आणि फ्रॅन्कनें विक्रेता म्हणून केलेलें आजवरचें काम कांहीं त्यांच्या दृष्टीनें प्रशंसनीय नव्हतें. केवळ प्रदर्शनीय खिडक्यांतून मालाची चांगली सजावट करतां येते एवढ्याच कारणासाठीं एकादा नोकर चढून जाईल तर त्याचे लाड करायला श्री. मूर तयार नव्हते. दुकानाच्या उत्कर्षाला हातभार लावण्याची फ्रॅन्कला तळमळ असेल तर त्यानें विक्री-बाकांशीं राहून काम करावें आणि मालाचा भराभर उठाव करण्याचा कसून प्रयत्न करावा हेंच योग्य होय असें त्यांनीं बजावलें.

श्री. मूर यांच्या उत्तरानें फ्रॅन्कचा स्वाभिमान दुखावला गेला. आपल्या सजावटीच्या कौशल्याबद्दल त्याला खरोखरच फारफार अभिमान वाटत होता. काम किती महत्त्वाचें आहे हें श्री. मूर यांनीं कां ओळखूं नये ?

आपली दुखावलेली भावना त्यानें सहानुभाव दाखवूं शकणाऱ्या एका व्यक्ती-जवळ बोलून दाखविली.

जेनी क्रेटन ही तरुणी मूळची कॅनडांतली रहिवासी. पण आतां ती आपल्या चुलत बहिणीकडे वॉटरटाऊनला रहाण्यासाठीं आली होती. ती कपडे शिवण्याचें काम करीत असे. दुकानांत माल घेण्यासाठीं ती येई त्या-मुळें फ्रॅन्कची नि तिची ओळख झाली होती. रंगीबेरंगी कापडाच्या सजा-वटीत जसा फ्रॅन्कला आनंद वाटे, तसाच तिलाही वाटत होता. श्री. मूर यांना न कळो, पण फ्रॅन्क ज्या प्रकारें सजावट करतो तशी करण्याला कला-वंताचीच दृष्टि पाहिजे, याची जाणीव तिला होती. ती स्वतःच शिवण-कामांतील एक कलावन्त होती. आपल्यासारख्याच दुसऱ्या कलावंताची ओळख होतांच तिनें त्याची योग्यता जाणली.

फ्रॅन्कला कलाज्ञान तसें फारसें नव्हतें; पण सौन्दर्य म्हणजे काय याचें ज्ञान त्याला होतें आणि सौन्दर्यावर त्याची भक्ति होती. उठावदार धांवत्या चमकदार रेषा असलेल्या शेंदरी रंगाच्या कापडाचें सौन्दर्य तो जाणत होता. आणि मृदुसुंदर केशसंभार नि निळे स्नेहार्द्र नेत्र यांनीं युक्त अस-लेल्या जेनीच्या शांत कोमल मुद्रेच्या जिवंत सौन्दर्याचीही त्याला जाणीव झाली होती.

आतांपर्यंत कोणाशींही जें मनमोकळें हितगुज आपण करूं शकलों नाहीं तें जेनीशीं मात्र करूं शकतों असें त्याचा अनुभवास आलें. असें हित-गुज तो आपल्या प्रेमळ पण व्यवहारी आईशीं देखील कधीं करूं शकला नव्हता. “ कधींकाळीं माझ्या मालकीचं दुकान मला काढतां आलं तर—” या भाषेत त्यानें आपलें जुनें स्वप्न जेनीला सांगून टाकलें. त्याच्या या भाषेवर प्रतिक्रिया नेहमी हास्याचीच व्हायची. तें हास्य कधीं कुचेष्टेचें असे किंवा त्यांत आपुलकीही असे; पण त्याचें बोलणें नेहमींच हंसण्यावारी नेलें जाई हें खास. जेनी क्रेटन मात्र त्याचें तें बोलणें ऐकून हंसली नाहीं. “ जेव्हां माझं दुकान निघेल तेव्हां—” अशी भाषा वापरायला तिनें त्याला गंभीरपणें सांगितलें. ‘जर-तर’ची चूक सुधारून ‘ जेव्हां– तेव्हां’ हा अचूक शब्दप्रयोग तिनें सुचविला. आपल्याला समजून घेणारी आणि आपल्या

स्वप्नावर श्रद्धा ठेवणारी व्यक्ति अखेर भेटली हा साक्षात्कार फ्रॅन्कला फारच सुखकारक वाटला.

अशा जेनीजवळ श्री. मूर यांचे अवमानकारक उद्गार फ्रॅन्क सांगू लागला. तिनें त्याचें सारें बोलणें सहानुभूतीपूर्वक ऐकून घेतलें आणि मग ती उद्वेगानें म्हणाली, "अशा ठिकाणीं तुम्ही रहातांच नये कामा. त्यांना तुमचं मोल कळत नसेल तर दुसरा कुणी तुमची किंमत ओळखील. तुम्ही दुसरीकडे नोकरी कां पहात नाहीं ? "

" तोच विचार मी करतोंय्. मी असं ऐकलंय् कीं बुशनेलच्या दुकानांत एक जागा खालीं आहे. तिथें बघतों नशिबाचा शेर असला तर– "

" बुशनेलचं दुकान ? बाई, बाई ! भयंकरच आहे तें दुकान ! तिथं सर्व माल असा कांहीं घालमेल करून ठेवलेला असतो कीं तुम्हांला जें हवं तें कांहीं वेळेवर सांपडायचं नाहीं. मी कधींच त्या दुकानांत जात नाहीं. अन् तिथलीं प्रदर्शनीय कपाटं म्हणजे एक सावळागोंधळच आहे. कधीं स्वच्छ नाहींत. धूळ सांचलेल्या हव्या त्या वस्तु न् सामान कसं तरी ठेवलेलं असतं तिथं ..... पण थांबा हं–" एकदम थांबून हंसत ती पुढें म्हणाली, " पण आतां माझ्या लक्षांत आलं. तिथं अशी परिस्थिति आहे म्हणूनच तुम्ही तिथली नोकरी धरणार, होय ना ? तें अव्यवस्थित असतं म्हणून. "

" जेनी ! अगदीं मनकवडी आहेस तूं, " तो म्हणाला, " तुझ्या-खेरीज कुणाच्याच ध्यानांत आला नसता माझा हेतु. खरं म्हणजे बुश-नेलच्या दुकानांतील माल ताब्यांत घेऊन तो नीट लावण्यासाठीं माझे हात नुसते शिवशिवताहेत. त्यांच्या प्रदर्शनीय खिडक्यांची सजावट कशी छान करीन मी ! तुला काय वाटतं ? तिथली नोकरी धरणं मूर्खपणाच ठरेल असं तुला वाटतं का ?

" मला वाटतं, तीच गोष्ट सर्वांत शहाणपणाची ठरेल. मूर यांच्या दुकानांत जितक्या मर्यादेपर्यंत सहन करणं शक्य होतं तितकं तुम्ही केलंय्. अन् हें बघा, त्या लोकांशीं बोलणीं करतांना भलताच विनय दाखवूं नका. तुम्हांला मिळतंय् त्यापेक्षांही तुमची लायकी जास्त आहे. अगदीं सुरवाती-पासूनच तिथं जास्त पगाराची मागणी करा. "

2830



तिच्या विश्वासपूर्ण उद्गारांनीं आनंदून नि उत्साहून फ्रॅन्क श्री. बुशनेल यांना जाऊन भेटला. धीटपणें त्यानें दहा डॉलर आठवडा इतका पगार मागितला. " ठीक आहे, दहा. पुढील महिन्याच्या एक तारखेपासून रुजू हो ! " हे त्या म्हाताऱ्याचे किरकिऱ्या आवाजांतले शब्द ऐकून फ्रॅन्कला स्वत:च्या कानांवर विश्वास ठेवावा कीं नाहीं हाच प्रश्न पडला.

ही नोकरी मोठी आशादायक वाटली होती; पण अखेर पदरांत जास्त कडवट निराशा टाकणारीच ठरली. श्री. बुशनेल हे गृहस्थ अत्यन्त तुसडे नि संशयखोर होते. प्रत्येकजण आपल्याला लुबाडायलाच टपलाय् असा त्यांचा ग्रह झालेला होता. पैसे ठेवण्याच्या मेजाच्या खणावर त्यांची कडवी नजर असे. आणि आपल्या खाजगी उपयोगासाठीं नोकरांनीं दुकानांतून साधी टांचणीही उचलतां नये अशी सक्त ताकीद त्यांनीं सर्व नोकरांना देऊन ठेवलेली होती. त्यांना सर्वांत भय वाटे तें चोरीचें. आणि म्हणून त्यांनीं हॅरी मुडी नांवाचा सतरा वर्षांचा पोरगा पहारेकरी म्हणून ठेवलेला होता. त्याला रात्रीं तळघरांत झोपावें लागलें. त्याच्या खाटल्या-शेजारींच दुसरें खाटलें फ्रॅन्कसाठीं टाकण्यांत आलें. दोघांमिळून एक गंज-लेलें पिस्तूल होतें. कोणी घरफोड्या दिसतांच त्याच्यावर गोळी झाडण्याची सूचना त्यांना देऊन ठेवण्यांत आलेली होती.

सजावटींत सुधारणा करण्याबद्दलच्या नव्या नोकराच्या साऱ्या सूचना रुक्षपणें फेटाळण्यांत आल्या. त्याला सांगण्यांत आलें की, माल विकणें, शेगड्यांची व दिव्यांची व्यवस्था ठेवणें आणि चोरावर जागती नजर ठेवणें हें तुझें काम आहे. यापेक्षां अधिक कसलीही अपेक्षा नाहीं. आणि दुकान कसें चालवावें याबद्दल सल्लामसलत हवीशी वाटली तर मग विचारीन, असेंही श्री. बुशनेलनीं बजावलें.

" तुला बनवलंय् ! " हॅरी मुडीनें फ्रॅन्कला स्पष्टपणें सांगितलें, " केवळ मूरकडची नोकरी सोडून तूं इकडे यावंस म्हणून आठवड्याला दहा डॉलर पगाराचं नुसतं आमिष दाखवलं होतं त्यानं. त्याला वाटलं, मूरकडचं कांहीं गिऱ्हाईक तूं या दुकानाकडे वळवूं शकशील. पण, तूं असं नवं गिऱ्हाईक आणलंस काय, अन् न आणलंस काय तो लवकरच तुझ्या

पगाराला कात्री लावण्यास सुरुवात करील. पहिलीच पगार-कपात कोणत्याही क्षणीं केली जाईल, बघ. "

आणि कांहीं थोडयाच आठवडयांत तशी पगारकपात झालीच.श्री. बुशनेल यांनीं फ्रॅन्कला दोष देत सांगितलें कीं, " पगाराच्या मानानें तूं विक्री मुळींच करीत नाहींस; तेव्हां यापुढें तुझा पगार आठ डॉलर आठवडा राहील! "

" अन् उन्हाळयापर्यंत सहा डॉलर होईल तुझा पगार ! " हॅरी भाकीत सांगत म्हणाला, "असंच हळूहळू कुरतडण्याचं त्याचं तंत्र आहे. तो भयंकर घाणेरडा इसम आहे. माझी-तुझी पूर्वीच भेट झाली असती तर मी इशारा दिला असता तुला. माझा नाइलाज आहे त्यापेक्षां एकही दिवस जास्त मी ही नोकरी करणार नाहीं. अन् तूं शहाणा असशील तर तूंही करणार नाहींस. "

पण फ्रॅन्कला त्या नोकरीला चिटकून रहावेंच लागलें. त्याच्यापुढें दुसरा मार्गच नव्हता. आठवडयाला दहा डॉलर पगार मिळणार या आधारावर त्यानें जेनी क्रेटनला लग्नाची मागणी घातली होती. एक संसार थाटूं पहाणारा तरुण या दृष्टीनें, दुसरी नोकरी हाताशीं असल्याशिवाय पहिली सोडून देणें त्याला शक्य नव्हतें. घर थाटण्यापुरते पैसे बचत होईपर्यंत थांबण्याला तयार असल्याचें अभिवचन जेनीनें त्याला दिलें होतें. पण आतां असा रंग दिसूं लागला होता कीं, तिला प्रदीर्घ काल वाट बघत बसावें लागणार !

चिंता आणि कष्ट, निराशा आणि गारवा नि जमिनीचा ओलावा असलेल्या तळघरांत झोपणें याचा परिणाम फ्रॅन्कच्या आयुष्यांतील पहिला मोठा आजार ओढवण्यांत झाला. १८७५ च्या हिंवाळयांतील घटना. एका सकाळीं हॅरी मुडी उठला तेव्हां त्याला आढळून आलें कीं, आपला सोबती तापाच्या गुंगीत आहे.

फ्रॅन्कची आई वॉटरटाऊनला आली आणि त्याला सरळ आपल्या शेतवाडीवर घेऊन गेली. त्याला न्युमोनिया (नवज्वर) झालेला होता. कित्येक आठवडे त्याची प्रकृति चिंताजनक होती. आपल्या मुलाला शेतकाम फार कष्टाचें ठरेल असें मत असलेल्या श्रीमती वूलवर्थचें तें मत आतां पार बदलून गेलें. दुकानांतील कामामुळेंच पोराची प्रकृति बिघडली असें आतां तिचें मत झालें. फ्रॅन्क आजारांतून बरा झाल्यावर आईनें ठरवून टाकलें

कीं, दुकानांतील नोकरी आतां पुरे झाली; आपल्या फ्रॅन्कीनें आतां शेती-वाडीवरच कामाला राहिलें पाहिजे.

जेनी वारंवार फ्रॅन्कच्या समाचारासाठीं येत असे. स्वत: जेनी शेतकरी कुटुंबांतीलच मुलगी होती. पण शेतकरी-जीवन फ्रॅन्कला जितकें नावडतें होतें तितकेंच तिलाही नावडतें होतें. पण, ग्रामीण वातावरणांत आणि चांगल्या ग्रामीण अन्नामुळें फरॅन्कची प्रकृति सुधारत आहे हें बघून श्रीमती वूलवर्थ यांचें म्हणणें जेनीला पटत गेलें.

त्या दोन्ही स्त्रियांनीं आसपासच्या ग्रामीण भागांत शोधाशोध करून एक कोंबड्यांचा अड्डा विकावू आहे अशी माहिती मिळवली. ही कोंबड्यांची वाडी चार एकर क्षेत्रफळाची होती. कोंबड्या पाळण्याचें काम, मोठ्या शेतावरील कष्टाच्या कामाच्या मानानें सोपें आणि हलकें असतें. तेव्हा, त्या तरुण जोडप्याला संसाराची सुरुवात करण्याच्या दृष्टीनें श्रीमती वूलवर्थ यांच्या मतें हा व्यवसाय अगदीं योग्य होता.

फरॅन्कच्या आईनें वरील मुद्दा मांडला आणि जेनी तिच्याशीं सहमत झाली. आजारीपणामुळें फरॅन्क आधींच खूप अशक्त झाला होता, निरुत्साहीही झालेला होता. त्याला प्रिय असणाऱ्या या दोन स्त्रियांच्या इच्छेविरुद्ध कांहीं हट्ट चालविणें त्याला शक्य झालें नाहीं. अनिच्छेनेंच त्यानें आपल्या स्वप्नाला रामराम ठोकला आणि कोंबडीपालक बनण्याचें मान्य केलें.

त्या तरुण जोडप्याचा विवाह समारंभ वूलवर्थ कुटुंबाच्या घरींच ता. ११ जून १८७६ रोजीं साजरा झाला. त्या दोघांनीं बचत केलेली संयुक्त शिल्लक त्या छोट्या वाडीच्या किंमतीचा पहिला हप्ता भरण्याच्या कामी खर्ची पडली. फ्रॅन्कच्या बाबांनीं कोंबड्यांचीं पिलें पुरविलीं.

फरॅन्कचा हा नवा धंदा संपूर्णपणें अपयशी टरला असें म्हणतां यावें इतके दिवस मुळीं चाललाच नाही ; अर्थात् तो यशस्वीही ठरला नाहीं हें तितकेच खरें. आणि या धंद्याच्या कालावधींत कोंबडी या प्राण्याविषयीच फरॅन्क वूलवर्थ याच्या मनांत इतका तिटकारा निर्माण झाला कीं, पुढें आयुष्यभरांत त्यानें कधीं आपल्या पानांत कोंबडीचें शिजवलेलें मांस चुकूनहि पडूं दिलें नाहीं.

चार महिन्यांनींच सुटकेचा नि:श्वास सोडावासा वाटावा असें पत्र श्री. मूर यांच्याकडून आलें. फरॅन्कचा हा जुना मालक करडा असला तरी न्यायी वृत्तीचा होता. त्यांनीं आपल्या पत्रांत कांहींशा ताठरपणानेंच पण प्रांजळपणें कबुली दिली होती कीं, दुकानाची सुंदर सजावट बघण्याची संवय झालेल्या ग्राहकांना चुकल्याचुकल्यासारखें वाटतें. सजावट करण्याचें फ्रॅन्कसारखें कौशल्य इतर कोणाही नोकरामध्यें दिसून येत नव्हतें. जर फरॅन्क परत नोकरीवर यायला तयार असला तर आठवड्याला दहा डॉलर पगार द्यायला श्री. मूर तयार होते. शिवाय, पूर्वीप्रमाणें दुकानांतील गड्याचीं कामें यापुढें त्याला करावीं लागणार नाहींत, असेंही त्यांनीं पत्रांत म्हटलें होतें.

पत्र वाचतां वाचतां फरॅन्कचें हृदय आनंदानें नाचूं लागलें. अखेर जी गोष्ट फरॅन्कला प्रथमपासूनच माहीत होती ती आतां श्री. मूर यांना पटली तर! त्याचें काम महत्त्वाचें होतेंच होतें! आतां पुरेसा वेळ मिळणार असल्या-मुळें, पूर्वी ज्या कल्पना त्याला प्रत्यक्षांत आणतां आल्या नव्हत्या त्या तो अमलांत आणूं शकणार होता. खरोखर, तें पत्र म्हणजे केवढी अपूर्व वार्ता होती त्याच्या दृष्टीनें! केव्हां एकदां जेनीला सांगतों असें त्याला झालें.

पण त्याला जेनीची थोडी वाट बघावी लागली. कारण, जेनी त्याच्या आईला कांहीं अंडीं नेऊन देण्यासाठीं तिकडे गेली होती. आणि जेनीची वाट बघत तो बसला असतांना त्या कालावधींत त्याच्या अंत:करणांत उचं-बळलेली लाट हळूहळू ओसरू लागली. जर या तरुण जोडप्याच्या गळ्यांत कोंबडीपालनाच्या धंद्याचें जोखड अडकण्यापूर्वींच श्री. मूर यांनीं ही नवी नोकरी देऊं केली असती तर! आतां फरॅन्क कसा होकार देऊ शकणार होता?

जेनी आल्यावर तिच्या हातीं तें पत्र देत फरॅन्क खेदपूर्ण स्वरांत म्हणाला, "या पत्राचा कांहीं उपयोग होण्याच्या दृष्टीनं आतां खूप उशीर झालाय् असं मला वाटतं–"

जेनीनें पत्र वाचलें आणि तिच्या डोळ्यांत आनंदाची चमक झळकली. ती म्हणाली–"उशीर झाला?–मुळींच नाहीं उशीर झाला, फ्रॅन्क! श्री. मूर यांनीं देऊ केलेली नोकरी तुम्ही पत्करली पाहिजे. बघा ना, किरकोळ गड्या-कामांतून तुमची सुटका करणार आहेत ते अन् तुम्हांला अगदीं मना-प्रमाणें काम करायचं स्वातंत्र्यही देणार आहेत. तुम्हांला जें मनापासून हवं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 32840 वि. चरित्र
क्रमांक 1086 नों. दि. 27/3/62



होतं तेच घडतंय्. अन् पगार सुद्धां दहा डॉलर आठवडा! तुम्हीं बाजी जिंकलीत, फ्रॅन्क! तुमचा दृष्टिकोन त्यांना स्वीकारायला लावला आहे तुम्हीं. तेव्हां तुम्ही ही नोकरी पत्करणार म्हणजे पत्करणारच–"

"पण कोंबड्याच काय करायचं?" फ्रॅन्कनें हरकत उपस्थित केली.

"तुम्हीं कोंबड्यांची काळजीच करूं नका. मी राहीन इथं अन् ही वाडी विकली जाईपर्यंत कोंबड्यांची देखभाल करीन. पण कांहीं झालं तरी तुम्ही तिकडे जा. दुकान हेंच तुमचं योग्य क्षेत्र आहे."

आणि जेनीनें सुचविल्याप्रमाणें व्यवस्था ठरली. फ्रॅन्क वॉटरटाऊनमधील आपल्या जुन्या खानावळींत राहायला गेला. दर आठवड्याच्या सुटीला तो बिऱ्हाडीं येत असे. जवळ जवळ वर्षभर जेनीनें कोंबडी-वाडीची जबाबदारी सांभाळली. नंतर एका शेजाऱ्यानें वाडी भाड्यानें घ्यायची तयारी दाखविली. कोंबड्यांच्या बदल्यांत जेनीला शिवणयंत्र द्यायला तो तयार होता. स्वत:चें शिवणयंत्र असल्यावर गांवांत जेनी आणखी थोडी कमाई करून उत्पन्नांत भर घालूं शकणार होती. जेनीनें सासूशीं विचारविनिमय केला. सासूनें आग्रहपूर्वक सल्ला दिला कीं, तसंच कर नि सरळ नवऱ्याजवळ राहायला जा.

फ्रॅन्कची आई म्हणाली, "फ्रॅन्क स्वत:च्या मतानं शेतकाम किंवा असलं दुसर काम कधींच पुन: करायला तयार होणार नाहीं. कोंबडीपालनाचा धंदा आग्रहानं त्याच्या गळ्यांत बांधण्यांत माझं चुकलंच होतं. बघितलंस ना, कोंबड्या म्हटल्या कीं कशा आठ्या पडायच्या त्याच्या कपाळाला. अन तुला तरी कुठं आवड आहे पोरी? मला तर वाटूं लागलंय् कीं तुम्हीं दोघांनीं त्या वेळीं माझं ऐकून हा व्यवसाय पत्करायलाच नको होता."

"पण, आई, तुम्हांला वाटलं होतं की, त्यांतल्या त्यांत हाच व्यवसाय बरा होता. म्हणून तुम्हीं सुचविलंत. अन् मला देखील त्या वेळीं तसंच वाटलं होतं. दुकानाबाहेरच्या क्षेत्रांत फ्रॅन्क कधींच सुखी होणार नाहींत हें मनोमन माहीत असूनदेखील मला तसं वाटलं होतं. त्यांच्या आवडीचं असं तें एकच एक क्षेत्र आहे.

"मला पूर्ण जाणीव आहे-" मुस्कारा सोडीत श्रीमती वूलवर्थ म्हणाल्या, "त्याचा पिंडच तो आहे. अन् माणसाच्या आवडी बदलण्याचा प्रयत्न करणं रास्त नव्हे. पुन: आपण तसा प्रयत्न करतां नये, जेनी, कधींच करतां नये!"

" नाहींच करायचं पुन: कधीं तसं–" जेनीनें सासूला दुजोरा दिला.

आणि दोन्ही स्त्रियांनीं हा निर्धार अखेरपर्यंत पाळला. अंतिम यशापर्यंतची मजल गांठण्यासाठीं जीं अनेक वर्षे झगडून, निराशा पदरांत घेऊन कंठावीं लागलीं तीं सारीं वर्षे जेनीनें हा निर्धार विचलित होऊं दिला नाहीं. आईला तो झगडाही पहायला मिळाला नाहीं कीं त्यांतून संपादिलेला विजयही डोळे भरून बघतां आला नाहीं. तें तरुण जोडपें वॉटरटाऊनच्या आपल्या कुटींत पुन: संसार थाटून राहायला लागून कांहीं थोडेच महिने होतात, न होतात तोंच एक दिवस निर्वाणीचा निरोप आला. त्या जोडप्याला घाईनें श्रीमती वूलवर्थच्या रुग्णशय्येपाशीं हजर व्हावें लागलें. अविरत काबाडकष्टांनीं प्रकृति खिळखिळी झालेल्या फॅनी मॅकब्रिअर वूलवर्थ यांना वयाच्या अवघ्या सत्तेचाळिसाव्या वर्षी मृत्यूनें ओढून नेलें. १८७८ च्या वसंत ऋतूंत जन्मलेल्या आपल्या पहिल्या नातीला-छोटया हेलेनाला बघण्याचें भाग्य लाभण्याइतकें आयुष्य कांहीं त्या माउलीला मिळालें नाहीं.

श्रीमती वूलवर्थ यांच्या निधनामुळें कांहीं फेरबदल झाले. आई गेल्यानंतर आतां आपल्याला घरच्या शेतवाडीवर मुळींच राहायचें नाहीं असें चार्लीनें स्पष्टपणें सांगून टाकलें. आपल्या थोरल्या भावाप्रमाणेंच त्यालाही कृषिजीवनाचा तिटकाराच होता. आणि थोरल्या भावाप्रमाणेंच नागरी क्षेत्रांत स्वत:च्या नशिबाची परीक्षा बघण्याचा त्याचा विचार होता. बाबांनीं शेतवाडी विकून फ्रॅन्ककडे राहायला जावें हें उत्तम असें त्यानें सुचविलें.

पण बाबांनीं असें कांहीं करण्यास ताडकन् नकार देऊन टाकला. आपल्या मुलाना न आवडो, पण शेतीव्यवसाय त्यांचा आवडता होता. तें त्यांचें घर होतें. आपल्या घरीच आपण राहाणार असा निर्धार त्यांनीं सांगून टाकला.

दोघांचें म्हणणें शांतपणें ऐकून घेऊन फ्रॅन्कनें त्यांतून मार्ग काढला. मूर याच्या दुकानांत चार्लीला नोकरी मिळवून देतां येईल. बाबांची गृहव्यवस्था ठेवण्यासाठीं एकादी चांगली बाई हुडकून काढूं. दोन्ही मुलांनीं थोडे थोडे पैसे बाबांना पाठवावेत म्हणजे त्यांतून त्या बाईचें नि चार्लीच्याऐवजीं शेतकाम करणाऱ्या मजुराचें वेतन देतां येईल, असें फ्रॅन्कनें सुचविलें.

फ्रॅन्कनें सुचविलेली व्यवस्था चांगलीच व्यवहार्य ठरली. कांहीं दिवसांनीं बाबांनीं गृहव्यवस्था ठेवणाऱ्या स्त्रीबरोबर विवाह केला. आणि खूप

दीर्घकालपर्यंत त्यांनीं स्वत:च्या शेतवाडीवर जीवन व्यतीत केलें. पुढील काळांत आपल्या मुलांच्या शहरांतील आलीशान निवासस्थानांत मधून मधून ते रहायला येत असत ; पण फारच थोडे दिवस त्यांचा हा मुक्काम असे. वूलवर्थ कुटुंबांतील कोणाही व्यक्तीला शहरी जीवन कां रुचावें हें त्या वृद्धाला जीवनाच्या अखेरीपर्यंत कधींच आकलन झालें नाहीं

चार्ली वूलवर्थ मूरच्या दुकानांत नोकरीस राहिला आणि त्यानें आपलें बस्तान चांगलेंच बसविलें. कलात्मक सजावट करण्याचा भावाचा गुण त्याच्यांत नव्हता, पण तो उत्तम विक्रेता ठरला. श्री. मूर यांना या दोघां वूलवर्थ बंधूंचें महत्त्व इतकें वाटूं लागलें कीं, धंदा-व्यवसायाच्या प्रतिकूल दिवसांत आपल्या कांहीं विक्रेत्यांना निरोप देणें त्यांना भाग पडलें तरी त्यांनीं या दोघां भावांना मात्र नोकरीवर तसेंच ठेवलें होतें.

✦ ✦ ✦

# 'दरेक चीज–पांच पांच सेन्ट' : ६ :

१८७८च्या उन्हाळ्यांत धंदाव्यवसायाची परिस्थिति फारच वाईट होती. तेजी-समृद्धीचा कांहीं काळ गेल्यानंतर मागोमाग मंदीची लाट आली. व्यापारधंद्याला जोरांत उतरती कळा लागली. सबंध देशांतल्याप्रमाणें वॉटरटाऊनच्या व्यापाऱ्यांनाही मंदीचा फटका बसला. विक्री रोडावत आहे हें उघड्या डोळ्यांनीं बघत श्री. मूर काळजींत चूर झालेले होते. म्हणूनच एका फिरत्या विक्रेत्याची एक सूचना ऐकून घेण्याची त्यांनीं तयारी दाखविली.

त्या विक्रेत्यानें सांगितलें कीं, कांही शहरांतील दुकानदार ग्राहकांना आकर्षून घेण्यासाठीं एक नवा प्रयोग करीत आहेत. दुकानांत एका मेजावर, सरसकट पांच सेंट किमतीच्या वस्तु मांडून ठेवायच्या अशी ती नवी योजना होती. या योजनेंत नफा फारसा नसेल, पण तिच्या आकर्षणामुळें दुकानांत

गिऱ्हाईक येत होतें. एकदां गिऱ्हाईक दुकानांत आलें कीं भारी किंमतीचा माल त्याला घ्यायला लावण्यासाठीं विक्रेते त्याचें मन वळवूं शकत होते.

ही योजना श्री. मूर यांना रुचली नाहीं. कारण उत्कृष्ट प्रतीच्या मालाचाच व्यवहार करणें त्यांना अभिमानास्पद वाटत होतें. पण, दुसरें कांहीं तरी करणें भाग होतें. म्हणून न्यूयॉर्कला खरेदीसाठीं गेल्यावर त्यांनीं सरसकट पाच सेन्टला विकतां येण्याजोग्या विविध वस्तु तीनशें डॉलरपर्यंत खरेदी केल्या. माल येऊन दाखल होतांच त्यांनीं तो फ्रॅन्क वूलवर्थच्या सुपूर्द केला.

ते म्हणाले, " हा माल मी तुझ्याकडे सोंपवीत आहें. तूं एक खास मेज त्यासाठीं मांडायचं. आपलीं नेहमींचीं गिऱ्हाइकं कांहीं तिकडे वळणार नाहीत अन् त्यांना ती योजना रुचणारही नाहीं असं मला वाटतं. तेव्हां फार ठळक जागीं तें मेज मांडूं नकोस. स्वस्तांत सौदा करूं इच्छिणारीं ग्रामीण गिऱ्हाइकं तिकडे वळतील एवढीच आशा आपण करूं शकतों." अखेर सुस्कारा सोडून ते उद्गारले, "आपल्याला हलक्या ग्राहकांशीं व्यवहार करावा लागेल असं मला कधींच वाटलं नव्हतं."

फ्रॅन्क स्वत:शीच हंसला. श्री. मूर ज्याला ' हलकें गिऱ्हाईक ' म्हणत होते, तसलें गिऱ्हाईक आपल्या दुकानांत येणें ही कल्पना त्यांना तिरस्करणीय वाटत होती. अशा 'सस्त्या' व्यापाराचा त्यांना मनस्वी वीट होता. पण, फ्रॅन्कला या कल्पना शहाणपणाच्या वाटत नव्हत्या. थोडेथोडे पैसे खर्च करूं शकणारीं असंख्य गिऱ्हाइकें मिळत असतील तर ती गोष्ट जास्त पैसे खर्चणारी मूठभर गिऱ्हाइकें मिळण्याइतकीच चांगली कां मानू नये ?

ज्या वेळीं फक्त पांचच पेनी घेऊन फ्रॅन्क चार्लीसह याच दुकानांत आला होता त्या वेळीं तो ' हलकें गिऱ्हाईक'च होता. पण त्या वेळीं तो म्हणाला होता, ' गिऱ्हाईक तें गिऱ्हाईक. सर्वच गिऱ्हाइकें समान दर्जाचीं असतात. ' आतांही त्याच शब्दाचा पुनरुच्चार त्यानें मनाशीं केला. साऱ्या दुकानाचा व्यवहार हाताळण्याबद्दलच्या त्याच्या कल्पनांना अनुसरूनच तो, ' दरेक चीज–पांच पांच सेंट ' पद्धतीच्या त्या मेजाची व्यवस्था ठेवणार होता.

ग्रामीण जत्रेच्या सप्ताहांत वरील मालाचा ' सौदा ' मांडण्यांत येणार होता. ज्या दिवशीं विक्री सुरू व्हावयाची त्याच्या आदल्या रात्रीं सर्व वेळ राबून फ्रॅंकनें आणि चार्लीनें मिळून सौद्याच्या मेजाची मांडणी केली.

दोन लांबलचक मेजें एकाला एक जोडून दालनाच्या मध्यभागीं ठेवण्यांत आलीं. मेजांच्या चारही बाजूंना भडक तांबडया सुती कापडाचे पडदे सोडण्यांत आले. मेजांच्या पृष्ठभागावरही तसलेंच कापड अंथरण्यांत आलें. त्या भडक रंगाच्या पार्श्वभूमीवर फ्रॅन्कनें विविध वस्तूंची मांडणी अशा प्रकारें केली की त्यांतील प्रत्येक वस्तु ठळकपणें नजरेंत भरावी. टाकांच्या निबा, पेन्सिली, सेफ्टी पिना, गुंडया, गळपट्टीचे चाप, धुण्याचीं पत्र्याचीं भांडीं, टिपणवह्या आणि कांहीं तांबडया रंगाचीं हातपुसणीं, इतक्या वस्तु त्या मेजांवर मांडण्यांत आल्या होत्या.

अशा वस्तूंचा तो संग्रह आकर्षक दिसेल असा मांडणें हें बिकट काम होतें. रेशमी, मखमली व कलावतू कापडांच्या सजावटीचें काम फ्रॅन्कच्या हातवळणीं पडलेले होतें. आणि हा माल मुळांतच सुंदर असतो. पण या गृहोपयोगी किरकोळ वस्तु कांही सुंदर नव्हत्या, खास. पण, फ्रॅन्कनें आपलें सारें कौशल्य पणाला लावलें. आणि सर्व मांडणी अखेर पुरी झाल्यावर बघतांना त्यानें एका मोठया पुठ्ठ्यावर ‘ हरेक चीज पांच-पांच सेंट ’ अशीं अक्षरें काढून ती पाटी तेथें लटकावून दिली.

दुसऱ्या दिवशीं दुकान उघडण्यापूर्वींच फ्रॅन्क त्या मेजापाशीं हजर होता. एक दोन तास त्याला अगदीं स्वस्थपणें उभें राहावें लागलें. त्या वेळांत कांहीं थोडया स्त्रिया दुकानांत आल्या पण त्या नेहमींच्या विक्रीच्या जागेकडेच गेल्या. तेथेंच त्यांनीं काय ती खरेदी केली. फ्रॅन्कच्या ‘सौदा-मेजा’कडे त्यांनीं फक्त कुतूहलानें दृष्टिक्षेप टाकले. तेथून कांहींही खरेदी न करतांच त्या बाया दुकानाबाहेर पडल्या. श्री. मूर यांचें भाकीत खरें ठरलें.

दुकानाबाहेर चौकांत शेतकरी आणि त्यांची बायकापोरें जत्रेसाठीं जमूं लागलीं होतीं. गर्दी वाढत होती. फ्रॅन्क मनाशीं तळमळत म्हणाला, “ जर श्री. मूर यांनीं सौदा-मेजाची जाहिरात प्रदर्शनीय खिडकींत लावूं दिली असती तर किती बरें झालें असतें !” जत्रेसाठीं आलेल्या शेतकरी मंडळीचें लक्ष त्या मेजाकडे कसें काय वेधले जाणार हेंच त्याला उमजेना.

पण, नऊ-दहाच्या सुमारास शेतकरी लोकांचें लक्ष तिकडे वेधलें गेलें. सुती छापील कापडाचे कपडे घातलेली एक स्त्री आंत आली. तिनें पत्र्याच्या हात धुण्याच्या भांडयाची किंमत विचारली.

फरॅन्क सौजन्यपूर्ण स्वरांत उत्तरला, " पांच सेंट बाईसाहेब. या मेजा वरच्या इतर कोणत्याही वस्तुइतकीच किंमत. प्रत्येक वस्तूची किंमत पां पांच सेंटच आहे. सावकाश बघा नि हवें तें घ्या. हरेक चीज पांच पांच सेंट.

त्या स्त्रीनें कांहीं तरी वस्तु विकत घ्यावी म्हणून तिला गळ घालण्याच मोह होत होता. पहिली विक्री व्हावी अशी अनिवार इच्छा फरॅन्कल असणारच. पण सौदा-मेजावरील विक्री सबंध दुकान चालविण्यासंबंधींच आपल्या कल्पनांबरहुकूम करायची असा त्याचा निर्धार होता. प्रत्ये ग्राहकाला स्वेच्छेनें माल कोणता घ्यायचा हें ठरवायला मुभा असली पाहिजे विक्रेत्यानें ग्राहकावर दडपण आणतां नये, अशी त्याची दुकान चालविण्य विषयींची कल्पना होती.

म्हणून मेजामागें तो शांतपणें उभा राहिला. वरील माहिती देण्य व्यतिरिक्त जास्त शब्दही बोलला नाहीं. मेजाच्या या टोंकापासून त टोंकापर्यंत ती स्त्री हिंडत होती. मधून मधून एखादी वस्तु उचलून ब परत ठेवून देत होती. अगदीं सावकाश, मनाप्रमाणें तिचें निरीक्षण च होतें. अखेर तिनें आपला जुनाट बटवा काढला. आंतलीं नाणीं काळजीपूव मोजलीं. मग, ती फ्रॅन्कपाशीं आली.

" मिस्टर, मला हें हात धुण्याचं भांडं हवंय्. अन् मुलासाठीं पेन्सि नि वही. अन् मला वाटतं, हे दोन—" आपल्या खडबडीत हातांनीं तांब भडक सुती हातपुसणीं कुरवाळीत ती बाई म्हणाली.

फरॅन्कनें पैसे घेतले आणि त्या वस्तु बांधून दिल्या. पण, बांधतांना त्य जाणून बुजूनच पुडकें अशा प्रकारें बांधलें कीं, ती स्त्री दुकानाबाहेर प तेव्हां पुडक्यांतील भांड्याचा चकचकीत भाग आणि हातपुसण्याचा तां रंग याकडे इतरांची दृष्टी जाईल. जाणूनबुजूनच त्यानें पुडकें सैलसें बांध

पण, तसें करण्याची फारशी जरुरीच नव्हती. कारण, दुकानाच्या दरवाजा बाहेरच्या हालचाली बघतांना त्याला स्पष्ट दिसलें कीं, इतर मैत्रिणी भेटत त्या स्त्री गिऱ्हाइकानें पुडक्याचा कागद फाडून वस्तु दाखवायला सुरुवात के

" फक्त एक निकेल—पांच सेंटच फक्त !" त्या स्त्रीचे आनंदाश्चर उद्गार फरॅन्कला ऐकूं येऊं लागले, " त्या दुकानांत अशा वस्तूंचं स्व टेबलच आहे. अन् आश्चर्य असं कीं प्रत्येक वस्तूची किंमत एका निकेलपे मुळींच जास्त नाहीं. हरेक चीज–पांच पांच सेंट ! "

आणि मग ती बातमी वेगानें पसरली. दुपारपूर्वीच दुकानांत इतकी गर्दी झाली कीं तशी गर्दी 'मूर्स अँड स्मिथ्स् स्टोअर'नें पूर्वी कधींच पाहिली नसेल. आणि श्री. मूर यांना निराश करणारी गोष्ट अशी कीं या गर्दीतील गिऱ्हाइकांचें लक्ष त्या 'सौदा-मेजा' व्यतिरिक्त अन्यत्र कोठेंच जात नव्हतें. दुकान बंद होण्याच्या वेळेपर्यंत तें मेज जवळजवळ रिकामें झालें होतें. नव्या मालाची मागणी तारेनें करण्यासाठीं फ्रॅन्क वूलवर्थला तारकचेरीकडे पिटाळण्यांत आलें. आणि आलेला माल घेण्यासाठीं दुसऱ्या दिवशीं पहांटेच त्याला स्टेशनवर जावें लागलें. माल आणून भराभर त्यानें 'सौदा-मेजा' वर वर पुन: मांडणी केली आणि विक्रीच्या दुसऱ्या दिवशीं येणाऱ्या जास्त गर्दीच्या स्वागतासाठीं तो सज्ज झाला.

जत्रेच्या आठवड्यांत, त्या मूर अँड स्मिथच्या 'पांचसेन्टवाल्या' सौदा-मेजानें खळबळ उडवून दिली होती. पहिल्या दिवसानंतरच्या गिऱ्हा-इकांच्या गर्दींत केवळ शेतकरी लोकच नव्हते. खुद्द वॉटरटाऊनमधील कांहीं स्त्रियाही शेतकरी स्त्रियांच्या धक्काबुक्कींत सामील होऊन उत्सुकतेनें खरेदी-साठीं पुढें पुढें घुसतांना दिसत होत्या. या प्रकाराबद्दलचा आपला तिटकारा श्री. मूर यांनीं मुळींच लपवून ठेवला नाहीं. स्वस्त मालाच्या आकर्षणामुळें येणारीं नवीन गिऱ्हाइकें अन्य कोणताच माल घेत नव्हतीं. म्हणूनच नेहमींच्या धंद्याच्या दृष्टीनें 'सौदा-मेज' श्री. मूर यांना प्रतिकूल वाटत होतें. मूळ दुकानांतील पंचवीस सेंट किंमतीचे चाप चांगले मजबूत आणि टोंकदार असले तरी, स्वस्त मालापुढें तसले चाप विकत घेण्यासाठीं न्याया-धीशाच्या पत्नीचेंही मन वळविणें बिकट होतें. भारी किंमतीच्या चापासारखे दिसणारे चाप पांच सेंटला मिळत असतांना ती दुसरीकडे कशी वळणार ?

तथापि आठवड्याच्या अखेरीस हिशेब पुरा केल्यावर श्री. मूर यांना कबूलच करावें लागलें कीं, 'सौदा-मेजा'च्या विक्रीत पुष्कळच नफा झाला आहे. पण, 'सौदा-मेज' हें दुकानाचें एक कायमचें अंग म्हणून चालू ठेवावें असें फ्रॅन्क वूलवर्थनें सुचवितांच मात्र त्यांनीं नकारार्थी मान हलविली.

किरकिऱ्या आवाजांत ते म्हणाले, "मला नाहीं आवडत हा प्रकार, फ्रॅन्क ! या प्रकारांतली कोणतीच बाब मला आवडत नाहीं. त्यामुळें दुका-नाचें वातावरण बिघडून जातें. होय, पैसे मिळविण्याच्या दृष्टीनें हा प्रकार

ठीक आहे हें मी अमान्य करीत नाहीं. पण माझ्या दुकानासारख्या दुकानाशीं विसंवादी गोष्ट आहे ही."

"तुमचं म्हणणं बरोबर असेल," फ्रॅन्क म्हणाला, "माझ्या मनांत कसला विचार घोळतोय्, सांगू ? माझी कल्पना भरमसाट, वेडगळ असेल कदाचित्. पण, पांच सेंटवाल्या वस्तूंचें दुकान काढण्याचा विचार माझ्या मनांत आहे- जिथें पांच सेंटपेक्षां जास्त किंमतीची वस्तूच नाहीं अशा स्वस्त मालाचंच दुकान काढायची माझी कल्पना आहे- अर्थात् तसं दुकान काढण्याला माझ्यापाशीं पैसा आला तर! तसा पैसा मिळाला तर मी अशा प्रकारचंच दुकान काढूं इच्छितों."

"पांच सेंटवाल्या मालाचं दुकान ?" त्या अनुभवी दुकानदाराचे चाणाक्ष डोळे संकोचल्यासारखें झाले. पांच सेंटवाल्या सौदा-मेजावरील विक्रींत झालेल्या नफ्याच्या आकड्यांवरून नजर टाकीत श्री. मूर सावकाश-पणें म्हणाले, "कल्पना आहे खरी ! कदाचित् तूं म्हणालास तशी ती कल्पना भरमसाट – कांहींशी वेडगळही असेल, फ्रॅन्क. पण, कांहीं सांगतां येत नाहीं. बरं, तुझ्यापाशीं स्वतःचे असे कांहीं पैसे आहेत काय ?"

"नाहीं, श्री. मूर. म्हणूनच तसले विचार करण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असं म्हटलं मी. पण ही कल्पना व्यवहार्य मात्र खास ठरेल. माझी तशी खात्री आहे-"

"कुठं काढशील दुकान ? इथं, वॉटरटाऊनमध्येंच ?"

"इथं काढावं असं नाहीं मला वाटत. यापेक्षां मोठं शहर मी निवडणं योग्य ठरेल. जिथं कारखाने आहेत असं. म्हणजे कामगारवर्गाची वस्ती असलेलं शहर. या वर्गाला स्वस्त किंमतीच्या वस्तु हव्या असतात. कारण माझं दुकान स्वस्त मालाचंच असणार. अगदीं सामान्य गिऱ्हाइकं जितकीं मिळतील तितकीं मिळावीत हाच माझा हेतु असणार."

"तें बरोबर आहे." श्री. मूर यांनीं एक कागदाचा ताव घेतला आणि आकडेमोड करायला सुरुवात केली. नंतर ते म्हणाले, "तुला सुरुवातीलाच किमान तीनशें डॉलर लागतील, फ्रॅन्क. तुझ्या श्रीमंत मामांना, मॅक्ब्रिअरना विचारशील तर ? ते तुला ही रक्कम कर्जाऊ देतील का ?"

"देणार नाहींत अशीच खात्री आहे माझी." नकारार्थी मान हलवीत फ्रॅन्क म्हणाला, "तरी पण मी विचारून बघेन. श्री. मूर, माझ्या या

कल्पनेंत कांहीं अर्थ आहे असं खुद्द तुम्हांला वाटतं का ? माझं अन् माझ्या पत्नीचं याबद्दल बोलणं झालंय्. ही कल्पना चांगली आहे असं तिला वाटतं न् तिचा मला पाठिंबा आहे. पण ती मला नेहमींच प्रोत्साहन देत असते— बायकांची वृत्ति माहीतच आहे तुम्हांला. तुमची गोष्ट निराळी आहे. तुम्ही स्वतः धंदेवाईक गृहस्थ आहांत. माझी अपेक्षा आहे कीं याबाबत तुम्ही तुमचं प्रांजळ मत सांगावं."

"प्रांजळपणें सांगायचं, म्हणजे मला कांहींच कल्पना नाहीं, फ्रॅन्क. माझा सर्व अनुभव किंमती माल विकण्याच्या धंद्यांतला आहे. भाव किती पडतो याची जे पर्वा करणारे नाहींत अशा लोकांना किंमती, उत्कृष्ट दर्जाचा मालच विकत आलोंय् मी आजवर. पण आजकाल असलं गिऱ्हाईक फारसं राहिलेलं नाहीं असं दिसतं." खेदनिदर्शक अशी मानेची हालचाल करीत ते म्हणाले, "हलक्या गिऱ्हाइकांसाठीं स्वस्त मालाचं दुकान! आजच्या बिकट काळांत कदाचित् अशाच दुकानाची जरूरी असेल. तूं काढशील तें स्वस्त मालाचं दुकान अत्यन्त यशस्वी ठरेल किंवा ठरणार देखील नाहीं. कोणत्याही दृष्टीनें बघितलं तरी तो एक सट्टा, एक जुगारच आहे, फ्रॅन्क. तेव्हां मी निश्चित भाकित करूं इच्छित नाहीं."

चर्चा संपल्याची खूण म्हणूनच कीं काय श्री. मूर उठून उभे राहिले. पण फ्रॅन्क जाऊं लागला तसा त्याचा हा मालक सहज म्हणावे तसें म्हणाला, "तूं तुझ्या मामांना विचारून तर पहा. विचारण्यांत तर कांहींच नुकसान नसतं."

फ्रॅन्क आनंदानेंच घरीं गेला. स्वतःच्या घोडा-गाडीमधून न येणाऱ्या सामान्य गिऱ्हाइकाबद्दलची आस्था श्री. मूर यांना वाटणें शक्य नसलें तरी ते चाणाक्ष धंदेवाईक व्यापारी होते. स्वतःची घोडा-गाडी नसणाऱ्या लोकांनाही वस्तु विकत घ्याव्याच लागतात हें त्यांना माहीत होतें. पांच सेंटवाल्या दुकानाची कल्पना त्यांच्या मनावर ठसली होती. फ्रॅन्कला तेवढें प्रोत्साहन पुरेसें होतें.

आपल्या अल्बॉन मामांकडे कर्ज मागण्यासाठीं फ्रॅन्कनें ताबतोब पत्र लिहिलें. पण त्याचा अंदाज खरा ठरला. अशा प्रकारच्या दुकानांत पैसे गुंतवायला त्याच्या त्या शेतकरी मामानें साफ नकार दिला. विशेषतः; ज्या प्रकारचं दुकान लोकांच्या ऐकिवांत नाहीं अशा दुकानांत भांडवल गुंतवायला तो मुळींच तयार नव्हता. फ्रॅन्क एकादी शेतीवाडी घेऊं इच्छित असेल तर

गोष्ट निराळी ! पण अशा प्रकारच्या मूर्खपणाच्या योजनेवर आपले मोलाचे तीनशें डॉलर उधळायला अल्बॉन मामा मुळींच तयार नव्हता.

एक आठवड्यानें फ्रॅन्क पुन्हां आपल्या मालकाशीं बोलणें करायला गेला. मामांना केलेल्या विनंतीला वाटण्याच्या अक्षता लागल्या हें सांगून त्यानें श्री. मूर यांनाच जरा धिटाईनें म्हटलें “ तुम्हीच मला पतीवर उधार माल दिला तर–– ”

फ्रॅन्क मनमोकळेपणें म्हणाला, “ माल कसा मिळवायचा हीच मला काळजी आहे. तुमच्या घाऊक विक्रीच्या शाखेकडून मला माल पुरविला जाईल अन् त्याबद्दल माझ्याकडून वचनचिठ्ठी घेतली जाईल–तर बाकीची व्यवस्था मी करूं शकेन. दुकानभाडं, मांडण्या-मेजं यांची तरतूद करण्या-पुरते पैसे माझ्यापाशीं आहेत. अर्थात् त्या बाबतीतहि फार खर्च येत नसेल तरच माझी शिल्लक पुरेल. जेनी कपडे शिवते त्या मिळकतींतून ती, माझ्या दुकानाचं बस्तान बसेपर्यंत स्वत:चं नि मुलीचं पोट भरूं शकेल. पण, कांहीं झालं तरी, माल खरेदीसाठीं तीनशें डॉलर मी पृथ्वीच्या पाठीवर कुठूनच मिळवूं शकणार नाहीं. तुम्हींच, श्री. मूर, मला हातभार लावाल तर–”

त्या पोक्त व्यापाऱ्याच्या मुद्रेवरून अपरिचित स्मिताची रेषा उमटून गेली. तथापि ते कांहींशा तुटक स्वरांतच म्हणाले, “ माझ्या मनांत प्रथम-पासून तोच विचार होता. पण, प्रथम मॅक्ब्रिअरना विचारून पाहिलेलं बरं असं मला वाटलं. ठीक आहे. फ्रॅन्क, तूं दुकानासाठीं जागा पहा. दुकान सज्ज कर. तुझी तयारी झाल्यावर आम्ही तुला तीनशें डॉलर किंमतीचा माल उधार देऊं. ”

✦ ✦ ✦

# वूलवर्थचें पांच व दहा सेंटवाल्या वस्तूंचें दुकान :७:

आतां फ्रॅन्कचें वय सत्तावीस होतें. तो विवाहित होता. एका मुलीचा बाप होता. आठव्या ईयत्तेपर्यंत गेल्यावर त्याचें शिक्षण संपुष्टांत आलेलें होतें. ज्या परगण्यांत जन्म झाला त्याच्या सीमेबाहेर आतांपर्यन्त त्यानें कधींच पाऊल ठेवलेलें नव्हतें. आतांपर्यन्त त्यानें कमावलेला जास्तींत जास्त पगार म्हणजे आठवड्याला दहा डॉलर. कापड, कपडे आदि वस्तूंच्या विक्री-व्यवहाराचा सहा वर्षांचाच अनुभव त्याच्या पाठीशीं होता. असा हा तरुण खिशांत रोख पंचवीस डॉलर आणि डोक्यांत एक कल्पना घेऊन आपल्या बालपणापासूनचें ' स्वत:च्या मालकीचें दुकान ' काढण्याचें स्वप्न साकार करण्यासाठीं प्रस्थान ठेवीत होता.

आपल्या या साहस-प्रयोगासाठीं न्यूयॉर्क संस्थानांतील उटिका उत्पादन-केंद्राची त्यानें निवड केली. हें शहर वॉटरटाऊनच्या पांचपट लोकवस्तीचें होतें. विणलेलीं अंतर्वस्त्रें आणि सुती कापड तयार करण्याच्या गिरण्या तेथें होत्या. गिरणी कामगारांचीं वेतनें फारच खालच्या पातळीवरचीं होतीं. त्यामुळेंच आपल्याजवळचे पैसे त्यांचा जास्तींत जास्त मोबदला मिळेल अशा प्रकारें जपून खर्च करण्याची त्या लोकांना अत्यंत आवश्यकता होती. पांच सेंटवालें दुकान काढण्याला उटिका हें आदर्श ठिकाण आहे असें फ्रॅन्कला वाटले.

१८७९ च्या जानेवारीच्या अखेरी अखेरीस तो त्या शहरांत येऊन दाखल झाला. आपली चटईची पिशवी स्टेशनवरच ठेवून भाड्याच्या दृष्टीनें परवडेल अशी रिकामी जागा धुंडण्यासाठीं त्यानें गांवांत भटकायला सुरुवात केली.

या पायपिटींत निराशाच पदरांत पडत होती. मुख्य रस्त्यावरील जागांचीं भाडीं न परवडण्याइतकीं जास्त होतीं. सर्व दिवसभर तो बर्फांतून वाट चालत होता. ठिकठिकाणीं बघावें, चौकशी करावी. मालकानें सांगितलेला भाड्याचा आंकडा ऐकून पुढें चालूं लागावें. असें चाललें होतें. मोक्याची जागा मिळणें ही गोष्ट महत्त्वाची होती. पण त्याला लौकरच आढळून आलें कीं, तशी जागा न मिळतांच आपल्याला काय तें करावें लागणार आहे.

अखेर एक रिकामी खोली त्याच्या पहाण्यांत आली. तेथें पूर्वीं चांभाराचें दुकान होतें. दुकानाची जागा फार लहान होती. फक्त तेरा फूट रुंद आणि वीस फूट लांब. आणि ही जागा एका आडरस्त्याला होती. जवळपास दुसरें एकही दुकान नव्हतें. पण, शहरांतला गजबजलेला बाजारपेठेचा भाग असलेल्या गेनेसी रस्त्याच्या जवळपास अशी ही एकच जागा उपलब्ध होती.

फ्रॅन्कला हवी होती अशी ती जागा मुळींच नव्हती, पण आपण तशी ती बनवूं असें त्याला वाटलें. भाडें अगदीं रास्त म्हणजे पसतीस डॉलर होतें. सर्वांत उत्तम गोष्ट अशी कीं दुकान चालू होईपर्यंत पहिल्या महिन्याच्या भाड्यासाठीं थांबायला मालक तयार होता.

फ्रॅन्क वूलवर्थ तांतडीनें ही बातमी सांगायला वॉटरटाऊनला गेला. त्यानें दुकानाची जागा मिळवली होती. आतां श्री. मूर यांनीं त्याच्यासाठीं माल मागवायचा होता.

दोघांनीं खूप रात्र होईपर्यंत बसून निवडक मालाची यादी तयार केली. फ्रॅन्कला आढळून आलें होतें कीं, पांच सेंटवाल्या 'सौदा-मेजा'शीं येणाऱ्या गिऱ्हाइकांत बहुसंख्य स्त्री गिऱ्हाइकेंच असत. तेव्हां शक्यतोंवर गृहिणींच्या गरजा भागविण्यावरच भर दिला पाहिजे असें त्याचें मत होतें. भांडीं-कुंडीं, पिठाच्या चाळण्या, शेंगड्यांच्या झडपा काढण्याचे चिमटे, रोटी कापायच्या सुऱ्या, अशा वस्तूंनाच अग्रक्रम देऊन त्यानें यादी तयार केली. सौदा-मेजा-वरील विक्रींत तांबड्या रंगाचीं हातपुसणीं चांगलीं खपत; त्यांचाही समावेश त्यानें यादींत केला. अर्थात् मुलांसाठीं देखील कांहीं वस्तु हव्यातच. तेव्हां टिपणवह्या, पेन्सिली, शाईच्या दौती यांचीही भर घालण्यांत आली.

त्यानें या यादींत खेळणीं मुळींच समाविष्ट केलीं नव्हतीं. पहिली यादी केवळ गृहोपयोगी आवश्यक वस्तूंचीच तयार करण्यांत आली होती. गोर-गरिबांना देखील चैनीच्या वस्तु, स्वस्तांत मिळत असल्या तर, हव्या असतात हें सत्य फ्रॅन्क वूलवर्थला अद्याप उमजलेलें नव्हतें. पुढें कांहीं दिवसांनीं त्याला तें उमजलें. आणि तें ज्ञान त्याला फारच फायद्याचें ठरलें.

उटिका येथील दुकानांत कांहीं प्राप्ती होईपर्यंत बिऱ्हाड तेथें हलविण्याची शक्यता नव्हती. स्वतःचा नि मुलीचा चरितार्थ चालविण्याइतकें जेनी आपल्या कपडे शिवण्याच्या कामावर मिळवीत होती. तेव्हां फ्रॅन्कनें तिला

वॉटरटाऊनच्या कुटींत ठेवून एकट्यानेंच उटिकाकडे प्रयाण केलें. तेथें एका स्वस्त दराच्या खानावळींत तो राहूं लागला. आणि गेल्याबरोबर त्यानें दुकान उघडण्याच्या पूर्वतयारीला हात घातला.

प्रथम त्यानें ती जागा वरपासून खालपर्यंत धुवूनपूसून साफ केली. साबण नि धुण्याचा सोडा यांचा प्रयोग होतांच धुरकट भिंती स्वच्छ दिसूं लागल्या. भिंतींना सफेती देतांच ती जागा जास्त मोठी नि जास्त उजेडाची भासूं लागली. देवदाराच्या नव्या फळ्या आणून एका स्थानिक सुताराच्या साह्यानें त्यानें माल मांडण्याचीं रुंद मेजें बनवून घेतलीं. त्यानें केलेली आणखी एक उधळपट्टी म्हणजे मेजांवर आच्छादन घालण्यासाठीं तांबड्या रंगाचें तलम तागाचें पांच वार कापड त्यानें खरेदी केलें. तांबडा रंग त्याला लाभणारा रंग होता आणि या साहसांत नशिबाचा शक्य तितका पाठिंबा त्याला हवा होता.

छापील हस्तपत्रकांचा खर्च फारच जास्त येणार होता; पण साऱ्या शहराला नव्या दुकानाची खबर कळलीच पाहिजे असा फ्रॅन्कचा निर्धार होता. घरोघर हस्तपत्रकें वांटण्याचें काम त्यानें एका पोऱ्याला पैसे देऊन त्याच्यावर सोंपविलें दुकानाच्या दर्शनी भागावर या टोंकापासून त्या टोंकापर्यंत अशी मोठी पाटी लावण्यासाठीं रंगविण्याकरितां एका रंगाऱ्याला तीन डॉलर देण्यांत आले. ' दि ग्रेट फाइव्ह-सेंट स्टोअर' अशी फूटभर उंचीचीं अक्षरें त्या पाटीवर झळकत होतीं. ती पाटी खात्रीनें कोणाच्या नजरेंतून सुटण्याची शक्यताच नव्हती.

फेब्रुआरीच्या अखेरीअखेरीस एका शनिवारीं रात्रीं दुकानाच्या भव्य उद्घाटनाचा मुहूर्त ठरलेला होता. गिरणी कामगारांना दर शनिवारीं वेतन मिळत असे. त्यामुळें ते व त्यांच्या बायका शनिवारीं संध्याकाळींच सारी बाजारहाट करीत असत. शनिवार बाजाराचा दिवस म्हणूनच फ्रॅन्कनें उद्घाटनासाठीं तो दिवस मुक्रर केला होता. एकच गल्ली पलिकडे असलेल्या गेनेसी रस्त्यावरून गिरणी कामगार व त्यांच्या बायकांची गर्दी व ये जा सुरू झाली. त्यांच्यापैकीं फारच थोडेजण ब्लीकर स्ट्रीटसारख्या कमी रहदारीच्या रस्त्याला वळले त्या दिवशीं. पण त्या पहिल्याच रात्रीं फ्रॅन्कच्या हातीं विक्रीचे नऊ डॉलर आले. फक्त दोनच तासांत नऊ डॉलरची विक्री

म्हणजे कांहीं वाईट नाहीं. सोमवारीं सबंध दिवसभर दुकान उघडें राहाणार होतें. सोमवारीं खरें काय तें दिसून येणार होतें.

सोमवारीं झालेली विक्री अत्यंत संतोषकारक होती. त्या दिवशीं 'विक्री-मेजा'वरील जवळ जवळ पन्नास डॉलर किमतीचा माल उठला. यामुळें फ्रॅन्क इतका उत्साहित झाला कीं त्यानें एक पगारी कारकून ठेवला नि बँकेंत खातेंही उघडलें. धंदा इतका चांगला चालत राहिला कीं श्री. मूर यांच्या रकमेचा कांहीं भाग त्यानें चेकनें पाठविला आणि आणखी मालाची मागणीही पाठविली. 'पांच सेन्टवाल्या वस्तूंचें भव्य दुकान' अगदीं यशस्वी होणार असें वाटण्याजोगी परिस्थिति खरोखरच दिसूं लागली.

ही परिस्थिति अनेक आठवडे तशीच राहिली. नंतर हळूहळू, विक्रीचें प्रमाण घसरायला सुरुवात झाली. पूर्वी येऊन गेलेलीं गिऱ्हाईकें पुन:पुन: येत नव्हतीं आणि नव्या तुरळक गिऱ्हाइकांचें प्रमाणही कमी कमी होत अखेर, गिऱ्हाईकच नाहीं, अशीच जवळ जवळ परिस्थिति निर्माण झाली.

मे महिन्याच्या अखेरीस एका रात्रीं दुकान बंद केल्यावर खूप उशिरापर्यंत फ्रॅन्क वूलवर्थ समोर हिशेबाच्या वह्या ठेवून बसला होता. वस्तुस्थिति त्याच्यासमोर ढळढळीतपणें दिसत होती. वस्तुस्थितीला तोंड दिलेंच पाहिजे असें तो मनाशीं म्हणत होता. सुरुवात कितीही आशादायक झालेली असो, अखेर हा दुकानाचा प्रयोग अयशस्वीच ठरला होता.

कां? कां? कल्पना तर अगदीं झक्क होती. याबद्दल पूर्वी वाटत नसेल इतकी खात्री आतां त्याला वाटत होती. पण, कुठें तरी, कांहीं तरी चुकलें होतें. कुठें चुकलें? काय चुकलें? याच प्रश्नांचीं उत्तरें शोधण्याचा तो आतां प्रयत्न करीत होता.

दुकानाची जागाच यशस्वितेला मारक होती हें फ्रॅन्क जाणून होता. पण खरोखर पाहातां अपयशाचें कारण मालांत असलेला विविधतेचा अभाव हेंच होतें. पांच सेंट किमतीला विकतां येतील अशा विविध प्रकारच्या वस्तु फारच कमी होत्या. आणि ज्या वस्तु दुकानांत होत्या त्यांचा दर्जाही उत्कृष्ट नव्हता. इतक्या कमी किमतींत उत्कृष्ट दर्जा कसा अपेक्षितां येणार? वूलवर्थला काय किंवा कोणा गिऱ्हाइकाला काय याची जाणीव होती कीं, पत्र्याचीं भांडीकुंडीं फारच पातळ पत्र्याचीं होतीं. टिपणवह्यांचा कागद फारच जाडाभरडा होता, खडबडीत होता.

'हलक्या गिऱ्हाइकांसाठीं हलका माल,' असा शब्दप्रयोग श्री.मूर यांनीं केला होता. फरॅन्कलाही तें कबूल होतें. पांच सेंटवाल्या दुकानामागील आमूलाग्र कल्पनाच मुळांत ती होती. पण, ती कल्पना चुकीची ठरल्यावर पुढें काय? कमी पैसे खर्चणाऱ्या गिऱ्हाइकांसाठीं **उत्तम** माल हें सूत्र ठेवावें काय? खरोखरच, पहिल्या कल्पनेपेक्षां ही कल्पना चांगली, फारच चांगली होती. पण ती व्यवहारांत आणतां येईल का? ती कशी व्यवहारांत आणतां येईल?

ती कल्पना फक्त एकाच मार्गानें अमलांत आणतां येणें शक्य होतें. फक्त पांच सेन्ट किंमत ही मर्यादा काढून टाकली तरच शक्य होतें. आणि खरेंच, तसें का करूं नये? पुन: फरॅन्कच्या हृदयांत उत्साहाचा संचार होऊं लागला. फक्त 'पांच सेंटवालें दुकान' नव्हे, तर 'पांच सेंटवाल्या नि दहा सेंटवाल्या वस्तूंचें दुकान' काढायला पाहिजे! दहा सेन्टमध्यें तो ग्राहकांना जाड पत्र्याचीं हात धुण्याचीं भांडीं आणि शेंगडयांच्या झडपा उघडण्याचे न वाकणारे चिमटे देऊं शकणार होता. फक्त पांच सेन्ट किंमतीची मर्यादा ठेवतांना वगळाव्या लागलेल्या असंख्य वस्तु होत्या. त्या वस्तु ठेवतां येतील असें दुकान म्हणजे 'पांच व दहा सेंटवाल्या वस्तूंचें दुकानच' फरॅंकला उत्तर गवसलें होतें.

त्यानें नव्या कल्पनेचा सर्व बाजूंनीं विचार केला. त्या कल्पनेंत त्याला एकही दोष आढळला नाहीं. त्याची खात्री पटली होती, मनोमन खात्री पटली होती कीं, आपल्यापुढील प्रश्नाला हेंच एकमेव उत्तर आहे. आतां नवी कल्पना व्यवहारांत कशी उतरवावयाची या प्रश्नाचाच काय तो विचार करावयाचा होता. दहा सेन्टला विकतां येतील अशा वस्तूंचा सांठा इथेंच मागवायचा कीं दुसऱ्या नव्या शहरांत पुन: नव्यानेंच सुरुवात करायची?

नव्या शहरांतच पुन: सुरुवात करणें त्याला जास्त पसंत होतें. कोणत्याही परिस्थितींत यापेक्षां जास्त मोठें दुकान काढणें आवश्यक होतें. आणि तसें दुकान उटिकांत परवडण्याजोगें नव्हतें. शिवाय उटिका या शहरानें व तेथील लोकांनीं त्याची फार निराशा केली होती. इथें त्याच्या आशा उत्तुंग वाढल्या होत्या आणि शोचनीयपणें कोसळल्या होत्या. या शहराला विसरून जाण्यांत मनावरील दडपण नष्ट होणार होतें. अधिक उत्साहानें नव्या जागीं नवा प्रयोग त्याला करतां आला असता.

विचार करतां करतां खानावळींत त्याच्याबरोबर राहाणाऱ्या एका गृहस्थाशीं झालेलें संभाषण त्याला आठवलें. तो तरुण गृहस्थ पेन्सिल्व्हानियांतल्या लॅन्कॅस्टर या शहरांतून आलेला होता. त्याच्या मतें, उटिकापेक्षां धंद्याला लॅन्कॅस्टर खूपच चांगलें होतें. तिथें कापडगिरण्या होत्याच, शिवाय लोखंड-पोलाद कारखानेही होते. तेथें मालाच्या वखारी होत्या व एक घड्याळांचा कारखानाही होता.. आणि त्या शहरांत खरेदीसाठीं येणारा शेतकरीवर्ग यॉर्क संस्थानांतील शेतकरीवर्गापेक्षां अधिक सुखवस्तु होता. शिवाय पेन्सिल्व्हानियांतील उच्चवंशीय लोक काटकसरी होते; आपल्या पैशाचा योग्य मोबदला मिळालाच पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असे. त्या लोकांच्या गळ्यांत वाटेल तसा भुक्कड माल बांधणें शक्य नव्हतें.

ही गोष्ट चांगलीच आहे, असें आतां फ्रॅन्क मनाशीं म्हणूं लागला. गिऱ्हाइकांना हलका माल विकण्याचा त्यालाही आतां पुरेपूर अनुभव आलेला होता. यापुढें तो आपल्या दुकानांत चांगल्या प्रतीच्याच वस्तु ठेवणार होता. ज्या वस्तु पांच सेन्टना विकणें किफायतशीर नसेल त्यांची किंमत दहा सेंट ठेवण्यांत येणार होती. पांच वा दहा सेन्ट, प्रत्येक दरांत फक्त उत्कृष्ट दर्जाचाच माल देण्याचा त्याचा निर्धार होता.

" हलक्या गिऱ्हाइकांसाठीं उत्कृष्ट माल !"– पण ' हलकें गिऱ्हाईक ' या शब्दावर तो अडखळला. या शब्दप्रयोगांत कांहींतरी अपमानकारक सूर आहे असें त्याला नेहमीं वाटे. कॉर्नर स्टोअरमधील त्या विक्रेत्याची तिरस्काराची नजर चुकविण्यासाठीं आपण निचार्ली त्यावेळीं कसे चुळबुळत उभे होतों याची त्याला आठवण झाली. जे लोक आपले पैसे खर्चून माल घेतात त्यांचा तिटकारा दुकानदारांनीं कां म्हणून करावा ? गिऱ्हाईक तें गिऱ्हाईकच-सारींच गिऱ्हाइकें सारखीं ! 'हलकें गिऱ्हाईक' हा प्रकारच असूं शकत नाहीं. गिऱ्हाइकांच्या जिवावरच दुकानदार स्वतःचा उदरनिर्वाह करतो ना ? मग त्यांना' हलकीं गिऱ्हाइकें' कां म्हणायचें ? यापुढें हा शब्दप्रयोग न वापरण्याचा फ्रॅन्कनें निर्धार केला.

त्या रात्रीं मनावरील दडपण खूप हलकें होऊनच फ्रॅन्क घरीं निजायला गेला. दुसऱ्या दिवशीं कारकुनाकडे दुकान सोंपवून तो लॅन्कॅस्टरकडे जाणाऱ्या गाडींत बसला. लॅन्कॅस्टरचा प्रवास सबंध दिवसाचा होता.

शनिवारीं संध्याकाळीं तो लॅन्कॅस्टरला येऊन दाखल झाला, तेव्हां धंदा-व्यवहार फारच जोरांत चालू असलेला त्याला दिसला. प्रत्येक दुकानांत गिऱ्हाइकांची भरपूर गर्दी होती. बाजूच्या पायवाटांवरून चालणारे लोक खाऊनपिऊन सुखी नि समृद्ध वाटत होते. रस्ते स्वच्छ होते, दिव्यांची सोय उत्तम होती. दुकानें नीटनेटकीं होतीं. तें दृश्य बघून फ्रॅन्क उल्हसित झाला. आपण ज्याच्या शोधांत आहों तेंच हें योग्य ठिकाण आहे अशी त्याची खात्री पटली.

रहाण्याखाण्याचा दर दिवसाला पन्नास सेंट असलेल्या एका पथिकाश्रमांत रात्रीं मुक्काम करून फ्रॅन्क दुसऱ्या दिवशीं सकाळीं दुकानासाठीं जागा शोधण्याच्या मोहिमेवर निघाला. फारसा त्रास सोसावा न लागतांच एक जागा त्याला आढळली. १७० नॉर्थ क्वीन स्ट्रीटवरची चांगली मोक्याची जागा होती ती. उटिका येथील जागेचें भाडें जितकें होतें त्यापेक्षां या जागेचें भाडें जास्त नव्हतें. भाड्याचा इसार देऊन त्यानें परत जाण्यासाठीं मिळालेली पहिलीच गाडी पकडली. शिल्लक मालाचें टिपण करण्याला जितका वेळ लागला तितका वेळच तो उटिकांत राहिला, नंतर तो वॉटर-टाऊनला रवाना झाला. फ्रॅन्कनें सांगेपर्यंत श्री. मूर किंवा जेनी यांपैकीं कोणालाच त्याच्या नव्या योजनेची कांहींच कल्पना नव्हती.

श्री. मूर यांची खात्री पटवणें बिकट ठरलें. उटिकाचें दुकान अयशस्वी ठरलें होतें. न विकल्या गेलेल्या मालाचे पैसे फ्रॅन्क अद्याप देणें लागत होता. आता दूर अन्तरावर, पेन्सिल्व्हानियांत नवीन दुकान तो काढूं इच्छित होता आणि पतीवर आणखी उधार माल मागत होता. उटिकांतील दुकानाच्या बाबतींत इतका तो तोंडघशी पडल्यानंतरही नव्या प्रयोगांत यशस्वी होऊं शकेल असें वाटण्याला सबळ कारण काय ?

फ्रॅन्कनें श्री. मूर यांच्या सर्व शंकांचीं उत्तरें सावकाशपणें दिलीं. उटिकाच्या प्रयोगांत कांहीं चुका झाल्या होत्या; पण त्या चुकांपासून आपण धडा घेतला आहे, आतां त्याच चुकांची पुनरावृत्ति करणार नाहीं असें त्यानें बजावलें. शिवाय, दहा सेंट किंमतीच्या वस्तूंची जोड दुकानाला देण्याच्या योजनेमुळें आतां अपयश येण्याचा प्रश्नच नाहीं असें त्यानें पटवून देण्याचा प्रयत्न केला.

फ्रॅन्क इतक्या खात्रीनें बोलत होता कीं अखेर आपल्या आश्रयदात्याची खात्री त्यानें पटविली. आणखी तीनशें डॉलरचा माल उधारीवर देण्याचा धोका पत्करण्यास श्री. मूर राजी झाले. पण त्यांनीं इशारा दिला, " मात्र लक्षात ठेव. ही शेवटची संधि आहे. फ्रॅन्क, तूं खूप कष्टाळू माणूस आहेस. मला आवडतोस. पुन्हां येशील तेव्हां तुला तुझ्या जुन्या जागेवर मी ठेवीन. पण तुझ्या योजनेवर पैसे गुंतविण्याचा धोका पत्करण्याची ही अखेरचीच वेळ समज. "

" मी पुन्हा: तुम्हांला असा धोका पत्करायला सांगणारच नाहीं. " फ्रॅन्क आश्वासनपूर्वक म्हणाला, " या खेपेस अपेशी ठरलों तर प्रयत्न सोडून देईन. पण, मी आतां अपेशी होणारच नाहीं मुळीं ! "

जेनीचें मन वळवण्याचा प्रयत्न करण्याची जरुरीच नव्हती. आपल्या पतीवरील तिची अविचल श्रद्धा म्हणजे फ्रॅन्कला मोठाच दिलासा होता. आणि ती गोष्ट त्याला आनंद देणारीही होती.

' तुम्ही निश्चितच यशस्वी होणार आहांत, फ्रॅन्क. " जेनी म्हणाली, " ही योजना पार पाडण्याचा तुमचा बेत अगदीं योग्यच आहे. पण, यावेळीं एक गोष्ट मात्र मी सांगणार आहें, " आपल्या सुन्दर निळ्या डोळ्यांनीं त्याच्याकडे प्रेमळ दृष्टिक्षेप टाकीत ती म्हणाली, " यावेळीं माझी इच्छा तुमच्याबरोबर यावं अशी आहे. फार दिवस एकमेकांपासून दूर काढलेत आपण ! एक सबंध वर्षाचा दीर्घकाळ मी कोंबडीवाडीवर काढला अन् नंतर गेले कांही महिने एकटीच आहे. अन् आतां हेलेना वाढलीय्. बघा ना, तुम्ही आलांत तेव्हां तिनं तुम्हांला ओळखलं सुद्धां नाहीं. कुटुंब म्हटलं कीं सर्व माणसं एकत्रच हवीत, फ्रॅन्क. मग तुम्ही आम्हांला लॅन्कॅस्टरला नेणार ना ? "

फ्रॅन्क चांचरत म्हणाला, " जेनी, तूं आलीस तिथ तर तुला फार हलाखींत रहावं लागेल अशी मला भीति वाटते. कारण अगदीं स्वस्त भाड्याच्या खोल्यांत आपल्याला रहावं लागेल. पण, खरं म्हणायचं म्हणजे मलाही एकाकीच वाटतं. तूं जर मला शक्य होईल त्या परिस्थितींत रहायला तयार असशील तर -- "

"मी कोणत्याही स्थितींत राहीन," ती आनंदानें म्हणाली, "आपण एकत्र राहूं शकलों तर मला कशाचीच पर्वा नाहीं."

"धन्य आहेस तूं!" तिचा हात आपल्या हातांत घेत फ्रॅन्क म्हणाला, "जेनी, माझ्याशीं लग्न झाल्यापासून तूं खूप सोसलं आहेस, अन् कधींही कुरकूर केली नाहीस एका शब्दानं देखील. पण, दुर्दिन संपले आहेत, लाडके! माझी खात्री आहे, अगदीं अंत:करणापासून विश्वास वाटतो मला. लॅन्कॅस्टर आपल्या जीवनाला वेगळंच वळण देणारं ठरणार आहे. अल्बॉन मामांच्या भाषेंत सांगायचं म्हणजे कुटुंबाचा पोशिंदा म्हणून मी फारसं कांहींच केलेलं नाहीं. पण, जेनी, आजवर तुला जें मिळालं नाहीं अन् मिळायला हवं होतं तें सारं सारं यापुढें देऊं शकेन मी! जेव्हां - जेव्हां ––"

"जेव्हां तुमचं स्वत:चं दुकान निघेल तेव्हां, असंच ना?" जेनी हंसत थट्टेच्या स्वरांत म्हणाली, "तुम्ही असंच नेहमीं म्हणायचे, नाहीं का? पण आतां 'जेव्हां–तेव्हां' अशी भाषा वापरण्याचं कारणच नाहीं, होय कीं नाहीं? आतां तुमच्या मालकीचं दुकान झालेलं आहेच कीं. थांबा, मी उटिकाच्या दुकानाबद्दल नाहीं म्हणत. लॅन्कॅस्टरचं नवं दुकान म्हणतेंय् मी. आपला भाग्योदय घडवून आणणारं दुकान. त्या दुकानाचं नांव काय ठेवणार, फ्रॅन्क?"

फ्रॅन्क गंभीरपणें म्हणाला, "त्या दुकानाचं नांव 'वूलवर्थचें पांच नि दहा सेंटवाल्या वस्तूंचें दुकान' असं राहील. अन् जेनी, तूं थट्टेनं म्हणत असशील; पण खरोखरच तें दुकान आपला भाग्योदय घडवून आणणार आहे यांत शंकाच नको."

✦ ✦ ✦

# “आपण आद्यप्रवर्तक आहोंत” : ८ :

पांच सेंट आणि दहा सेंट असे दोनच भाव असलेल्या वस्तूंचें जगांतील पहिलें दुकान ता. २१ जून १८७९ रोजीं उघडलें गेलें. त्यानंतर कांहीं थोड्याच आठवड्यांनीं, एका दुपारीं स्वच्छ ऊन्ह पडलेलें होतें आणि त्या दुकानाचा मालक रेल्वे स्टेशनवर आपल्या भावाला घ्यायला गेला होता.

“ असा इकडून ये, ” तो आपल्या भावाला म्हणाला, “ त्या तिथं घोडा-गाडी उभी आहे.”

चार्ली वूलवर्थनें शीळ घालीत प्रश्न केला, “ तुझी स्वत:ची घोडा-गाडी? म्हणजे, चांगलंच डोकं वर काढलेलं दिसतंय्, तूं ! ”

“ तबेल्यांतून भाड्यानं घेतलेली आहे ही घोडा-गाडी, ” आंत चढून बसत फ्रॅन्क म्हणाला, “ पण लवकरच स्वत:च्या मालकीची घोडा-गाडी घेण्याचा विचार आहे माझा. घरापासून दुकान बरंच दूर आहे अन् घोडा-गाडी असल्यावर मला दुकानांत लवकर जाणं सोयीस्कर होईल. ”

“ म्हणजे, घरही घेतलंस ? ” चार्लीनें अचंबा व्यक्त केला, “ म्हणजे तूं घर विकत घेतलंस ? ”

“ अजून नाहीं. सध्यां भाड्याचंच आहे. गेल्याच आठवड्यांत त्या घरांत रहायला गेलोंय्. तें योग्य वाटलं तर आम्ही विकत घेऊं देखील. किंवा, त्यापेक्षां मोठं घरही बघूं कदाचित्. ”

फ्रॅन्क बेफिकीरपणें बोलण्याचा प्रयत्न करीत होता, पण त्याला वाटणारा अभिमान त्याचा आवाज लपवूं शकत नव्हता. तो म्हणाला, “ चार्ली, आधीं तुला दुकान दाखवावं असं मला वाटत होतं. पण जेनी म्हणाली कीं, आधीं सरळ घरीं या, म्हणजे जेवणं उरकतां येतील. जेवण झाल्यावरच आपण दुकानांत जाऊं. ”

“ दुकान बघण्याची उत्सुकता निश्चितच मला आहे, ” चार्ली उत्तरला, “ मी तुझं पत्र श्री. मूर यांना दाखवलं. त्यांचा तर विश्वासच बसेना. पहिल्याच दिवशीं सुमारें एकशेंतीस डॉलरची विक्री ! अन् ती देखील पांच नि दहा सेंटच्या नाण्यांच्या स्वरूपांत ! फ्रॅन्क तो आकडा वाढवून तर लिहिला नव्हतास ना ? ”

" एवढासा देखील वाढवून लिहिला नव्हता. अन् त्यानंतर हें प्रमाण वाढलेलंही आहे. गेल्या शनिवारींच एका दिवसांत दोनशें डॉलरची विक्री झाली. तुझा काय होरा वहातोय् ? चार्ली, मी तुला खात्रीनं सांगतों – " फ्रॅन्क गभीरपणें म्हणाला, " या खेपेस मी अगदीं बरोबर मार्गावर आहें. दहा सेंटवाल्या वस्तु समाविष्ट केल्यामुळें ही गोष्ट घडून आलीय्. "

" तरी पण, फारच झपाट्यानं पाऊल पडलंय् ! " चार्ली उद्गारला, " म्हणजे जादूसारखंच वाटतंय् सारं ! "

" पाऊल झपाट्यानं पडतंय् खरं, चार्ली, पण तें सुखासुखी घडलेलं नाहीं. माझ्या आयुष्यांत मी इतका कधींच धडपडलों नसेन. अन् इतकी आंकडेमोडही मी कधींच केली नसेन. आतां, खर्च अगदीं आटोक्यांत ठेवलाय्. तुला माहीत आहे ?– माल बांधून देण्यासाठीं मी जुनी वर्तमान-पत्रांची रद्दी घेतों विकत. त्यामुळें एका पौंडामागें सहा सेंट बचत होते. शिवाय, विक्रेते ठेवण्याबाबतदेखील निराळीच कल्पना काढलीय् मी. "

" तूं लिहिलं होतंस कीं विक्रीच्या कामावर तूं तरुण स्त्रिया ठेवल्या आहेस. मला वाटतं, कमी पगारांत मिळत असतील त्या ? "

होकारार्थी मान हलवीत फ्रॅन्क म्हणाला, " माझ्या दुकानासारख्या दुकानाला अनुभवी पुरुष विक्रेत्यांची जरुरीच नसते. ज्यांनीं कधींच पूर्वी हें काम केलेलं नाही, पण ज्या प्रामाणिक नि चलाख आहेत अशा मुलीही इथलं काम चोख करूं शकतात अन् तेंही निम्म्या पगारांत. बरं, घरकाम करून जें मिळतं त्यापेक्षां हा निम्मा पगारही जास्त असल्यामुळें त्यांना ही नोकरी आवडते. मी नोकरीस ठेवूं शकेन त्यापेक्षां जास्त तरुणींचे अर्ज येताहेत. असो. घर आलं. ती बघ, छोटी हेलेना खिडकींतून आपल्या वाटेकडे बघतेय्. "

अत्यंत जिव्हाळ्यानें जेनीनें आपल्या दिराचें स्वागत केलें.

" भोजन मेजावर ताटं मांडलेलीं आहेत. अन् लक्षांत ठेवा–" जेनीनें बजावलें, " जेवतांना दुकान हा विषय बंद. मला वॉटरटाऊनची सारी हकिकत ऐकायचीय्. काय काय नवं–विशेष झालंय् तें ऐकायचंय्. अन् आपण स्वतःच्या हातानं कसं व्यवस्थित जेवूं शकतों हें हेलेना आपल्या काकांना दाखवूं इच्छितेय्. जेवण संपल्यावर तुम्ही दोघं अगदीं मनसोक्त दुकान-धंद्याबद्दल बोलत बसा. "

" मला वाटतं, जेवण झाल्याबरोबर चार्लीला दुकान दाखवायला न्यावं." जेवणाला सुरुवात करतां करतां फ्रॅन्क म्हणाला, " अर्थात् घरीं एकटी राहायला तूं तयार असशील तर-तुझी हरकत नसेल तर ! "

" म्हणे, तुझी हरकत नसली तर ! " त्याची नक्कल करीत जेनी म्हणाली, " चार्ली, मला बहुतेक रात्री एकटीलाच काढाव्या लागतात बरं का. त्या दुकानाचा विरह जणुं कांहीं फ्रॅन्कना सहनच होत नाहीं. हेलेना झाल्यावर हे मला नेहमीं म्हणायचे, तुला पोरीशिवाय दुसरं कांहींच सुचत नाही. तें आठवतंय् मला. आतां ह्यांच्या बाबतींत म्हणायचं म्हणजे तें दुकान ह्यांचं पोर आहे. अन् त्याच्याशिवाय इतर गोष्टींचा विचार हे क्वचित्च करतात."

पत्नीकडे हंसून बघत फ्रॅन्क म्हणाला, " तूं म्हणतेस तें अगदीं बरोबर आहे, जेनी. अन् माझं हें पोरच आपल्याला म्हातारपणीं अनाथालयांत जाण्याच्या प्रसंगांतून वांचवणार आहे. चार्ली, आणखी थोडं भाजलेलं मांस घे ना."

भोजन संपल्याबरोबर घराबाहेर पडण्यासाठीं फ्रॅन्क पुढें झाला. बाहेर घोडा-गाडी उभीच होती.

" आपण तबेल्यापर्यंत जाऊं न् तिथें गाडी सोडूं, " फ्रॅन्क म्हणाला, " तबेल्यापासून दुकान अगदीं जवळच आहे. रात्रीं येतांना चालत घरीं यावं लागलं तर तुझी हरकत नाहीं ना ? संध्याकाळपर्यंत घोडा-गाडी ठेवल्यास ते लोक पन्नास सेंट जादा भाडं घेतात."

चार्ली हंसत उतरला, " मी स्टेशनपासूनदेखील चालत आलों असतों. मला वाटतं, जरा मला भपका दाखवायसाठींच तूं घोडा-गाडी भाड्यानं घेतली होतीस. होय ना ? "

" शक्य आहे ! " फ्रॅन्क स्मितपूर्वक म्हणाला, " तुला आठवत, आई नेहमींच मला म्हणायची कीं, मला डौल मिरवायची हौस आहे. खरंच चार्ली! आज आई इथं असायला हवी होती. तिला माझं दुकान दिमाखानं दाखवतां आलं असतं तर किती छान झालं असतं ! "

" होय. तसं होतं तर छान होतं असं मलाही वाटतं, " एवढें बोलून चार्ली कांही क्षण गप्प राहिला. नंतर हंसत म्हणाला, " खरोखर कुणी बघायला हवं दुकान, सांगूं ? अल्बॉन मामांनीं ! परवांच ते वॉटरटाऊनला

अनुक्रम..पैन्पैशानें कुबेरपद दि. ७७
32848
क्रमांक ...३२८४८........ नों. दि. 8/3/52

आले होते. मी तुझं पत्र त्यांना दाखवलं. आश्चर्याच्या धक्क्यानं [illegible] बोबडी वळून गेलेला असा माणूस तूं कधींच बघितला नसशील ! ”

फ्रॅन्क गालांतल्या गालांत हंसत म्हणाला, “ कांहींही घडलं तरी त्यांना कधींच पटायचं नाहीं कीं शेतकी जीवनाला मी रामराम ठोकला हें फार चांगलं केलं बरं, ते आणखी काय म्हणाले ? ”

“ विशेष कांहीं नाहीं. हा क्षणभंगुर बुडबुडा न ठरो अशी मी आशा करतों एवढंच म्हणाले. बरं, हाच का तो तबेला ? ”

“ होय. या कोपऱ्यावरच. ”

घोडा-गाडी तबेल्यांत सोडून दोघे दुकानापर्यंतचें थोडें अंतर चालून गेले. रस्त्याच्या कोपऱ्यावरील एका उंच इमारतीच्या तळमजल्याचा अर्धा भाग फ्रॅन्कच्या दुकानानें व्यापलेला होता. क्वीन स्ट्रीटच्या बाजूला विस्तृत अशा दोन प्रदर्शनीय खिडक्या होत्या. कोपऱ्यावरील विटांच्या गोलाकार भिंतीवर चकचकीत रंगांत आणि मोठ्या अक्षरांत लिहिलेलें होतें– “ वूलवर्थ्स फाइव्ह अँड टेन सेंट स्टोअर. ” तशाच प्रकारची पाटी दर्शनी भागाला खिडक्यांच्या वरच्या बाजूला झळकत होती. ही पाटी अर्थातच उटिकाच्या दुकानावरील पाटी होती. ती बनविण्यासाठीं फ्रॅन्क वूलवर्थनें आपले कष्टाचे तीन डॉलर मोजलेले होते. ते पैसे फुकट जाऊं नयेत म्हणून तीही पाटी इथें लावण्यांत आलेली होती.

“ तूं अशा रीतीनं देखावा मांडला आहेस सारा कीं, हें कोणत्या प्रकारचं दुकान आहे तें लोकांना सहज कळावं. ” चार्लीनें अभिप्राय व्यक्त केला.

“ करायलाच हवं होतं तसं, ” खिशांत किल्ली शोधतां शोधतां फ्रॅन्क म्हणाला, “ वृत्तपत्रांत जाहिरात देणं किंवा हस्तपत्रकं काढणं मला परवडायचं नाहीं. ती चूक मी उटिकाच्या प्रयोगांत केली होती. जेव्हां तुमचा नफा पेनींच्या रूपानं मिळायचा असतो तेव्हां जाहिरातींवर डॉलर खर्चीं घालणं अशक्य असतं. म्हणून स्वतः दुकानानंच स्वतःची जाहिरात केली पाहिजे. दर्शनी भाग भडक तांबड्या रंगानं रंगवायचा माझा विचार आहे. म्हणजे दुकान अगदीं उठून दिसेल. ”

दरवाजा उघडून फ्रॅन्क आधी पुढें झाला आणि त्यानें आपल्या मेजावरील दिवा लावला.

" या दिव्याच्या प्रकाशांत तुला दिसूं शकेल असं वाटतं. उगीच जास्त दिवे लावून तेल जाळण्यांत अर्थ नाहीं. अर्थात् दुकानांत मी खूप दिवे ठेवलेत. रात्रीं दुकान उघडं ठेवतों तेव्हां तें अगदीं प्रकाशमय दिसतं हाही आणखी एक शोध लागलाय् मला. जर दुकानांतील वातावरण झगझगीत आणि आनंदी असेल तर लोकांना दुकानांत पाऊल ठेवण्याची इच्छा अधिक होते. अन् खूप प्रकाश असला म्हणजे मालही ठळकपणें दिसतो. असो. हें तें दुकान. तुला काय वाटलं बघून, चार्ली ? "

" आधीं मला नीट पाहून घेऊं दे. " या टोंकापासून त्या टोंकापर्यंत हिंडत चार्ली म्हणाला. आणि पुन: मेजापाशीं आल्यावर म्हणाला," भव्यच दिसतं. बरं, फ्रॅन्क, आतां तूं धंद्याची बातचीत करूं इच्छितोस ना ?"

" जर तुझी तयारी असेल तर—" एका खुर्चीकडे निर्देश करीत फ्रॅन्क म्हणाला, " चार्ली, कोणतीहि गोष्ट घाईगर्दीनं तुला करायला लावायची नाहीं मला. मूर नि स्मिथ यांच्या दुकानात तुला चांगली नोकरी आहे. तिथं काय मिळतं तुला सध्यां ?—आठ डॉलर आठवड्याला ? मी तितके देऊं शकेनसं वाटत नाहीं. पण जर तूं माझ्याकडे आलास तर पुढं, मूरकडे कधीं काळीं पगार जास्तींत जास्त वाढेल त्यापेक्षांही जास्त कमाई तूं माझ्याकडे करण्याची शक्यता आहे. 'मी शक्यता ' असं म्हणतोंय्. धंद्यांत खात्री कशाचीच देतां येत नसते. म्हणूनच तूं सर्व बाजूंनीं विचार करून निश्चित काय तें ठरवावंस असं मला वाटतं."

चार्ली म्हणाला, " तुझ्या पत्राप्रमाणें हॅरिसबर्गला एक दुकान काढण्याचा तुझा विचार आहे. तें दुकान मी चालवावं अशी तुझी अपेक्षा आहे. मी म्हणतों असाच विचार आहे ना तुझा ? "

" तोच विचार आहे. तिथं स्वस्तांत मला एक जागा मिळतेय्. जागा तशी चांगल्या ठिकाणीं नाही. अन् लहानही आहे. पण भाडं भलतंच कमी आहे. मीं तुला आठवड्याला सात डॉलर देत जाईन—दुकान नीट चालूं लागल्यावर आणखी. बोल, तुझं काय म्हणणं आहे यावर ?"

मुळींच कांकूं न करतां फ्रॅन्कचा धाकटा भाऊ उत्साहानें म्हणाला, " माझं कांहींच नुकसान नाहीं. तें दुकान नाहींच चाललं तर कुठल्याही दुसऱ्या दुकानांत मी नोकरी मिळवूं शकेन. जेफर्सन परगण्याबाहेर पडायची ही

माझी पहिलीच वेळ आहे. पेन्सिल्व्हानिया मला मनपसंत वाटतो. कांहीं दिवस खूप खुषींत जातील माझे."

अशा रीतीनें योजना ठरली. दोन आठवड्यानंतरच चार्लस वूलवर्थनें हॅरिसबर्गचें छोटें दुकान उघडलें. तब्बल आठ महिने त्यानें दुकान चालविण्याची खूप धडपड केली. पण अखेर थोरल्या भावानें तें दुकान बंद करायचें ठरविलें. एप्रिलमध्यें यॉर्कला आणखी एक प्रयोग झाला. पण हा तीन महिनेच चालू शकला. १८८०चा उन्हाळा लागतांच चार्ली लॅन्कॅस्टरला परत आला.

फ्रॅन्कनें मोठ्या प्रेमानें त्याचें स्वागत केलें.

दुकानांत झालेल्या दोघांच्या पहिल्याच बैठकींत फ्रॅन्क म्हणाला, "चार्ली, याबद्दल तूं स्वत:ला दोष लावून घ्यायचं कांहीं कारण नाहीं. दोष माझा होता. मी त्याबद्दल विचार करतोंय् अन् स्वत:लाच दोष देतोंय्. हॅरिसबर्ग नि यॉर्क इथं फसगत कां झाली माहीत आहे तुला? उटिकाला माझ्या अपयशाला ज्या गोष्टी कारण झाल्या त्याच याही अपयशाला कारण आहेत. वाईट रस्त्यावर छोटसं दुकान घालणं, माल खच्चून भरलेला असणं, कोणतीच सजावट नसणं, याच त्या चुका होत. असं करून चालणारच नाहीं. मला हा अनुभव उटिकाला आला होता. अन् तरीही मी पुन: त्याच चुका केल्या. एकदां नव्हे, दोनदां त्या चुका पुन: पुन: केल्या."

चार्लीचा उदास चेहरा उजळला. तो म्हणाला, "फ्रॅन्क, माझंच कांहीं तरी चुकतंय् असा मी मनाचा ग्रह करून घेतला होता. मात्र मी माझ्याकडून अगदीं कसून प्रयत्न केला."

"मी स्वत:ही यापेक्षां अधिक कांहीं चांगलं करूं शकलों नसतों." थोरला भाऊ बोलूं लागला, "उटिका येथें मी असं काय अधिक चांगलं केलं? अडचण अशी आहे, चार्ली—" फ्रॅन्क चिंतनपूर्वक म्हणाला, "हा अगदीं नवाच धंदा आहे. जुन्या काळच्या कापड-कपडे दुकानाप्रमाणें पांच नि दहा सेन्टवाल्या मालाचं दुकान चालवतां येणार नाहीं. प्रत्येक परिस्थिति निराळी आहे. पूर्वीची मळवाट कांहींच नाहीं. आपण कसे आहोंत-सांगतों. पश्चिमेकडे वास्तव्यासाठीं जात राहाणाऱ्या वसाहतवाल्यांची गोष्ट माहीत आहे तुला? त्यांना आढळून येतं कीं, यॉर्क संस्थानांत ज्या प्रकारें आपण

शेती करीत होतों त्या प्रकारें कान्सासमध्यें करतां येत नाहीं. हे वसाहतवाले स्वत:ला काय बरं म्हणवतात ?"

" आद्यप्रवर्तक. पायोनिअर्स असंच म्हणायचंय् ना तुला ?"

" अगदीं बरोबर. चार्ली, या नव्या धंद्यांतले आपण आद्यप्रवर्तक पायोनिअर्स आहोंत. अगदीं नव्या क्षेत्रांतून आपण वाट काढीत आहोंत अन् चुकीचा मार्ग कोणता नि बरोबर कोणता हें आपल्याला सांगणारा सल्लागार कुणीच नाहीं. एकदां या पद्धतीनं करून बघायचं, एकदां त्या. अचूक मार्ग सांपडेपर्यंत प्रयोग करीत राहयचं. वाट चुकलों तर पुन: मागें येऊन निराळ्या दिशेनं पुन: वाटचाल करूं लागायचं; इतकंच."

" कमाल आहे, फ्रॅन्क तुझी ? तूं अगदीं सांगोपांग विचार केलेला दिसतोय् ! हॅरिसबर्ग नि यॉर्क हीं ठिकाणं अनुकूल नव्हतीं एवढं खरं. मग, फक्त लॅन्कॅस्टरचंच दुकान धरून बसण्याचा तुझा विचार आहे कीं काय ?"

नकारार्थी मान हलवीत फ्रॅन्क म्हणाला, " मला अद्याप वाटतं कीं आपण आणखी दुकानं उघडलीं पाहिजेत. जितक्या अधिक शाखा असतील तितका अधिक माल घाऊक खरेदी करतां येईल. अन् जितक्या मोठ्या प्रमाणांत घाऊक खरेदी करूं तितका अधिक वटाव आपल्याला मिळूं शकतो. पांच नि दहा सेंटवाल्या मालाच्या दुकानाची सांखळीच आपल्याला करायचीय्, चार्ली. आपलं ध्येय हें आहे अन् आपण तें साध्य करूंच."

"तूं सारखा ' आपण ' हा शब्द वापरतो आहेस," चार्ली म्हणाला, " वस्तुत: तूं मालक आहेस, फ्रॅन्क. मी फक्त तुझा नोकर आहें पगारी. अन् तोही आतां या क्षणीं नोकरीवर नसलेला."

" छे, छे ! तसा तूं नाहींस ! " प्रेमभरानें चार्लीचे खांदे जोरानें दाबीत फ्रॅन्क म्हणाला, " तूं या धंद्यांत माझ्याबरोबर आहेस — अर्थात् तशी तुझी इच्छा असेल तर. मला माहीत आहे कीं तुझ्यापाशीं स्वत:चा पैसा नाहीं. पण तूं तुझं बुद्धीचं भांडवल देऊं शकतोस. आतां मी जें सांगतों तें हेंच आहे. मी हा सारा उन्हाळ्याचा काळ दुकानांतून सुट्टी घेऊन सर्वत्र दौरा करणार आहे. नवं दुकान काढण्यासाठीं अगदीं सुयोग्य ठिकाण सांपडेपर्यंत मी हिंडत राहाणार आहें. यापुढें अजिबात चुका करायच्या नाहींत. योग्य स्थळ सांपडलं कीं तेथल्या दुकानाची व्यवस्था तुझ्याकडे

राहील. तोंपर्यंत इथलं माझं काम तूं बघायचं. मी तुला आठवड्याला आठ डॉलर पगार देत जाईन. बरोबर आहे ना ? "

" अगदीं योग्य. " चार्ली स्मितपूर्वक म्हणाला, " फ्रॅन्क, लहानपणीं तूं ज्याच्याबद्दल बोलायचास त्याची आठवण आहे तुला ? नेपोलियन बोनापार्टच ना ? तो बडा पुरुष होतांच त्यानें आपल्या भावाची सोय करायला सुरुवात केली. तूं त्याच्याच पावलावर पाऊल ठेवून चालतोयस असंच वाटतं."

"तो अखेर तुरुंगांत मेला— " फ्रॅन्क हसत म्हणाला, " त्याच्या पावलावर पाऊल ठेवून मला तिकडे जायचं नाहीं. पण, चार्ली, त्याच्या कांहीं गोष्टी मला आवडत होत्या. अन् स्वतःच्या माणसांकडे बघणं ही त्यांतली एक गोष्ट आहे. अच्छा, मग ठरलं तर. तूं इथं कामाला सुरुवात करणार अन् मी बाहेरगांवीं दौरे काढायला मोकळा राहाणार. "

लॅन्कॅस्टरच्या दुकानाची सतत भरभराट होत होती. तें दुकान निघून वर्षाचा कालावधि लोटला होता. तें दुकान यशस्वी ठरलें आहे याबद्दल आतां प्रश्नच राहिलेला नव्हता. प्रश्न फक्त एवढाच होता कीं गिऱ्हाइकांपुढे विविध प्रकारचा माल ठेवण्यासाठीं कोणकोणत्या नव्या नव्या वस्तु समाविष्ट करायच्या ?

केवळ गृहोपयोगी वस्तूच विक्रीला ठेवण्याचें धोरण वूलवर्थनें सोडून द्यायला सुरुवात केलीच होती. भिंगऱ्या – भोंवरे आणि रबरी चेंडू या वस्तु झटपट खपतात हें बघून मुलांचीं खेळणीं विकणें किती किफायतशीर आहे हें फ्रॅन्कला कळून चुकलें. त्याचप्रमाणें नक्षीदार फण्या आणि केसांना बांधावयाच्या रंगीत फिती यांचाही खूप खूप होत असे.

सर्वांत चांगली गोष्ट म्हणजे, या नाविन्यपूर्ण वस्तूंचें गिऱ्हाईक वारंवार येणारें गिऱ्हाईक होतें. एकादी स्त्री हातोडी जन्मांतून एकदांच घेईल. पण एका आठवड्याला मुलांसाठीं तिनें तांबड्या फिती घेतल्या तरी पुनः पुढील आठवड्याला निळ्या फिती घेण्यासाठी ती परत येते दुकानांत. गोट्या, चेंडू या वस्तु हां हां म्हणतां हरवूं शकणाऱ्या वस्तु. त्यांनाही गिऱ्हाईक नेहमीच असतें. एका वर्षाअखेर हिशेब करतां या चैनीच्या वस्तूंचीच विक्री अधिक प्रमाणांत झालेली आढळून आली. अशा नव्या नव्या वस्तु बाजारांत केव्हां येतात यावर वूलवर्थची अगदीं तीक्ष्ण नजर असे.

फरॅन्क वूलवर्थच्या भावानें या नव्या धंद्याची एक नवीच बाजू त्याच्या निदर्शनास आणली. लॅन्कॅस्टरच्या दुकानांतील अनेक गिऱ्हाईकें म्हणजे छोटीं मुलें होतीं. आणि असें असण्याचें कारण ओळखणें अगदीं सोपें होतें. प्रत्येक गिऱ्हाइकाची सेवा तत्परतेनें बजावली जाई. कोणावरही माल घेण्यासाठीं दडपण आणलें जात नसे. पांच सेंटचें नाणें घेऊन आलेला एकादा लाजाळू मुलगा पांच सेंटवाल्या वस्तूंच्या मेजापाशीं हवा तितका वेळ रेंगाळूं शकत असे. सर्वच गोष्टी ठळकपणें मांडलेल्या असत. त्याला कुणाला प्रश्न विचारण्याची गरज नसे. अन् एकादी वस्तु विकत घेण्याची त्याच्या मनाची तयारी झाली आणि त्यानें ती मागितली तर कोणत्याही प्रौढ गिऱ्हाइकाप्रमाणेंच आस्थेनें त्या छोटचा पोराचीही सेवा बजावली जात असे. वूलवर्थच्या दुकानांत महत्त्वाचें गिऱ्हाईक म्हणून कोणाला ज्यास्त किंमत दिली जात नव्हती. सर्वच गिऱ्हाइकें सारखींच महत्त्वाचीं मानून सर्वांना सारखीच वागणूक दिली जात होती. लॅन्कॅस्टरच्या मुलांना याच गोष्टीचें कौतुक वाटे आणि आपली ही भावना तीं मुलें खाऊचे पैसे याच दुकानांत खर्च करून सिद्ध करीत असत.

१८८० च्या शरद् ऋतूच्या अखेरी अखेरीस फ्रॅन्क वूलवर्थ आपल्या शेवटच्या पहाणी-दौऱ्याहून परत आला. त्यानें स्क्रॅन्टनची निवड केली होती. स्क्रॅन्टन हें ईशान्य पेन्सिल्व्हानियांतील एक खाणकेन्द्र आहे.

पेन अॅव्हेन्यू भागांत त्यानें ठरविलेली दुकानाची जागा लॅन्कॅस्टरच्या दुकानाच्या जागेपेक्षां दुप्पट मोठी होती. दीर्घ मुदतीचा भाडेपट्टा लिहून दिल्यामुळें भाड्याचा दर अगदीं योग्य पातळीवरचा ठरविणें त्याला शक्य झालें.

" आपण पुढें येतांना मागचे पूल जाळून इथं आलों आहोंत, चार्ली. " त्यानें दुकान उघडण्यासाठीं ते दोघे स्क्रॅन्टनला आले तेव्हां भावाला बजावलें, " यशस्वी होवो वा अयशस्वी होवो, आपल्याला इथं दोन वर्षं तरी दुकान चालूं ठेवलंच पाहिजे. तुझी काय कल्पना आहे, चार्ली ? तूं हें दुकान भरभराटीला आणूं शकशील असं वाटतं का तुला ? "

"मला खात्री वाटते, " चार्ली विश्वासपूर्वक म्हणाला, " मला हें शहर आवडलंय्, फ्रॅन्क. आतांपर्यंत पाहिलेल्या कोणत्याही शहरापेक्षां जास्त आवडलंय्. मी इथं छान बस्तान बसवूं शकेन असं वाटतं. "

" कल्पनेपेक्षां जास्त चांगलं करूं शकशील." थोरला भाऊ उत्तरला, " अन् चार्ली, मी आजवर तुला चकित करून सोडण्यासाठीं जें गुपित ठेवलं होतं तें आतां सांगून टाकतों. तूं अर्धा मालक आहेस, चार्ली. या दुकानांतील अर्धी भागीदारी मी तुला देत आहें. हं हं ! कांहीं बोलूं नकोस. तूं कष्टांनीं मिळविलेली आहेस ही भागीदारी. हॅरिसबर्गला नि यॉर्कला तूं डोकं पिकेल इतका धडपडला आहेस. अन् तुला मी खड्डयांत लोटलं असा दोष तूं मला कधीं दिला नाहींस. इथं अर्थात् निराळी परिस्थिति आहे. पहिल्या दोन ठिकाणीं जी अनुकूलता तुला नव्हती ती सारी इथं तुला आहे. तूं दुकान भरभराटीला आणूं शकशील अशी तुला खात्री वाटते. मग ठीक आहे. भागीदार या नात्यानं कामाला लाग ! "

✦ ✦ ✦

# जुन्या ऋणाची परतफेड : ९ :

१८८५ सालीं, लॅन्कॅस्टरला आल्यानंतर सहा वर्षांनीं फ्रॅन्क सहकुटुंब घरच्या शेतवाडीवर कांही दिवस मजेत घालविण्यासाठीं आला. सहा वर्षांच्या अवधींत अशी घराला भेट देण्याची कांहीं ही पहिलीच वेळ नव्हती. पण या आधींच्या भेटी अल्पकाळच्या असत अन् तशा भेटी कांहीं वारंवार झालेल्या नव्हत्या. फ्रॅन्क वूलवर्थ आपल्या धंद्यांत इतका गढलेला होता कीं वारंवार अशी सुटी घेण्याची सवडच त्याला होत नसे. त्याच्या बाबांनीं, जॉन वूलवर्थनीं अद्याप आपली धाकटी नात बघितलेली नव्हती. हेलेनानंतर एदना ही फ्रॅन्क-जेनोला दुसरी मुलगी झालेली होती.

बाबा आपल्या घसरगाडीवर बसून स्टेशनांत गाडी केव्हां येते याची वाट बघत होते. मंडळी गाडींतून फलाटावर उतरलेली बघितल्यावर त्यांची तब्येत फारच खुष झाली. आणि तसें होणें स्वाभाविकच होतें.

जेनीचा वेष चांगलाच झकपक दिसत होता. हिरव्या दोरव्याचा झगा तिनें कमरेजवळ फुगीर असलेल्या घागऱ्यावरून परिधान केलेला होता. झग्याच्या पुढल्या भागाला फिक्या पिवळचा रंगाच्या नागमोडी फिती लावलेल्या होत्या. इटालियन पद्धतीची छोटीशी गवती टोपी तिच्या कुरळ्या केसांवर शोभत होती. टोपीच्या मागच्या बाजूला कलाबतूच्या फिती वाऱ्यानें फडफडत होत्या. हातांत तिनें सुबक नि नाजुक विणीचे पांढरे हातमोजे घातलेले होते आणि हातांत झालरीची उन्हाळी छत्री होती. दोन्ही मुलींचा पोषाख एकसारखा होता. जरीकांठी पांढऱ्या कापडाच्या झग्यांवर कमरेभोंवतीं रुंद मखमलीचा पट्टा होता. आणि त्यांच्या मस्तकांवर फुलांची नक्षी असलेलीं छोटीं छोटीं शिरस्त्राणें होतीं.

स्वत: फ्रॅन्क वूलवर्थचा पोषाख शानदार पोषाख करणाऱ्या व्यापाऱ्याला शोभेसा होता. त्यानें उत्कृष्ट प्रतीच्या काळ्या कापडाचा लांब प्रिन्स अल्बर्ट पद्धतीचा डगला घातलेला होता. छातीवर घट्ट बसणाऱ्या सदऱ्याचा पुढचा भाग झाकून जाईल इतका रुंद मखमलीचा गळपट्टा त्यानें घातलेला होता. त्याची कडक कॉलर थेट कानापर्यंत आलेली होती. त्यानें भरघोस मिशा वाढविलेल्या होत्या आणि टोकांशीं मिशांना पीळ दिलेला होता. डोक्यावर उंच दिवालाची टोपी होती.

या मंडळींनीं स्टेशनवर भटक्या मारणाऱ्या लोकांचें लक्ष चांगलेंच वेधून घेतले. आपलें आगमन लोकांच्या कुतुहलाचा, चर्चेचा विषय व्हावा यावर फ्रॅन्क वूलवर्थ बेहद्द खुष होता यांत संशयच नाहीं. या शहरांत एके काळीं एक अत्यंत गरीब तरुण म्हणूनच तो सर्वांना माहीत होता. हा वूलवर्थ कुटुंबांतला पोरगा इतका पुढें येईल अशी कल्पना सुद्धां वॉटरटाऊनच्या कोणा नागरिकानें कधीं केली नसेल. त्यांची कल्पना कशी फोल ठरली हें त्यांच्या निदर्शनाला आणून देण्यांत एक प्रकारचें समाधानच होतें.

आपल्या मुलाच्या मनांतील आंदोलनाची कल्पना त्याच्या बाबांना आली. त्यांनी मंडळी गाडींत चढत असतांना फ्रॅन्कला विचारलें, "इथं गांवांत तुला कुठं जाऊन यायचंय् का? मूरच्या किंवा बुशनेलच्या दुकानांतील लोकांना भेटून यायचं तुझ्या मनांत असावं असं वाटलं—"

" हो. पण आज नाहीं. " फ्रॅन्क उत्तरला, " मी उद्यां येईन अन् ज्यांना भेटायचं त्यांना भेटेन. जरा चौकांतून चक्कर मारायचा विचार आहेच माझा. हें आपलं जुनं शहर कसं दिसतं हें जरा बघायचंय् मला–"

" अन् आपण कसे दिसतों हें या शहराला दाखवायचीही इच्छा आहे, होय ना ?" हंसत बाबा म्हणाले, " ठीक आहे, तुझ्या मनाप्रमाणें होऊन जाऊं दे. नंतर भरपूर वेळ मिळेलच तुला. उद्या मात्र शक्य होणार नाहीं. तुझ्या अल्बॉन मामांनीं आपल्या सर्वांना त्यांच्याकडे बोलावलंय्. सर्व नातलगांना बोलावलंय्. "

" होय ? असं ?" स्मितपूर्वक फ्रॅन्क म्हणाला, " मला दुकान काढायला थोडे पैसे उसने मागायचे होते तेव्हां मात्र त्यांना मला भेटण्याइतकी फुरसत नव्हती !"

" हें बरं नाहीं, फ्रॅन्क !" त्याचे वडील त्याला दाबीत म्हणाले, " त्याच्याबद्दल मनांत अशी अढी धरण्याचं कारण नाहीं. आजकाल त्यांना तुझा केवढा अभिमान वाटतोय्. अन् माझी अशी कल्पना झालीय् कीं त्यांचा मुलगा एडविन याला तुझ्या धंद्यांत घालायचाही विचार त्यांच्या मनांत घोळत असतो. याबद्दल तुझं काय म्हणणं आहे ?"

" तसं झालं तर, म्हणजे एड कांहीं भांडवल घालणार असला धंद्यांत तर चांगलंच होईल. तुम्हांला माहीतच आहे कीं आँन्ट ॲनी नॉक्सचा सेमूर ट्रेन्टनच्या दुकानांत केव्हांपासूनच काम करतोय्. सारींच दुकानं कांहीं मी एकटा चालवूं शकणार नाहीं. मला व्यवस्थापक हवेच आहेत. अन् जेव्हां एकादा व्यवस्थापक स्वत:चं भांडवल धंद्यांत घालतो तेव्हां तो अधिक कसून मेहनतीनं धंदा चालवतो. सेमूरप्रमाणं एडनं केलं तर कांहींच हरकत नाहीं. मी याबद्दल अल्बॉन मामाशीं बोलेन. "

" बोलच तूं. बरं, सध्या तुझीं किती दुकानं आहेत?"

" चार." फ्रॅन्क उत्तरला, " अर्थात् स्क्रॅन्टनचं सोडून चार. स्क्रॅन्टनच्या दुकानांतली अर्धी भागीदारी चार्लीनं विकत घेतलीय्. त्यानं तुम्हांला तें कळवलेलं आहेच. पहिल्याच वर्षात त्यानं इतकी चांगली कमाई केली कीं त्याला सहज भागीदारी विकत घेतां आली. अन् त्याला तें शहर आवडलंय्.

म्हणतो कीं, तें शहर सोडून दुसरीकडे कधींच जाणार नाहीं. तिथेंच स्थायिक होईन."

" हो, चार्ली फारच खुष आहे स्क्रॅन्टनवर. त्यानं मला तुमच्या सावत्र आईसह बोलावलंय् तिथं. पण, केव्हां शक्य होईल तें मी सांगूं शकत नाहीं. शेताचंकाम सोडून जाण्याइतकी मोकळीकच नाहीं मला. बरं, लॅन्कॅस्टर-खेरीज आणखी कुठें आहेत तुझीं दुकान ?"

" पेन्सिल्व्हानियांतच रीडिंग येथें एक अन् हॅरिसबर्गला असलेलं मोठं दुकान दुसरं. अन् न्यू जर्सीमध्यें ट्रेन्टनला आणखी एक. पण, बाबा, ही नुसती सुरुवातच आहे असं समजा. पुढील वर्षी–"

फ्रॅन्क एकदम थांबला. कारण मागें बसलेल्या जेनीनें त्याला छत्रीच्या टोंकानें टोंकलें होतें.

तिनें बजावलें, " हें बघा ! सारखं दुकानांबद्दलच बोलत रहायला नकोय्. आपण रजेवर आलोंत मजा करायसाठीं, हें लक्षांत ठेवा. पोरींनों, आलं बरं का ग्रेट बेंड. ती बघा शाळा. तिथें तुमचे वडील शिकायला जात असत, बरं का. अन् तें मेथॉडिस्ट चर्च. तिथं साधिक प्रार्थनागीतांत तुमचे वडील भाग घेत. फ्रॅन्क, या पोरींना सांगा ना तुम्ही कसे गायचे तें. "

दोन्ही पोरी खुदूखुदू हंसल्या, कारण फ्रॅन्कला संगीताची आवड असली तरी त्याला साधाही सूर लावतां येत नसे हें सर्वांनाच माहीत होतें. फ्रॅन्कही तें जाणून होता. ईस्टरच्या वेळीं प्रार्थनागीताचें सांघिक गायन चालूं असतांना बेसूर लावून आपण त्या गीतगायनाचा कसा गोंधळ उडविला ही हकिकत फ्रॅन्क मोठ्या गमतीनें सांगूं लागला.

अल्बॉन मामांच्या घरचें कौटुंबिक संमेलन दोन दिवस चाललें. अगदीं दूरवरचे नातलग आले होते. वॉटरटाऊनमध्यें एकट्यानेंच यायला फ्रॅन्कला आठवडा अखेरपर्यंत कांहीं वेळ मिळूं शकला नाहीं.

वॉटरटाऊनच्या चावडीच्या कुंपणाच्या खांबाला फ्रॅन्क आपला घोडा बांधून ठेवीत असतांनाच एक परिचित आवाज त्याच्या कानांवर आला. चावडीच्या आवारातील झाडाच्या सावलीत असलेल्या बांकावर श्रीमती कून्स बसली होती. कॉर्नर स्टोअरमध्यें कामाला लागल्यावर फ्रॅन्कची पहि-लीच मैत्रीण बनलेली श्रीमती कून्स. तो धांवतच तिच्यापाशीं गेला.

ती म्हणाली, " आत्तांच जेवण संपवलं. बस ना. थोडी वातचीत करूं. नंतर माझ्याबरोबर स्टोअरमध्यें येणार आहेस ना ? श्री. मूर यांना तुला भेटायचं असेलच ना ?"

" अर्थातच." तो उत्तरला, " कसे काय आहेत श्री. मूर ? बाबा सांगत होते कीं अलिकडे त्यांची तब्येत बरी दिसत नाहीं."

" त्यांची शारीरिक तब्येत तशी बरी आहे; पण मन मात्र फारच काळजींत आहे. दुकानाची सारखी घसरगुंडीच चालू आहे, फ्रॅन्क! श्री. स्मिथ यांनी आपली भागीदारी काढून घेतली न् ते पश्चिम भागाकडे निघून गेले हें तुला कळलंच असेल. अशा प्रकारच्या दुकानाच्या दृष्टीनं वॉटर-टाऊन आतां निरुपयोगी झालंय् असं त्यांच मत होतं. पण, श्री. मूर दिवस रेटण्यासाठीं धडपडत आहेत. सांगतांना वाईट वाटतं, फ्रॅन्क, पण कॉर्नर स्टोअर अगदीं दिवाळखोरीच्या कांठावर आलंय्. साऱ्या गांवाला हें कळून चुकलय्."

" मलाही सगळी कल्पना आतां आलीय्," फ्रॅन्क म्हणाला, " श्री. मूर यांना प्रतिकूल दिवस आलेत हें मी ऐकलं होतं. पण, परिस्थिति इतकी वाईट असेल अशी मात्र कल्पना नव्हती. कांहीं मदत करतां आली तर मला आनंद होईल. माझ्यापाशीं थोडीशी रोकड देण्यापुरती असती तर पण तसा जादा पैसा नाहीं माझ्यापाशीं. मी आणखी कांहीं नवीं दुकानं सुरू करायचा विचार करतोंय्. अन् माल मागवण्यासाठी असेल नसेल तेवढी रोकड खर्चीं पडणार आहे. तरी पण – " तो एकदम थावला. विचारमग्न बनला. आणि मग त्यानें फक्त सुस्कारा सोडला.

श्रीमती कून्सनीं हळुवारपणें त्याच्या खांद्यावर हात ठेवीत म्हटलें, " त्याबद्दल फार वाईट वाटून घेऊ नकोस, फ्रॅन्क. तुला शक्य झालं तर तूं खात्रीनंच मदत करशील. आम्हां सर्वांना हें माहीत आहे. बरं, आतां तुझ्या कुटुंबाची कांहीं वार्ता सांग. तुम्ही लोक आलांत त्या दिवशीं जेनोला न् मुलींना मी ओझरतंच बघितलं. त्यांना माझ्याकडे कधीं घेऊन येणार आहेस."

चावडीच्या घड्याळांत एकचा टोला पडलेला ऐकूं येईपर्यंत त्यांचें संभाषण चालू होतें. परत कामावर जाण्यासाठी श्रीमती कून्स उठली. तिच्याबरोबर चालत फ्रॅन्कनें चौक ओलांडला.

श्री. मूर दुकानाच्या पिछाडीला असलेल्या आपल्या जुन्या कचेरींतच बसलेले होते. तो व्यापारी अगदीं थकला भागलेला दिसत होता. आतां आयुष्याची केवळ माध्यान्हच चालू होती त्यांची, पण त्यांचे खांदे अगदीं वयोवृद्ध माणसासारखे गळलेले दिसत होते. तथापि आपल्या भेटीला आलेल्या व्यक्तीला बघतांच त्यांची मुद्रा उजळली.

" बस, बस. फ्रॅन्क. तू केव्हां भेटायला येणार आहेस कोण जाणें असं मी मनाशीं म्हणतच होतों. चांगलाच मातबर दिसूं लागलेला आहेस-"

"प्रदर्शनीय खिडक्या सजविण्याचा प्रकार आहे हा, श्री. मूर !" फ्रॅन्क हंसत म्हणाला, " तुम्हांला माहीतच आहे कीं त्या कामांत मी नेहमींच फार तरबेज होतों. अन् तुम्हींच मला सल्ला दिला होता की, आवश्यकतेपेक्षां जास्त भपक्यांत राहिलं कीं उधारीवर माल मिळवणं सुलभ होत. मी जेव्हां माल उत्पादकांना भेटायला जातो तेव्हां तुमचा हा सल्ला नेहमीं ध्यानांत ठेवतों. मी तुमच्यापासून खूप शिकलोंय, श्री. मूर. !"

"असं म्हणावंस हा तुझा चांगुलपणा आहे, फ्रॅन्क." श्री. मूर यांनीं थकलेल्या आवाजांत म्हटलें, "मला जें ज्ञान आहे तें आतां जुनं पुराणं ठरलेलं दिसतंय. निदान, मला तरी आजकाल त्याचा फारसा उपयोग होत नाहीं."

फ्रॅन्कचे ओठ चाळवूं लागले. श्री. मूर हे अत्यंत स्वाभिमानी गृहस्थ होते. आपल्या पूर्वीच्या नोकरासमोर आपलें अपयश सांगतांना त्यांच्या मनाला अत्यत वेदना झाल्या असत्या. त्यांच्या तोंडून अधिक विषादाचे शब्द बाहेर पडण्यापूर्वीच फ्रॅन्क घाईनें बोलूं लागला.

तो म्हणाला, "श्री. मूर, मी एक सुचवूं इच्छितो. तुम्हांला सूचना नाहीं पटली माझी तर फेटाळून लावा, पण मला वाटतं निदान तुम्हीं माझ्या सूचनेचा विचार तरी करावा—"

फ्रॅन्क पुढें म्हणाला, "पांच व दहा सेंटवाल्या वस्तूंच्या दुकानांत कॉर्नर स्टोअरचं रूपांतर तुम्ही करायला काय हरकत आहे ?......थांबा, ऐकून घ्या. उत्कृष्ट दर्जाच्या किंमती मालाचंच दुकान चालवण्यांत तुम्हांला नेहमीं अभिमान वाटे हें मला माहीत आहे. पण तुम्हीं जर मनांतच आणलं तर कमी किंमतीचा पण उत्कृष्ट दर्जाचा माल विकणं शक्य असतं. मी तेंच

करतों. तुमच्या दुकानांतील किमती मखमल जशी तिच्या भावाच्या मानानं उत्कृष्ट दर्जाची त्याचप्रमाणें माझ्या दुकानांतील दहा सेंट किमतीचा अंडीं ढवळायचा कांटाही किमतीच्या मानानं उत्कृष्ट प्रतीचाच असतो. मी सांगतों तें पटतं का ?"

"होय. अंडीं ढवळायचा कांटा उत्तम असला तर दहा सेंटला चांगलाच कीं पण, मी आजवर लोखंडी-पोलादी माल कधींच विकला नाहीं. त्या धंद्याचा अनुभव – "

"तें मला माहीत आहे. फक्त उदाहरणादाखल म्हणालों मी. मला एवढंच सांगायचं कीं किमतीच्या त्या त्या पातळीवर जर माल त्या मानानं उत्कृष्ट दर्जाचा असेल तर त्याला दर्जेदार उत्कृष्ट मालच म्हटलं पाहिजे. तुम्ही दर्जेदार उत्कृष्ट माल भारी किमतीचाच विकीत आलांत आजवर. कारण तसा माल तयार करायला खर्च जास्त लागतो. पण कमी खर्चांतच तयार होणारा उत्कृष्ट दर्जेदार माल विकणं म्हणजे कांहीं कमीपणा नाहीं. समजा, कमी खर्चांत तयार होणारा म्हणूनच कमी किंमत असलेला असा माल तुम्ही विकूं लागलांत तर, आपण आतांही उत्कृष्ट दर्जेदार मालच विकीत आहोंत असंच तुम्हांला मानतां येईल. फक्त क्षेत्र नवं, पण खालच्या पायरीवरचा धंदा नव्हे तो."

श्री. मूर अचंब्यानें बघत उद्गारले, "अरे फ्रॅन्क, मी या दृष्टीनं कधीं विचारच केला नव्हता, बघ. तुझं म्हणणं अगदीं बरोबर आहे. बरं मग, तुझा विचार काय आहे ? कॉर्नर स्टोअर विकत घेऊन त्याचं पांच-दहा सेंटवाल्या दुकानांत रूपांतर करायचा विचार आहे ? "

"छे मी नव्हे. तुम्ही करणार आहांत, श्री. मूर. मला कांहीं नको. नफ्यांतला वाटाही नको. नवं दुकान 'मूर यांचं पांच व दहा सेंटवाल्या वस्तूंचं दुकान' असेल, 'वूलवर्थचं' नव्हे. आजची परिस्थिति बघतां वॉटरटाऊन हें योग्य गांव आहे. तुमची स्वत:ची इमारत आहे अन् लौकिकही आहे तुमचा इथें. सध्यांचा माल निकालांत काढून पांच नि दहा सेंटवाला विकतां येईल असा माल दुकानांत तें भरून सुरूं करणं तुम्हांला अवघड जाणार नाहीं.

तो पोक्त व्यापारी कांहीं बोलणार तोंच फ्रॅन्कनें घाईनें म्हटलें, "माल कुठून आणायचा, असं तुम्ही विचारणार असाल ? त्याचं उत्तर हें कीं, तुम्हांला हवा असलेला सर्व माल मी पुरवायचा नि पैसे तुम्ही सवड होईल तेव्हां द्यायचे."

उत्तराच्या अपेक्षेनें फ्रॅन्क गप्प बसून राहिला. पण उत्तर लवकर मिळालें नाही. मग मात्र किंचित् तोंड वांकडें करीत फ्रॅन्क म्हणाला, "कदाचित् ही कल्पना तुम्हाला आवडली नसावी. माझ्यापाशीं जादा भांडवल असतं तर मी वेगळी योजना सुचविली असती. पण मालाच्या मागण्या मी करून बसलोंय् नि पैसा सारा अडकून राहिलाय्. म्हणूनच ......"

"माझ्या लक्षांत आलीय् तुझी अडचण--" श्री. मूर सावकाश बोलूं लागले, "मला नवा धंदा सुरू करतां यावा म्हणून तूं पतीवर माल देण्याचा धोका पत्करूं इच्छितोस. तुझ्या सूचनेचं सार हेंच आहे कीं नाहीं ?"

फ्रॅन्क होकारार्थी मान हालवीत म्हणाला, "श्री. मूर, तुम्ही एके काळीं माझ्यासाठीं जें केलंत तें आतां तुमच्यासाठीं मला करूं द्याल अशी मी आशा करतों. तुम्ही त्या वेळीं माझ्यावर विश्वास टाकला नसतात तर मला कांहींच करतां आलं नसतं. आतां माझी पाळी आहे. माझी सूचना एकदम अनपेक्षितपणें केली गेली आहे हें खरं. पण निदान तिच्यावर थोडा तरी विचार केल्याशिवाय ती धुडकावूं नका."

श्री. मूर यांनीं सर्व दुकानभर एकदां डोळे फिरविले. दुकानाच्या दालनांत जवळजवळ शुकशुकाट होता. काम नसलेले विक्रेते विक्री मेजां-मागें उभे राहून जांभया देत होते. धंदा बसला होता आणि आणखी आणखी बसत चाललेला होता. श्री. मूर यांचा माजी नोकर असलेल्या फ्रॅन्कनें लक्षांत आलेली ही वस्तुस्थिति तोंडानें बोलून न दाखविण्याचा चांगुलपणा दाखवलेला असला तरी त्याचे डोळे सारें कांहीं प्रत्यक्ष बघत होते. कॉर्नर स्टॅाअर जुन्या पद्धतीने फार दिवस चालणार नाहीं हें त्याच्या लक्षांत आलेलेंच असणार. म्हणूनच तो नवी योजना सुचवीत होता. अन् ती सूचना सुद्धां किती सहानुभूतीनें, योग्य आदर राखून अन् जपून कौशल्यानें त्यानें केली होती !

परतण्यासाठीं उभा राहात फ्रॅन्क म्हणाला, " आणखी कांहीं दिवस घरच्या वाडीवर माझा मुक्काम आहे. तुमचं काहीं ठरल्यास मला कळवा–"

त्याच्या बरोबरच श्री. मूरही उठले. त्यांचे गळलेले खांदे जरा ताठरले. त्यांच्या मुद्रेवर अपरिचित स्मिताची रेषा झळकली. त्या स्मितानें, मुद्रेवरील थकल्याभागल्याच्या खुणा असलेल्या सुरकुत्या लोपल्या.

श्री. मूर म्हणाले, " मी माझा विचार इथल्या इथेंच ठरवावा असं मला वाटतं, फ्रॅन्क. तूं मला कुठें नेऊं इच्छितोस हें मला माहीत नाहीं. पण तूंच म्हणालास कीं मी तुला धद्याबद्दलचं ज्ञान दिलं. आतां मला वाटतं, या नव्या धंद्याचं शिक्षण तूंच मला द्याव लागणार आहे. ती माहिती तूं मला दिलीस, मी तुझ्या सल्ल्यावर विसंबू शकलों तर –– " प्रदीर्घ श्वास घेऊन ते म्हणाले, " तर तुझी सूचना मी मान्य करीन. अन् त्याबद्दल तुझे आभार –– "

" अं हं ! आभार मानायची जरूरी नाहीं. " फ्रॅन्क त्यांना अडवीत म्हणाला, " तुम्ही माझ्यासाठीं जितकं केलंत तितकं कांहीं मी तुमच्यासाठीं करीत नाहीं. माझ्या पांच नि दहा सेंटवाल्या दुकानाच्या कल्पनेला सक्रिय पाठिंबा तुम्ही दिलात तेव्हां त्या दुकानाला यश येईल कीं नाही हें तुम्हांला कांहींच माहीत नव्हतं. मला मात्र निश्चित माहीत आहे. तुमच्यापेक्षां मी कमीच धोका पत्करीत आहें. श्री. मूर, तुम्हांला कधींच पस्तावा वाटणार नाहीं. खास – "

आणि श्री. विल्यम मूर यांना पस्तावा वाटण्याचें कारण कधींच पडलें नाहीं. नव्या स्वरूपांतील कॉर्नर स्टोअर प्रारंभापासूनच यशाच्या मार्गावर वाटचाल करूं लागलें होतें. नंतर अनेक वर्षांनी वूलवर्थच्या असंख्य दुकानाच्या सांखळींत ते समाविष्ट होईपर्यंत तें दुकान श्री. मूर यांच्या एकट्याच्याच मालकीचें राहिलें होतें. आणि दुकान सांखळींत समाविष्ट करण्याच्या व्यवहारात वूलवर्थचे पेढीचे जे शेअर्स श्री. मूर यांना मिळाले त्यामुळें एक श्रीमंत माणूस असें स्थान श्री. मूर याना प्राप्त झालें. आपलें उर्वरित आयुष्य सुखवस्तुपणांत आणि वॉटरटाऊनच्या नागरिकांच्या आदराला पात्र राहून ते व्यतीत करूं शकले. ' दर्जेदार उत्कृष्ट माल ' विकण्याच्या त्यांच्या लौकिकाला कधीच बाध आला नाही.

✦ ✦ ✦

# शंभर ठिकाणीं शंभर दुकानें : १० :

फ्रॅन्क वूलवर्थमुळें ज्यांचें भाग्य उजळलें, अशा त्याच्या पहिल्या वहिल्या सहकाऱ्यांपैकीं श्री. मूर हे एक होते. आपल्या दुकानांची साखळी जसजशी वाढत चालली तसतशी फॅन्क व्यवस्थापक म्हणून कोणा कोणा जुन्या मित्रांवर विश्वास टाकतां येईल यासाठीं नजर फिरवूं लागला. त्याच्या विश्वासाला पात्र ठरले त्यांना त्याचें पारितोषिक नंतरच्या काळांत त्याच्या पेढीच्या शेअर्सच्या रूपानें मिळालें. अशा मित्रांपैकीं कांही थोडे मध्येंच गळाले वा वगळले गेले. पण जे टिकून राहिले त्यांना मात्र कधीं स्वप्नांतहि त्यांनी कल्पना केली नसेल अशा समृद्धीचा लाभ झाला.

या भाग्यवंतांत फ्रॅन्कचा भाऊ चार्ली होता. आतेभाऊ सेमूर नॉक्स होता. अल्बॉन मामांचा मुलगा एडविन हा होता. फ्रॅन्क बुशनेलच्या दुकानांत असतांना पहारेकरी असलेला व त्याचा मित्र बनलेला हॅरी मुडी आणि कॉर्नर स्टोअरमधील त्याची मैत्रीण श्रीमती कून्स यांना फ्रॅन्कच्या विशाल संघटनेंत योग्य स्थानें प्राप्त झालीं. फरॅन्कनें बुशनेलकडची नोकरी सोडल्यावर त्याच्या जागीं आलेला कार्सन सी. पेक हाही असाच एक होय. आणि तो फरॅन्कच्या विश्वासाला इतका पात्र ठरला कीं, धंदा जसजसा विस्तारत गेला तसतसा आपला उजवा हात म्हणून फरॅन्कला पेक फार मोलाचा वाटूं लागला.

फरॅन्कचा पहिला प्रयोग ज्या उटिका शहरांत अपेशी ठरला तेथेंच उघडलेलें नवें दुकान पेकनें यशस्वी करून दाखविल्यामुळें त्याच्यावर फरॅन्कची फारच मर्जी बसली. न्यूयॉर्क येथें खरेदी-पेढी उघडण्याची आवश्यकता वाटूं लागली. तेव्हां फरॅन्कनें आपला दुय्यम म्हणून पेकलाच न्यूयॉर्कला नेलें. आपल्या दुकानांतील मालामध्यें 'चिक्की' ठेवावी ही सूचना पेक याची होती आणि ती सूचना अत्यंत किफायतशीर ठरली. म्हणून, फरॅन्कला जेव्हां काही एक नवी कल्पना सुचली तेव्हां त्यानें प्रथम पेकलाच विश्वासांत घ्यावें हें स्वाभाविकच होतें.

"मी युरोपांत जाणार आहें." फ्रॅन्क एका सकाळीं पेकला म्हणाला, "एक दोन महिने तूं सारा कारभार पाहूं शकशील ना?"

पेकनें आत्मविश्वासपूर्वक जोरानें होकरार्थी मान हालविली नि म्हटलें, "खरेदीचा दौरा, होय ना ? परदेशी उत्पादकांशीं प्रत्यक्ष व्यवहार करायला हवा असं तुम्हीं बरेच दिवस म्हणतां आहांत. मला ही कल्पना उत्तमच वाटते. परदेशांतला कोणता माल घेणार ?"

"खेळणीं घ्यायचीं हें ठरलेलंच आहे. सर्व उत्कृष्ट खेळणीं जर्मनींत तयार होतात. अन् खेळणीं आयात करणारे व्यापारी आपला नफा धरून भाव घेतात. त्यामुळें ते भाव आपल्याला परवडेनासे होतात. जर मला कांहीं उत्तम बाहुल्या प्रत्यक्ष उत्पादकांकडून मिळवतां आल्या तर छान होईल ! अन् खेळांतले छोटे टी सेट सुद्धां !"

पेक हंसत म्हणाला, "तुम्हांला तीन मुलीच आहेत, पण इतर लोकांना मुलगेही असतात हें विसरूं नका !"

"काळजी करू नकोस. मुलांचीं खेळणींही बघेनच मी. अन् सर्वच मुलांमुलींसाठीं ख्रिस्मस-वृक्ष सजविण्यासाठीं लागणाऱ्या वस्तूहि बघणारच आहें. शिवाय, मुलांच्या आयांसाठीं कांचसामान अन् प्रौढ नि म्हाताऱ्या पुरुषांसाठीं पाटलोणीचे पट्टे–पण आणखी काय तें आतांच सांगतां येत नाहीं. प्रत्यक्षच बघून आणखी काय मिळेल न् मी काय घेऊं शकेन तें ठरवतां येईल. अन् सौदे कसे काय जमतील हेंही सांगतां येत नाहीं. त्यांच्या भाषा मला येत नाहींत––"

"छानपणें जमवाल सौदे." पेक म्हणाला, "तुम्ही खरेदीसाठीं जात आहांत. पैसा ही चीजच अशी आहे कीं ती वाटेल ती भाषा बोलूं शकते."

१८९० सालचे चार महिने फ्रॅन्क वूलवर्थनें इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी नि ऑस्ट्रिया या देशाच्या दौऱ्यांत घालविले. हा दौरा केवळ धंद्यापुरताच झाला नाहीं. कांहीं प्रेक्षणीय स्थळेंही बघण्यापुरता अवसर त्यानें काढला. विशेषत: बालपणापासूनचा त्याचा आदर्श असलेल्या नेपोलियन बोनापार्ट याच्या नांवाशीं निगडित असलेलीं स्थळें त्यानें मुद्दाम जाऊन पाहिलीं. या मजेंत घालविलेल्या कांहीं दिवसांत आपल्याबरोबर जेनी नि मुली नसाव्यात मजा करायला याचा त्याला फार खेद वाटला. त्यानंतरच्या काळांत अनेकदां सहकुटुंब युरोपचा प्रवास करून त्यानें त्याचें उट्टें काढलें.

पण, पहिल्या दौऱ्यांत तसे मजेंत घालवायला त्याला फारच थोडे दिवस मिळाले. एकामागून एक अनेक उत्पादन-केंद्रांना भेटी देत तो हिंडत होता. खिशांत रोकड असल्यामुळें उत्तम सौदे पटविण्यांत त्याला कांहींच अडचण पडली नाहीं. त्यानें खूप पैसा ओतून दीर्घ मुदतीचे खरेदीचे करार परकी उत्पादकांशीं केले.

फ्रॅन्क घरीं परतला तो मुलींसाठीं भरपूर खेळणीं घेऊन. त्यानें जेनीसाठीं पॅरीसहून भपकेदार पोषाख आणला होता. डोक्यांत अनेक नव्या खळबळ-जनक कल्पना घेऊन आणि नव्या अपूर्व मालाच्या मागण्या नोंदविण्यांत सारा पैसा गुंतवून तो परतला होता.

आल्यावर पेकशीं बोलतांना फ्रॅन्क म्हणाला, " अडचण अशी आहे कीं जितका माल येणार आहे तितका ठेवायला पुरेशी जागाच नाहीं. पण मी तें पाहून घेईन. मोठी गमत आहे, नाहीं ? एके काळीं माझं स्वतःचं एकच दुकान वाढण्यावर मी संतुष्ट होतों. आज, वीस दुकानं झालींत पण तेवढ्या-वर आज मात्र माझं समाधान नाहीं. वीसच काढून मी कां थांबावं ? आजची माझी विचारांची दिशा बघितली तर आयुष्यांत शंभर गांवांत नि मोठ्या शहरांत ' वूलवर्थचीं दुकानं ' निघालेलीं दिसतील."

' शंभर गांवांत नि मोठ्या शहरांत ' असे शब्द फ्रॅन्कनें वापरले होते. ' मोठ्या शहरांत ' या शब्दांच्या उच्चाराबरोबर पेकनें आश्चर्यानें भिवया उंचावल्या. आतांपर्यंत वूलवर्थनें फार मोठीं शहरें जाणून बूजून वगळलेलीं होतीं. तसें करण्याला कारणें होतीं किंवा तसें करण्याचें त्यानें ठरविलें असेल. मोठ्या शहरांत भाडें जास्त असतें. वेतन-प्रमाणही जास्त असतें अन् चढा-ओढही असते धंद्यांत. या सर्वच गोष्टी अडचणीच्या होत्या अन् म्हणूनच फ्रॅन्क शहरांत दुकानें काढण्याला कांकू करीत होता. पण, युरोपच्या पहिल्या दौऱ्यानंतर कांकू करण्याची त्याची वृत्ति नष्ट झाली.

पेकच्या चेहऱ्यावरील आश्चर्याचा भाव बघून हंसत तो म्हणाला," होय. मोठीं शहरंच म्हटलं मी. शहरांत परदेशी लोक खूप असतात. पेक, मी नुकताच एक परदेशी या नात्यानं अनुभव घेऊन आलोंय्. पॅरिसमध्यें दाढीचा साबण खरेदी करतांना मला, भाषेच्या अडचणीमुळें किती त्रास पडला हें बघायला हवं होतंस तूं. मी एक कुणीतरी खुळा इसम आहे असं

समजूनच विक्रेता माझ्याकडे बघत होता. अन् खरोखरच मूर्खासारखीच अवस्था होती माझी. पण, फ्रेन्च भाषेंत साबणाला काय म्हणतात हें मला कसं माहीत असणार ? पण हाच मी जर वूलवर्थच्या दुकानांत जाईन तर तिथं भाषेची अडचणच नाहीं. सरळ विक्री मेजावरील वस्तु उचलून खुणेनं, ही पाहिजे, असं दर्शवायचं. किती सुलभ ! माझा मुद्दा तुझ्या लक्षांत आला ना ?

" आला न् कल्पना किती नामी आहे ! " पेक उद्गारला, " ही कल्पना यापूर्वीच कशी सुचली नाहीं तुम्हाला ?"

खरोखरच, ही कल्पना यापूर्वीच सुचली असती तर किती छान झालें असतें, असे उद्गार एकमेकांपाशीं काढण्याचे प्रसंग त्यानंतर दोघांवर कितीदां तरी आले. तो काळ देशांतराचा होता. असंख्य लोक युनायटेड स्टेट्स्मध्यें वास्तव्यासाठीं येत होते. आयरिश, जर्मन, पोलिश, इटालियन, निरनिराळे भाषिक लोक या स्वातंत्र्याच्या भूमीकडे, चागल्या जीवनाच्या शोधार्थ प्रचंड संख्येनें धांव घेत होते. या लोकांसाठी राहण्याकरितां घरें बांधण्यांत कंत्राटदार दिवस-रात्र गुंतलेले होते. या लोकांना बहुधा रोजंदारीवर मजूर म्हणून काम मिळे. त्यांच्या वेतनाचें प्रमाण कमी असे. त्यांचीं कुटुंबें मोठी असत.

आणि हीं माणसें बव्हंशीं वूलवर्थच्या दुकानांचीं गिऱ्हाइकें असत. कारण एखाद्या परदेशी वसाहतवाल्या स्त्रीला वूलवर्थच्या दुकानांत अडचण वाटण्याचें, संकोच वाटण्याचें कारण नसे. उघडचा विक्रीमेजावर वस्तु मांडलेल्या असत. तव्याला इंग्रजी भाषेंत काय म्हणतात हें त्या स्त्रीला माहीत नसलें तरी मग, काय अडणार होतें तिचें ? तवा ही वस्तु तर तिला माहीत होती ना ? अन् त्यासाठीं निकेल किंवा डाइम दिला की झालें. अन् हीं अमेरिकन नाणीं तिला कळायला फारच सुलभ.

" अन् या लोकांना आपले संसार नव्यानं उभारायचे आहेत," पेक म्हणाला, " अंथरुणांखेरीज जास्त कांहींच सामान हे लोक येतांना बरोबर आणीत नाहींत असं दिसतं. खरोखर, श्री. वूलवर्थ, ही कल्पना म्हणजे सोन्याची खाणच सांपडलीय् तुम्हांला ! बरं, इथं, न्यूयॉर्कमधेंच उघडणार कां दुकान ?"

" नाहीं. ब्रुकलिनमध्यें." फ्रॅन्क वूलवर्थनें चटकन् उत्तर दिलें. पेकनें त्यावर स्मित केलें. न्यूयॉर्क व ब्रुकलिन यांचें तोंपर्यंत एकत्रीकरण झालेलें नव्हतें. अन् हीं अलग शहरें एकमेकांना एकमेकांचीं कट्टर प्रतिस्पर्धी मानीत असत वूलवर्थच्या पेढीची कचेरी न्यूयॉर्कला असली तरी घर ब्रुकलिनला होतें. कांहीं थोड्याच वर्षांपूर्वी तें कुटुंब लॅन्कॅस्टरहून ब्रुकलिनला राहायला आलें होतें. जसजसें उत्पन्न वाढत गेलें तसतशीं घरें बदलण्यांत आलीं होतीं. त्यांची तिसरी मुलगी जेसी मे जरी लॅन्कॅस्टरला जन्मली होती तरी तिला लॅन्कॅस्टरचें घर आठवण्याइतकें वय होण्यापूर्वीच तें कुटुंब ब्रुकलिनला आलें होतें. तिच्या दृष्टीनें ब्रुकलिन हेंच 'आपलें गांव' होतें. बाकीच्या कुटुंबियांना देखील ब्रुकलिनचे रहिवासी म्हणवून घेण्यांत अभिमान वाटूं लागला होता.

ब्रुकलिन येथें वूलवर्थ सांखळींतील पहिलें दुकान उघडण्यासाठीं जागा घेण्यांत आली. उद्घाटनाची जंगी तयारी झाली. दर्शनी भागाला तांबडारंग आणि सोनेरी अक्षरांत दुकानाचें नांवहीं वूलवर्थचें दुकान ओळखण्याचीं वैशिष्टचें पुढें सर्वत्रच चिरपरिचित ठरलीं. ब्रुकलिनच्या दुकानापासून नांवाच्या अशा ठराविक प्रकारच्या पाट्या लावण्याला प्रारंभ झाला. अर्थात् मोठ्या शहरांत आपल्या धंद्याचा प्रयोग करण्याचा पहिला मान ब्रुकलिनला देण्याचा बेत वूलवर्थला पार पाडतां आला नाहीं. कांहीं अनपेक्षित अडचणीमुळें ब्रुकलिनच्या दुकानाचें उद्घाटन लांबणीवर टाकावें लागलें. असें पहिलें मोठ्या शहरांतील दुकान आधीं वॉशिंग्टनला निघालें. दोन्ही दुकानें अगदीं प्रारंभापासूनच तडाखेबंद यशाचीं धनी ठरलीं. आणि मग राष्ट्रांतील साऱ्या मोठ्या शहरांत याच छापाचीं दुकानें निघालीं.

एकोणिसाव्या शतकानें आपली कालचक्रांतील फेरी संपविली. विसावें शतक सुरू झालें. अमेरिकन उद्योगव्यवसाय कधीं भरती तर कधीं ओहोटी, पुन: भरती, पुन: ओहोटी असे हेलकावे खात चालू असला तरी वूलवर्थच्या दुकानाची चलती अखंडपणें चालूच होती. जेव्हां आर्थिक परिस्थिति चांगली असे तेव्हां जादा पैसा खर्चण्यासाठीं जवळ असे. त्यावेळीं गिऱ्हाइकें वूलवर्थच्या दुकानांतून गर्दी करीतच. जेव्हां आर्थिक हलाखी असे तेव्हां स्वस्त किमतींत माल घेण्यासाठीं लोकांना वूलवर्थच्या दुकानांत यावेंच लागे. सबंध देशांत 'पांच व दहा सेंटवालीं दुकानें' उदयास आलीं तीं सर्वच

कांहीं वूलवर्थ सांखळींतील नव्हतीं. अशा दुकानाच्या कल्पनेचा राखीव हक्क कांहीं वूलवर्थनें मिळविलेला नव्हता. त्याच्या मार्गानें इतरही कांहीं धंदे-वाल्यांनीं पावलें टाकलीं. त्याचे या धंद्यांतले कांही प्रतिस्पर्धी त्याचे जुने मित्रच होते. स्क्रॅन्टनला दुकान चालविणारा फ्रॅन्कचा भाऊ चार्ली यानें आपली स्वत:चीच अशा दुकानांची छोटीशी सांखळी तयार केली. फ्रॅन्कचा पहिला भागीदार नि आतेभाऊ सेमूर नॉक्स यानेंही स्वत:ची अशी सांखळी तयार केली. नंतर कांहीं काळानें या दोन्ही सांखळ्या वूलवर्थच्या सांखळींत जोडल्या गेल्या.

इतर प्रतिस्पर्धी बाहेरचे होते. मिडल वेस्टमध्यें मॅक्क्रोरी, पेन्सिल्व्हा-नियांत क्रेसगे, दक्षिणेंत क्रेस, अशा अनेक लोकांनीं 'पांच नि दहा सेंटवालीं दुकानें' काढलीं. यापैकीं कोणी पांच सेंटपासून डॉलरपर्यंत किंमतीचा माल ठेवण्याची पद्धति सुरू केली. त्यामुळें खूपच विविध प्रकारचा माल त्याला ठवतां येई. दहा सेंटची मर्यादा आपणही ओलांडावी असें वूलवर्थला अनेकदां वाटे. पण तो विचार अखेर नेहमीच रद्द होई. वूलवर्थच्या निधनानंतर कांहीं वर्षांनीं त्याच्या वारसांनी तो विचार अमलांत आणला. पण वूल-वर्थच्या हयातींत मात्र त्याच्या कोणत्याही दुकानांतील वस्तूंच्या किंमतीची कमाल मर्यादा दहा सेंटचेवर कधींच गेली नाहीं.

विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकांत वूलवर्थच्या धंद्याची भरभराट अत्यन्त प्रचंड प्रमाणावर झाली. १९०५ पर्यंत त्याच्या धंद्याच्या सांखळींतील एकशेंवीस दुकानें झालीं होतीं. १९०९ मध्यें त्यानें इंग्लंडकडे मोर्चा वळ-विला. तीन पेनीवाल्या नि सहा पेनीवाल्या वस्तूचीं अशीं अठ्ठावीस दुकानें त्यानें इंग्लंडमध्यें तीन वर्षांत काढलीं. कांहीं दुकानें जर्मनींतही निघालीं. सर्वच दुकानें चांगलीं चालून मूळ पेढीच्या खजिन्यांत नफ्याच्या रकमांची भर घालीत होतीं.

आतां एका माणसाला सर्व व्यवहार हाताळतां येईल इतकी परिस्थिति आटोक्यांत राहिली नव्हती. १९०१ साली वूलवर्थ पेढीचें 'कॉर्पोरेशन'-मध्यें परिवर्तन करण्यांत आलें. फ्रॅन्क वूलवर्थ हा त्या संघटनेचा अध्यक्ष होता. एकेकाळीं रात्रभर पेनी मोजीत बसणाऱ्या वूलवर्थच्या संघटनेंत

आतां हिशेबनिसांची पलटण बसत होती आणि कोटयावधि डॉलरांची उलाढाल चालू झाली होती.

आणि, स्वत:चें दुकान काढण्याचें स्वप्न बघणाऱ्या, खिशांत स्वत:च्या मालकीची पेनी नसणाऱ्या त्या शेतकऱ्याच्या मुलानें जें स्वप्न कधींच पाहिलें नव्हतें तें प्रत्यक्ष घडलें होतें. फ्रॅन्क वूलवर्थ आतां कोटयाधीश बनला होता. त्यानंतरच्या काळांत तर तो अब्जाधीशही झाला, त्यापेक्षांही मोठा कुबेर बनला. सर्व जीवनभर त्याची राहणी काटकसरीची होती. त्याची पत्नी जेनीही तशीच काटकसरी होती. मिळालेला नफा पुन: पुन: धंद्यांत घालण्यांत सारें आयुष्य गेलें होतें. आतां मात्र हात सैल सोडण्याची वेळ आली होती. आतां फ्रॅन्क वूलवर्थ कोटयाधीश होता नि आतां कोटयाधीशाच्या इतमामानें राहूं शकत होता.

ब्रुकलिनचें आपलें घर जेनीला अगदीं सुखसोयीचें वाटत होतें; पण तिच्या पतीच्या मतें आतां तें घर आपल्या पत्नीला शोभेसें राहिलें नव्हतें. त्याने फिफ्थ ॲव्हेन्यूवर एक मोठा प्रासाद खरेदी केला. लॉंग आयलंडवर ग्लेन कोव्ह येथेंही त्यानें घरदार घेतलें. कांहीं वर्षांनंतर ग्लेन कोव्हचें घरदार आगीच्या भक्षस्थानीं पडलें तेव्हां त्या जागी, युरोपांत बघितलेल्या राजवाडयांपेक्षां भव्य असा संगमरवरी दगडांचा महाल त्यानें बांधविला.

लॉंग आयलंडवरील महालास विनफील्ड हॉल हें नांव होतें. हा महाल बघून सम्राट नेपोलियनहि मनोमन खूष झाला असता. खरोखरच त्या महालांत नेपोलियनसारख्या सम्राटाला राहावेंसें वाटलें असतें. वूलवर्थचें शय्यागृह अगदीं बादशाही थाटानें सुसज्जित केलेलें होतें. त्याच्या ऐसपैस पलंगाला लाल मखमलीचें छत होतें. अगदीं नेपोलियनच्या पलंगासारखा असलेल्या त्या पलंगावर सोनेरी मुकुटाची आकृतीही शोभत होती. जमीन संगमरवरी दगडाची होती. कपाटें, आरशाच्या चौकटी, खुर्च्या वगैरेही संगमरवरी दगडाच्या होत्या. पाण्याच्या नळाच्या तोटया भरीव सोन्याच्या होत्या. नेपोलियनच्या शय्यागृहाप्रमाणेंच या शय्यागृहांतही भिंतीना प्रचंड आरसे लावलेले होते. तो आरसेमहालच होता.

"धंद्यांतला नेपोलियन." फ्रॅन्क वूलवर्थला त्याचे सहकारी या नांवानें संबोधू लागले होते. आणि बोनापार्टच्या काळांत उपलब्ध नसलेल्या,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 32846 पै-पैशानें कुबेरपद चरित्र
क्रमांक 9086 नों. दि. 6/3/62

माहीतही नसलेल्या अनेक आधुनिक सुधारणांनीं आपला महाल सजविणें या आधुनिक नेपोलियनला शक्य झालें होतें.

महालाच्या भव्य संगमरवरी जिन्याच्या जोडीला आपोआप यंत्रानें वर नेणारा छुपा जिना होता. घरांत ऊब आणण्यासाठी वाफेचे नळ सर्वत्र घातलेले होते. विजेच्या दिव्यांचा लखलखाट होता. राजघराण्यालाही ज्या सुखसोयी मिळूं शकणार नाहींत त्या वूलवर्थच्या महालांत होत्या. महालांतला 'पाईप ऑर्गन' एक लाख डॉलर किंमतीचा होता. स्वयंचलितपणें वाजविण्याची यंत्रणा त्याला जोडलेली होती. शिवाय एक वादक कायम नोकरीला असेच. वूलवर्थची लहर फिरली तर तो वादकाला तात्पुरती रजा देऊन स्वतःच ऑर्गनवर बसे. आपल्या अकुशल बोटांनीं स्वयंचलित यंत्रणेच्या किल्ल्या दाबून तो सारा महाल भरदार सुरांनीं गजबजून टाकी.

फिफ्थ ॲव्हेन्यूवरील वाडा लहान असला तरी विनफील्ड हॉलप्रमाणेंच प्रेक्षणीय होता. दोन्ही निवासस्थानें निवडक प्रकारचे सुन्दर पडदे, तैल-चित्रें, आशियाई पद्धतीचे गालिचे, रौप्यपात्रें यांनीं सजविलेलीं होतीं. घोडेगाड्या होत्याच पण एक मोटारही परदेशांतून आणविलेली होती व मोटार हांकण्यासाठीं एक फ्रेंच मोटारहाक्या होता. जडजवाहीरही भरपूर होतें. वारंवार मेजवान्या झडत. स्त्रीपुरुषांचीं सांघिक नृत्यें होत. वारंवार परदेशाच्या प्रवासाला तें कुटुम्ब जाई. पैशानें जें जें कांहीं मिळतें तें सर्व आपल्या पत्नीच्या व मुलींच्या सुखासाठीं फ्रॅन्क वूलवर्थ घेत होता, करीत होता.

या साऱ्या चैनीच्या माऱ्यावर जेनीची होणारी प्रतिक्रिया तशी निराशा-जनक होती. ती एक विनयशील, अबोल स्त्री होती. आपल्या साऱ्या संवयीं तिनें पूर्वींच्यासारख्याच साध्या ठेवल्या होत्या. तिचा पति तिच्यासाठीं ज्या असंख्य आणि अमोल वस्तु घेत होता त्याबद्दल तिला धन्यता, कृतज्ञता वाटली तरी ती सौम्यपणें नापसंतीच व्यक्त करी. आपल्याला जन्मभर पुरेल इतकें कापड चोपड, अलंकार आहेत; अधिकाची आवश्यकता नाहीं असें ती विनयशीलतेनें सुचवी. दिवसेंदिवस न्यूयॉर्कच्या गजबजलेल्या वातावरणापासून अलिप्त राहण्याची वृत्ति तिच्या ठायीं वाढत गेली.

समारंभांच्या निमंत्रणांना ती बहुधा नकार देई. ग्लेन कोव्हच्या महालांत ओटीवर झुलत्या खुर्चीत सावकाश झोके घेत, एकटीनें आत्मसमाधानांत गुंग राहून काळ व्यतीत करणें ती अधिक पसंत करी.

वूलवर्थच्या मुलींची गोष्ट मात्र निराळी होती. आपल्या पायाशी अमर्याद लक्ष्मी लोळत आहे हें बघून त्यांना मनापासून आनंद वाटे. त्या संपत्तीचा पुरेपूर उपभोग घेत. तिन्ही मुली सुंदर होत्या. वयांत आल्यावर आकर्षक व आदर्श पद्धतीनें कसें राहावें हें त्यांना कळूं लागलें होतें. न्यूयॉर्कच्या सामाजिक जीवनांत त्या चांगल्याच रमूं शकत होत्या. अर्थात त्यांना मागण्या घालणारे तरुणही अनेक पुढे आले. त्यांनीं आपल्या पतींची योग्य निवड केली. उत्तम संसार म्हणतां येईल असे संसार त्यांनीं थाटले.

फिफ्थ ॲव्हेन्यूच्या महालांत हेलेनाच्या विवाहाचा समारंभ अत्यन्त थाटांत झाला. चार्लस मॅक्कॅन नांवाच्या तरुण वकिलाशीं तिचें लग्न झालें. एदनाचा विवाह तीन वर्षांनीं फ्रॅन्कलीन लॉज हटन नांवाच्या शेअर दलालाशीं झाला. तिसरी, सर्वांत धाकटी जेसी हिचा विवाह जेम्स पॉल डोनोह्यू नांवाच्या आयरिशवंशीय अमेरिकन तरुणाशीं झाला.

तिन्ही मुलींचे संसार मुलाबाळांनीं फुलले. फ्रॅन्क वूलवर्थ आपल्या नातवांचे खूप लाड करी आणि नातवांना आजोबाही फार आवडत.

✦ ✦ ✦

## ' व्यापार-उदिमाचें मंदिर ' : ११ :

ता. २४ एप्रिल १९१३ ची रात्र. दुपारपासूनच न्यूयॉर्कच्या सिटी हॉल पार्कमध्यें गर्दी जमूं लागली होती. सूर्य मावळण्याच्या वेळेपर्यंत त्या ठिकाणीं एका माणसाला उभें राहाण्याइतकी चौरस फूट जागाही रिकामी राहिलेली नव्हती. पार्कच्या भोंवतींच्या गल्ल्याही माणसांनीं भरून फुललेल्या होत्या. रस्त्यांतूनही जमाव जमत होता आणि वाहनांची वाहतूक करणें बिकट होत होतें.

92430



दिवसाचा प्रकाश लोपला आणि संध्याप्रकाश पसरला. सर्व प्रेक्षकांचे डोळे एकाच दिशेकडे वळले, ब्रॉडवे, बार्कले, पार्कप्लेस यांच्या नाक्यावर, काळसर दिसूं लागलेल्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर एक काळा उत्तुंग सुळका उभा असलेला दिसत होता.

गेलीं दोन वर्षें सिटी हॉल भागांतील कामगार-नोकरवर्ग जातां येतांना बघत आले होते. प्रथम पोलादी कांबा, सळया, खांब यांचा सांगाडा उभा होता. आपल्या कामावरून त्या लोकांना हा सांगाडा रोज रोज क्रमाक्रमानें उंच होत जात असलेला दिसत होता. अखेर अखेर तो इतका उंच होत गेला कीं जणुं कांहीं तो ढगांना जाऊन भिडत आहे असें वाटावें. इतकी उत्तुंग उभारणी करण्याचें धाडस यापूर्वी कोणाही माणसाचें झालें नव्हतें.

" हें धूड तगणं शक्य नाहीं." लोक मोठ्या दूरदर्शी पोक्तपणाचा आव आणून भाकीत करीत होते, " पोलादी खांबाचा सांगाडा आहे नुसता तोंवर ठीक आहे ; पण संपूर्ण इमारत ही बाब निराळी आहे. विटा-दगड बसवायला सुरुवात झाली म्हणजे बघा. इतकं प्रचंड वजन पेलण्याइतका भक्कम पाया बनवितांच येणार नाहीं. अन् वाऱ्याचं काय करणार ? एक सोसाटा आला कीं सारा डोलारा धाडकन् कोसळेल. आसपासच्या साऱ्या इमारती चिरडल्या जातील या धुडाखालीं. वाट बघाच अन् मग दिसेलच ! "

आणि ही भीति केवळ सामान्य लोकांकडूनच व्यक्त केली जात होती असें नाहीं. इंजिनिअर नि स्थापत्य विशारदही नकारार्थी मान डोलवीत म्हणत होते, " छे ! इतकी उंच इमारत उभी राहणंच शक्य नाहीं. "

आणि ती उभी राहूं शकली तरी बांधण्याची जरूरी नाहीं असेंही म्हटलें जात होतें. सर्व जगांतील त्या वेळची उत्तुंग इमारत न्यूयॉर्कला होती, गगनचुंबी मेट्रोपोलिटन टॉवर होतेंच कीं बांधलेलें. आणि जेव्हां ही गगनचुंबी इमारत बांधली गेली तेव्हांही अशीच भीति व्यक्त केली गेली होती. पण ती भीति फोल ठरली होती. टॉवर अविचल खडें होतें. मजबूत नि सुरक्षित ठरलें होतें. शहराचें भूषण ठरलें होतें. आतां त्या गगनचुंबी मेट्रोपोलिटन टॉवरवर मात करण्याची काय आवश्यकता होती ? जगांतील सर्वांत उत्तुंग इमारतीपेक्षांही उंच इमारत बांधण्याची कल्पना माथेफिरू माणसाखेरीज कोणाच्या मनांत येईल ? असे प्रश्न नि विचार बोलून दाखविले जात होते.

तशी इमारत बांधण्याची आकांक्षा फ्रॅन्क वूलवर्थनीं बाळगली होती. आणि हा व्यापारी कांहीं माथेफिरू नव्हता. जगांतील सर्वांत उंच इमारत सिंगर कंपनीनें बांधली होती. उंचीचा हा विक्रम त्या सिंगर कंपनीला फलदायी ठरला होता. दहा लक्ष डॉलर खर्चून जितकी जाहिरात झाली असती कंपनीची तितकी जाहिरात केवळ या उत्तुंग इमारतीमुळें फुकटांत झाली होती. त्यानंतर सिंगर कंपनीच्या इमारतीपेक्षांही उंच असें मेट्रोपोलिटन टॉवर बांधलें गेलें. त्यामुळेंच त्या इमारतीची मालक असलेल्या मेट्रोपोलिटन विमा कंपनीचें नांव जगभर झालें. टॉवरच्या चित्राचीं पोस्टकार्डें जगभर जाऊन ही जाहिरात झाली. या दोन्ही इमारतींपेक्षांही उंच अशी वूलवर्थची इमारत न्यूयॉर्कचें वैशिष्टय ठरेल, कोणाही नागरिकाचें वा पाहुण्याचें लक्ष वेधल्याशिवाय रहाणार नाहीं. ही इमारत बांधण्याच्या आकांक्षेमागें वूलवर्थ यांच्या मनांत हाच हेतु होता; आणि त्यांनीं आपली आकांक्षा पुरी केली.

आणि ही आकांक्षा त्यांनीं स्वत: एकटयाच्याच हिंमतीवर पुरी केली. अशा इमारतीवर संघटनेचा पैसा उधळण्याला कॉर्पोरेशनच्या इतर डायरेक्टरांनीं विरोध केला. त्यावेळीं फ्रॅन्क वूलवर्थ यांनीं अगदीं आनंदानें म्हटलें, "ठीक आहे. मग मीच माझे स्वत:चे पैसे उधळून ती बांधवीन !" ती इमारत बांधण्याला १३५००००० डॉलर खर्च आला. सारा पैसा वूलवर्थनीं स्वत:च्या खिशांतून खर्च केला. जगांतील सर्वांत उत्तुंग आणि सर्वांत सुंदर इमारत एकटया फ्रॅन्क वूलवर्थच्या मालकीची झाली.

एकशें वीस फूट लांबीचे स्तंभ जमिनींत ठोकून बसवायला प्रारंभ करून बांधणी-काम सुरू झालें. तें पुरें व्हायला तीन वर्षें लागलीं. आणि आतां ती इमारत बांधून झाली होती. आपल्या पहिल्या छोटया दुकानाचें 'भव्य उद्घाटन' करण्याची योजना जितक्या काळजीपूर्वक आणि जितकें डोकें खाजवून फ्रॅन्क वूलवर्थनीं आंखली होती, तितकाच विचार करून त्यांनीं आपल्या यशाचा कळस अशा या इमारतीच्या उद्घाटनाचा समारंभ आंखला होता.

उद्घाटनाचा मुहूर्त सायंकाळीं साडेसातचा ठरला होता. त्या क्षणापर्यंत त्या गगनचुंबी इमारतींत संपूर्ण अंधार होता. बरोबर साडेसातच्या टोल्याला वॉशिंग्टन येथें राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांनीं विजेच्या दिव्यांची कळ दाबून उद्घाटन केलें.

आणि इकडे झगझगीत प्रकाश देणारे विजेचे दिवे लखलख करूं लागले. इमारतीच्या हजारों खिडक्यांतून दिव्यांचा प्रकाश बाहेर फेंकला गेला. इमारतीच्या शिखरावर जणुं कांहीं दिव्य प्रकाशाचा मुकुटच बसविलेला दिसत होता. इमारतीच्या भव्य प्रवेशद्वारांत ठेवलेल्या वाद्यवृंदावरील राष्ट्रगीताचे सूर वातावरणांत निनादूं लागले.

संगीताचे सूर हळूहळू वरच्या पट्टींत जात होते. लोक आ वासून इमारतीचें दृश्य बघत होते. वर, खूप वर बघतां बघतां प्रेक्षकांच्या मानांना कळ लागूं लागली होती. अगदीं वरच्या भागांतील दिवे तर अगदीं आकाशांतील ताऱ्यांसारखे भासत होते. आतांपर्यंत असें सुन्दर दृश्य क्वचितच पहायला मिळालें असेल. दिव्याच्या प्रकाशांत तांबूस भिंती उजळून दिसत होत्या. भिंतीवरील नक्षीकाम नाजुक कलाबतूच्या विणकामासारखें भासत होते. हजारों टन पोलाद, दगड, विटा, यांनी उभारलेला तो डोलारा हलका फुलका बनून वसंतऋतूंतील सौम्य वाऱ्यावर झुलत असल्यासारखा वाटत होता.

सर्व रात्रभर दिव्यांचा झगझगाट होता. सव रात्रभर लोक बघण्यासाठीं येत होते आणि आश्चर्यानें थक्क होऊन जात होते. तथापि खरा 'भव्य उद्घाटना'चा समारंभ आंत चालू होता. भव्य मेजावर मेजवानीचो थाटदार तयारी होती. फ्रॅन्क वूलवर्थचे निमंत्रित पाहुणे दिवाणखान्यांतील त्या मेजाभोंवतीं जमलेले होते.

निमंत्रितांत अनेक प्रकारचे लोक होते. प्रमुख धंदेवाले, बँकवाले, राजकीय नेते त्यांत होते. फ्रॅन्क वूलवर्थ यांचे मित्र म्हणवून घेण्यांत अभिमान मानणारे हे लोक होते. स्थापत्यविशारद कास गिल्बर्ट आणि इमारतीच्या बांधकामाचे प्रमुख लुई होरोविट्झ् हे आपल्या सर्व प्रमुख कारागिरांसह उपस्थित होते. आणि त्याशिवाय, फरॅन्क वूलवर्थला अत्यंत निकटवर्ती असणाऱ्या कांहीं व्यक्ति तेथें होत्या. त्यांचा योग्य सन्मान करण्यांत यावयाचा होता.

एका सुप्रतिष्ठित धर्माधिकाऱ्यानें आशीर्वचन उच्चारलें आणि मेजवानी सुरू झाली. त्या धर्माधिकाऱ्यानें त्या इमारतीचें वर्णन ' व्यापार-उदिमाचें मंदिर ' असा केला.

मंदिर देऊळ (कॅथीड्रल) या शब्दाच्या उच्चाराबरोबर स्थापत्य विशारद श्री. गिल्बर्ट यांनीं संतोषदर्शक मान डोलविली. इमारतीची रचना करतांना त्यांनीं तीच दृष्टि ठेवली होती. बिशपाची गादी असलेलें मुख्य देऊळ म्हणजे कॅथीड्रल. युरोपांतील अशा देवळांची रचना ज्या ' गोथिक रिनेसान्स ' धर्तीची होती तीच पद्धति त्यांनीं डोळयांपुढें ठेवली होती. आणि त्या पद्धतींतील सर्व सौन्दर्य आणि गांभीर्य कायम राखून त्यांनीं इमारतीचा आधुनिक काळाला साजेसा नकाशा आंखला होता.

या इमारतीच्या बांधणींत श्री. गिल्बर्ट यांनीं जें कौशल्य ओतलें होतें तें म्हणजे त्यांच्या प्रतिभेचा अपूर्व विलासच होता. त्या कौशल्याची बरोबरी इतरांनाच काय पण पुनः स्वतः गिल्बर्ट यांनाही करतां आली नाही. आज न्यूयॉर्कमध्यें यापेक्षां उंच गगनचुंबी इमारती उभ्या आहेत. कांहीं आधुनिक पद्धतीला अनुसरून सुंदर आहेत. पण त्यापैकीं एकही कॅथीड्रलसारखी नाहीं. ' दगडी कलाबतूचें काम ' या शब्दांनीं वर्णन करण्यासारखी जी अपूर्वता वूलवर्थच्या इमारतींत आहे तशी अपूर्वता या नव्या इमारतींपैकीं कोणालाच नाहीं. वूलवर्थ-इमारतीच्या दर्शनानें वाटणारें नेत्रसुख फारच थोडया इमारती देऊं शकतात.

दारूंत मुरविलेल्या समुद्रकूर्माचें सार; विशिष्ट उंची जातीच्या कोंबडया, पंखही न फुटलेल्या कोवळया पक्ष्यांचें मांस नि गोडया पाण्यांतील कांसवाचें मांस, यांपासून बनविलेले विविध पदार्थ यथेच्छ खाऊन झाल्यावर निमंत्रितांनीं आपल्या हॅवाना सिगार शिलगावल्या आणि खुर्चीच्या पाठीवर रेलून बसून ते भाषणें ऐकण्याला सज्ज झाले.

अध्यक्षस्थानीं प्रख्यात लेखक एफ्. हॉपकिन्सन स्मिथ हे होते. त्यांनीं अत्यंत गौरवपर शब्दांत फ्रॅन्क वूलवर्थ यांचें वर्णन करून त्यांना बोलायची विनंती केली.

फ्रॅन्क वूलवर्थची मूर्ति उभी राहिली. त्यांचें वय आतां एकसष्ट होतें. त्यांची मुद्रा उत्साही पण गंभीर होती. बांधा कणखर वाटत होता. त्यांचे डोळे निमंत्रितांवरून फिरूं लागले आणि ज्या व्यक्तीला ते डोळे शोधीत होते त्या व्यक्तीचें दर्शन होतांच त्या व्यक्तीवर स्थिरावले.

...ाठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्र...
अनुक्रम प्रे-पैशानें-कुबेरपद- वि: १०५
क्रमांक ................ नों. दि: ..........

ती व्यक्ति म्हणजे वॉटरटाऊनचे विल्यम मूर हे होत. ते आतां खूप वृद्ध नि अशक्त दिसत होते. भाषण ऐकण्यासाठीं त्यांनीं कानाला कर्णा लावला. ऐकू आलेल्या पहिल्यावहिल्या वाक्यांतच स्वत:चें त्यांना नांव ऐकूं आलें. आपल्या शांत, स्नेहार्द्र आवाजांत फरॅन्क वूलवर्थ यांनीं जुन्या काळच्या आठवणी सांगायला सुरुवात केली. कोणे एके काळीं एका व्यक्तीनें आपल्यावर विश्वास टाकला, माल उधारीवर देऊन एक छोटें दुकान काढायला मदत केली. आज ही उभी असलेली प्रचंड इमारत त्याच पायावर उभी आहे असें सांगून फरॅन्क वूलवर्थ यांनीं म्हटलें, ' ती व्यक्ति ही ! " फ्रॅन्कच्या विनंतीवरून वयोवृद्ध श्री. मूर कसेबसे उभे राहिले आणि झालेल्या टाळ्यांच्या गजराचा त्यांनीं स्वीकार केला.

श्री. मूर खालीं बसल्यानंतर फरॅन्क वूलवर्थ यांनीं, ' वूलवर्थ इमारत उभारण्याला हातभार लावणारे ' म्हणून इतर कांहीं जणांबद्दल बोलायला सुरुवात केली. प्रथम चार्लीचा उल्लेख झाला. अत्यंत गौरवाच्या शब्दांत फरॅन्कनीं त्याच्याबद्दलची भावना व्यक्त केली. नंतर भोजन मेजाभोंवतीं हिंडत त्यांनीं आपल्या धंद्याच्या प्रारंभकाळांतील एकेका सहकाऱ्याचा परिचय करून द्यायला सुरुवात केली. टाळ्यांचा स्वीकार करण्यासाठीं प्रत्येक व्यक्ति उठे, टाळ्या संपल्यावर फरॅन्क वूलवर्थ पुढें जात. ते म्हणाले " ही इमारत म्हणजे फरॅन्क वूलवर्थचें स्मारक आहे असें अध्यक्षांनीं म्हटलें आहे. पण तें तसें नाहीं. तें स्मारक एका कल्पनेचें आहे. आपल्याला परवडेल त्या किंमतीचा माल घेण्याचा गिऱ्हाइकाला हक्क आहे हें दुकानदारानें मानलें पाहिजे ही ती कल्पना होय. मी कांहीं केलेंच असेल तर ती कल्पना प्रत्यक्ष व्यवहारात आणली. आणि या माझ्या जुन्या सहकाऱ्यांची निष्ठापूर्ण व मन:पूर्वक मदत न लाभती तर मला एकट्याला ती कल्पना अमलांत आणण अशक्य होतं. "

नंतर स्थापत्यविशारद आणि त्यांचे मदतनीस, इमारत बांधणीच्या कामाचे प्रमुख व त्यांचे मदतनीस यांचाही फरॅन्क वूलवर्थ यांनीं गौरव केला. भाषण संपवून फरॅन्क वूलवर्थ बसले तेव्हां मध्यरात्र टळली होती. पण अद्याप किती तरी भाषणें व्हावयाचीं होतीं. एकामागून एक वक्ता बोलत होता. व्यापारी धंदेवाले, उद्योगपति, राजकीय नेते, सर्वच वक्त्यांनीं फरॅन्क वूलवर्थ

हांका मारूं लागली. अनेक वर्षें तिच्या तैनातींत असणाऱ्या नोकरांनाही ती ओळखीनाशी झाली. "कोण अनोळखी माणसं अंवतींभंवतीं वावरतात !" अशी तक्रार ती करूं लागली.

छे ! हा वयाचा परिणाम नव्हे, असें मत डॉक्टरांनीं गंभीरपणें व्यक्त केलें. जेनी साठीच्या आंतच होती वयानें. तिचें हें दुखणें हळूहळू वाढत जाणार होतें. आणि हें दुखणें मानसिक होतें. तो एक मनोविकार होता. तिचें शारीरिक आरोग्य उत्तम होतें. ती आणखी अनेक वर्षें जगूं शकली असती. त्या वेळच्या वैद्यकीय परिभाषेंत सांगायचें म्हणजे जेनी 'मन गमावून' बसली होती. आणि त्या वेळीं मानसोपचारपद्धति तिला सुधारूं शकेल इतकी प्रगत झालेली नव्हती.

या परिस्थितीनें फरॅन्क वूलवर्थ यांना काय मानसिक वेदना होत असतील याची कोणालाच कल्पना करतां आली नसती. जेनी धैर्यशील होती. कर्तबगार स्त्री होती. चाळीस वर्षें सतत त्यांना तिचा आधार होता. प्रेयसी म्हणून त्यांच्या प्रेमाला पात्र ठरलेली ती पहिली नि एकमेव स्त्री होती. आपल्या मालकीची सारी संपत्ति खर्ची पडली तरी तिला सुधारली पाहिजे असें त्यांना वाटावें हें स्वाभाविक होतें. तिला तज्ज्ञांना दाखवण्यांत आलें. जर अमेरिकेंतील तज्ज्ञ कांहीं करूं शकत नसतील तर हैडेलबर्ग नि व्हिएन्ना येथील प्रख्यात वैद्यकीय केंद्रांत तसे तज्ज्ञ असतील; आपली जेनी आपल्याला परत मिळवून देऊं शकेल असा एकदा तरी तज्ज्ञ जगाच्या पाठीवर कोठें तरी असेल, असें फरॅन्क वूलवर्थना वाटे.

तसा माणूस होता कीं नव्हता कोण जाणे, पण अत्यन्त प्रयत्न करूनही तसा कोणी तज्ज्ञ गवसला नाहीं. सर्व सुखसोयी असतांनाही जेनी आपले दिवस कुठल्यातरी निराळ्याच जगांत घालवीत होती. सारखी झुलत्या खुर्चीवर झोके घेत जगाची पर्वा न करतां दिवस व्यतीत करीत होती. ती फारच क्वचित् बोले. तशी ती कधीं न त्रासणारी, निमूटपणें साऱ्या गोष्टी करणारी राहिली होती आणि तशीच ती असुखीही दिसत नव्हती. आपल्या पतीच्या मागें पांच वर्षें ती होती. १९२४ सालीं ग्लेन कोव्हच्या महालांत तिनें इहलोकाचा निरोप घेतला.

स्वत:ची प्रकृति ढासळलेली असूनही तो पुरुष जेनीच्या जिवंत मृत्यूचें दु:ख गिळण्यासाठीं धडपडत असतांनाच नवे आघात होत होते. जणुं, फ्रॅन्क वूलवर्थला प्रिय असलेल्या माणसांना पटापट उचलून नेण्याची जंगी मोहीमच यमराजांनीं काढली होती. कार्सन पेक हा त्यांचा उजवा हात नि आतेभाऊ सेमूर हे दोघे एका आठवड्याच्या अंतरानें वारले. दोघांचेही मृत्यु अनपेक्षित आणि तडकाफडकीं घडून आले. मेजवानीच्या वेळीं प्रकृतीनें ठीकठाक दिसलेले वयोवृद्ध श्री. मूर असेच हृदय- विकाराचा झटका येऊन एकाएकीं वारले. फ्रॅन्क वूलवर्थ हे जुन्या ऋणानुबंधांना चिटकून राहाणारे गृहस्थ होते. ते ऋणानुबंध पटापट तुटतांना बघून त्यांना वेदना नि दु:ख वाटणें स्वाभाविक होतें. आणि या आघातानंतर सर्वांत भयंकर आघात झाला.

त्यांची दुसरी मुलगी एदना वूलवर्थ हटन आपल्या पतीसह नि छोट्या मुलीसह हॉटेल प्लाझामध्यें राहात होती. तिला कांहीं तरी कानाचें दुखणें झालें होतें व त्यांतून ती बरी होत असलेली दिसत होती. पण एका सकाळीं हॉटेलच्या मोलकरणीला ती आपल्या बिछान्यांतच मरून पडलेली आढळली.

पत्नीची शोचनीय अवस्था, जुन्या इष्टमित्रांची हानि, लाडक्या मुलीचा मृत्यु--आतांपर्यन्त फ्रॅन्क वूलवर्थवर कृपादृष्टि ठेवणारें सुदैव आतांच कुठें नघून गेलें होतें ? धंदा सारखा भरभराटतच होता. आपली गगनचुंबी इमारत जगप्रसिद्ध होईल ही त्यांची कल्पना खरी ठरली होती. पण आत हें यश किती अल्प आणि मामुली ठरलें होतें ! फ्रॅन्क वूलवर्थ दिवस व्यतीत करीत होते. तास न् तास कचेरींत राहात होते. पण सर्व आयुष्यभर जें अंत:करण ओतून ते राबले तें अंत:करण मात्र आतां कामांत रमूं शकत नव्हतें.

१९१९ च्या एप्रिलमध्यें एका संध्याकाळीं त्यांनीं काम संपवलें. आणि सप्ताहाचे शेवटचे दिवस विश्रांतींत घालवण्यासाठीं ते ग्लेन कोव्हला गेले. त्यांना बरें वाटत नव्हतें ; तसें कांहीं विशेष नाहीं, फक्त पडसें-खोकला आहे थोडासा असें ते म्हणाले. पण दुसऱ्या दिवशीं प्रकृति अधिक बिघडली. त्यांच्या नेहमींच्या डॉक्टरांनीं ताबडतोब तज्ज्ञांना बोलावलें. तज्ज्ञांच्या मतें, अनेक प्राकृतिक व्यथांनीं ते पीडलेले होते. घशाला आलेली सूज म्हणजे त्यांत आणखी भरच.

जे उपचार करणें शक्य होतें ते सर्व करण्यांत आले. त्यांचें वय फक्त सदुसष्ट होतें आणि वूलवर्थ कुटुम्बांतील पुरुष दीर्घायुषी होऊन गेलेले होते. पण फ्रॅन्क फार थकलेभागलेले होते, अत्यंत दु:खी होते. जगण्यासारखें कांहींच उरलें नव्हतें आतां त्यांना. शांतपणें, जणुं येणाऱ्या मृत्यूचे आभार मानीतच त्यानीं तारीख ८ एप्रिल १९१९ रोजीं स्वत:ला मृत्यूच्या स्वाधीन केलें.

वुडलॉन कबरस्थानांतील त्यांच्या भव्य कबरीवर फक्त त्यांचें नांव आणि जन्ममृत्यूच्या तारखा लिहिलेल्या आहेत. आपल्या स्वत:चा समाधि-लेख लिहिण्याचें त्यांनीं ठरविलें असतें तर 'न्यूयॉर्क सन' मधील पुढील शब्द त्यांनीं पसंत केले असते.

त्यांच्या मृत्युलेखांत सदर पत्रानें म्हटलें होतें :

"जास्त पैसे घेऊन कमी माल देऊन नव्हे; तर कमींत कमी पैशांत जास्तींत जास्त माल देतां येतो हें दाखवून देऊन त्यांनीं लक्ष्मीला प्रसन्न करून घेतलें."

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. अनुक्रम 32856 वि: ८२ क्रमांक 9085 नों. दि: 6/3/52

REFBK-0012430

92830